
नोव्हेंबर २०१४/ पाने ६०/ किंमत ₹ १०

# लोकराज्य



## कार्यक्षम.. लोकाभिमुख.. पारदर्शक..




# मुख्यमंत्री धावले राष्ट्रीय ऐक्यासाठी...

पोलादी पुरुष आणि भारताचे पहिले उपपंतप्रधान सरदार वल्लभभाई पटेल यांचा ३१ ऑक्टोबर जन्मदिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून देशभर साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित एकता धावमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) प्रकाश जावडेकर सहभागी झाले होते.

वर्ष ६६ वे | अंक ५ | नोव्हेंबर २०१४

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — अजय अंबेकर
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- विशेष सहकार्य — कीर्ती पांडे, क्रीती लाला
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — विद्या कदम, नितीन कुटे

## मांडणी

- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
वितरण - ०२२-२२६१६९७६
email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# अंतरंग

## पारदर्शक आणि कार्यक्षम सरकार

महाराष्ट्राचे २७ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतलेल्या देवेंद्र फडणवीस यांची, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमासाठी 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांनी घेतलेली मुलाखत.




६

## आपले सरकार



राज्यातील जनतेच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी नव्या सरकारवर आहे. गतिमान कारभार करून प्रत्येक क्षेत्रात राज्य क्रमांक एकचे होईल या दिशेने वाटचाल करण्यात येईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सांगताहेत राज्याच्या आगामी वाटचालीची दिशा...

१०

## सर्व घटकांच्या हितास सर्वोच्च प्राधान्य

महसूल, कृषी, राज्य उत्पादन शुल्क, पशुसंवर्धन व दुग्ध विकास, मत्स्यव्यवसाय, फलोत्पादन आणि अल्पसंख्याक कल्याण व औकाफ या खात्यांचे मंत्री एकनाथ खडसे यांची विस्तृत मुलाखत... या मुलाखतीत त्यांनी विविध खात्यांच्या भविष्यातील वाटचालीवर प्रकाशझोत टाकला.



१३

## नवे सरकार... नवी आव्हाने

नव्या सरकारपुढे विविध समस्या आणि आव्हाने असणार आहेत. ती आव्हाने नेमकी कोणती आहेत, त्यांचा प्राधान्यक्रम कसा असेल. या आव्हानांवर मात करण्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागतील याचा सर्वंकष आढावा...

४०

## लोहपुरूष



भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी अत्यंत गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झाली होती. देशाचे ५६५ तुकडे पडतील की काय अशी भीती निर्माण झाली होती. या परिस्थितीवर वज्रपुरुष वल्लभभाई पटेल यांनी मात करून अखंड भारत निर्माण केला.

४९

## याशिवाय


- आपले मंत्री २५
- ऐतिहासिक शपथविधी ३०
- देवदुर्लभ स्वागत ३८
- कौल जनतेचा ४४
- स्वच्छ भारत... स्वच्छ महाराष्ट्र! ५१
- मुख्यमंत्र्यांची प्रेरणास्थळांना भेट ५३
- 'जय महाराष्ट्र'ने इतिहास घडविला ५४
- 'दिलखुलास'- महाराष्ट्राची 'मन की बात' ५७
- मंत्रिमंडळ निर्णय ५८

# स.न.वि.वि.

### नेटका आणि माहितीपूर्ण


स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन करणारा लोकराज्यचा सप्टेंबरचा प्रेरणा विशेषांक खूपच नेटका आणि माहितीपूर्ण आहे. श्री. प्रकाश बाळ, श्री. भिडे यांचे लेख नव्याने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उमेद वाढविणारे आहेत. लोकराज्यचे सर्वच अंक माहितीपूर्ण आणि दर्जेदार असतात. त्याच परंपरेच्या माळेत पुढचा मणी ओवणारा हा विशेषांक आहे. यूपीएससी आणि एमपीएससीसारख्या परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारी झालेल्या विद्यार्थ्यांचे मनोगत होतकरू मुलांसाठी खूपच प्रेरणादायी आहे.

**– प्राजक्ता इनामदार,** कोल्हापूर

### विद्यार्थ्यांना उपयुक्त

यशाचा फॉर्म्युला सांगणारा प्रेरणा विशेषांक, सप्टेंबर २०१४ हा खरच प्रशासकीय सेवा, लष्कर भरती, बँकिंग इत्यादी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरावा. यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या मनोगताने, महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी सुयोग्य दिशा मिळेल. संपादक मंडळाने अतिशय सुबक मांडणी करून अंक सुशोभित केला आहे. राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई याबद्दल माहिती वाचून महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी खरोखरच स्वप्न पाहणे शिकावे व त्याची पूर्तता करण्यास साधने उपयुक्त आहेत असे वाटते. भविष्यात अधिकाअधिक विद्यार्थ्यांच्या पंखात बळ यावे व स्पर्धा परीक्षांमध्ये त्यांनी उज्ज्वल यश मिळवावे ही अपेक्षा आहे.

**– डॉ. मनोज भिडे,** संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई




### करिअरचे विविध मार्ग कळले

स्पर्धा परीक्षा म्हणजे फक्त यूपीएससी आणि एमपीएससी एवढेच सुरुवातीला माहीत असते. मात्र त्यात कोणकोणत्या सेवांचा, पदांचा समावेश असतो याची संपूर्ण माहिती मोजक्याच उमेदवारांना माहीत असते. प्रेरणा विशेषांकाने या परीक्षांची सोप्या शब्दात ओळख करून दिली. या अंकातून करिअरचे विविध मार्ग कळले. आपण या परीक्षा देऊन आवड असलेल्या क्षेत्रात करिअर करू शकतो हेही कळले. स्पर्धा परीक्षेत मराठी टक्का वाढवण्यासाठी झटणाऱ्या संस्थांविषयीदेखील माहिती मिळाली. प्रेरणा आणि माहितीचा मिलाफ या अंकात झाला आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्यांनी हा संपूर्ण अंक एकदा वाचायलाच हवा.

**– भागवत बाहेकर,** किन्होळा, जि. बुलडाणा

### बोलकी मनोगते

लोकराज्यचा सप्टेंबरचा प्रेरणा हा विशेषांक खूपच सुंदर झाला आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या आणि देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असा आहे. केवळ स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नव्हे तर सध्या जे नोकरीत आहेत अशांनाही पुढील पदोन्नती मिळविण्यासाठी तो उपयुक्त ठरेल यात शंका नाही. या विशेषांकातील यशस्वी विद्यार्थ्यांची मनोगते खूपच बोलकी आहेत. प्रतिकूल परीस्थितीत जिद्द आणि कष्टाच्या जोरावर यश कसे मिळवले हे प्रेरणादायक आहे.

**– सारंग खानापूरकर,** पुणे

### बोलके लेख

स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक असते. ते मिळाले तर ते योग्य दिशेने वाटचाल करू शकतात. लोकराज्यचा प्रेरणा विशेषांक योग्य मार्गदर्शन करणारा आहे. नेमका अभ्यास कसा करावा, किती करावा, कोणती पुस्तके वाचावी आदींविषयी इत्थंभूत माहिती या अंकात आहे. या अंकातील लेख एवढे बोलके आहेत की, प्रत्यक्षात यशस्वी उमेदवार आपल्याशी संवाद साधत असल्याची अनुभूती होते. त्यामुळे अंक वाचत असताना स्फुरण चढते आणि आपणही खूप काही करू शकतो, असा आत्मविश्वास जागृत होतो.

**– गजानन पडोळ,** औरंगाबाद


## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...


**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी**

http://dgipr.maharashtra.gov.in


* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# कार्यक्षम .. लोकाभिमुख.. पारदर्शक

**श्री.** देवेंद्र फडणवीस यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यांच्या रूपाने राज्याला एक चतुरस्र प्रतिभेचा कणखर आणि सुसंस्कृत प्रशासक लाभला आहे. त्यांनी विधी शाखेतील पदवी विशेष प्रावीण्यासह आणि व्यवस्थापन शाखेतील पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए) प्राप्त केली आहे. अविरत परिश्रम, निष्ठा, ध्येयाची स्पष्टता आणि प्रांजळपणा या गुणांच्या बळावर अशक्यप्राय बाबीही साध्य करता येतात, ही बाब मुख्यमंत्र्यांच्या उदाहरणावरून स्पष्ट होते. आजच्या तरुणांनी या गुणांचा आदर्श ठेवायला हवा.

मुख्यमंत्र्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर हे सरकार 'आपलं सरकार' असल्याचे सांगून कार्यक्षमता, पारदर्शकता आणि लोकाभिमुखता यावर आपला सर्वाधिक भर राहील, असे सूतोवाच केले. यापुढे महाराष्ट्राच्या जनतेला विविध सकारात्मक बदल दिसतील याबाबत त्यांनी आश्वस्त केले. मुख्यमंत्र्यांच्या समवेत इतर नऊ मंत्र्यांनी शपथ घेतली. या नव्या मंत्रीमंडळाला लोकराज्य परिवारातर्फे मन:पूर्वक शुभेच्छा.

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अवघ्या काही तासातच 'जय महाराष्ट्र' या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित सह्याद्री वाहिनीवरून प्रक्षेपित होणाऱ्या मुलाखतीच्या कार्यक्रमात श्री. देवेंद्र फडणवीस सहभागी झाले. कोणत्याही दूरचित्रवाहिनीवरील मुख्यमंत्र्यांची ही पहिलीच मुलाखत ठरली. या मुलाखतीद्वारे त्यांनी आपले 'व्हिजन' संपूर्ण महाराष्ट्रापुढे स्पष्टपणे व प्रांजळपणे मांडले. मुख्यमंत्र्यांचा आत्मविश्वास, विविध प्रश्नांची जाण, कणखरपणा, स्पष्टता आणि राज्याच्या चौफेर प्रगतीची त्यांची आस संपूर्ण राज्याने यावेळी अनुभवली. महासंचालनालयासाठी हा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

३१ ऑक्टोबर २०१४ ला माहिती संचालक व प्रभारी महासंचालक प्रल्हाद जाधव निवृत्त झाले. त्यांचा सत्कार मुख्यमंत्र्यांनी, 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमानंतर केला. महासंचालनालयाच्या जडणघडणीत जाधव यांचे मोठे योगदान राहिले आहे. शासनाच्या प्रतिमा निर्मितीसाठी सर्व माध्यमांचा एकात्मिक प्रभावी वापर करून जाधव यांनी आपले कौशल्य सिद्ध केले. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

महासंचालनालयाच्या 'जय महाराष्ट्र' या मुलाखतीच्या कार्यक्रमाने ७०० वा टप्पा गाठला आहे. शासकीय स्वरूपाचा एखादा कार्यक्रम सातत्याने इतका यशस्वी होऊन त्याचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत जावा, ही बाब महासंचालनालयासाठी गौरवास्पद अशी आहे.

२००६ साली महासंचालनालयाने आकाशवाणी माध्यमाची क्षमता ओळखून आकाशवाणीवरून 'दिलखुलास संवाद' हा कार्यक्रम सुरू केला. हा कार्यक्रम ३००० चा टप्पा गाठत आहे. या कार्यक्रमाने लोकप्रियतेची अनेक शिखरे काबीज केली आहेत. आकाशवाणीच्या लोकप्रिय कार्यक्रमांमध्ये या कार्यक्रमाचा ठळकपणे समावेश होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकाशवाणी माध्यमाचा प्रभाव लक्षात घेऊन 'मन की बात' या कार्यक्रमाद्वारे जनतेशी संवाद साधण्यास सुरुवात करून या माध्यमाला राजमान्यता मिळवून दिली आहे.

लोकराज्यच्या नोव्हेंबरच्या अंकात 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातील मुख्यमंत्र्यांच्या मुलाखतीचे संपादित अंश, मुख्यमंत्र्यांना जवळून बघितलेल्या मान्यवरांनी त्यांच्या बहुपेडी व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला वेध, महसूल मंत्री एकनाथराव खडसे यांची मुलाखत, मंत्रीमंडळातील सदस्यांचा परिचय, सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावरील विशेष लेख आदी साहित्याचा समावेश आहे.

लोकराज्यच्या इतर अंकांप्रमाणेच हा अंकही वाचकांना आवडेल याची खात्री आहे.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
सचिव
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)

# पारदर्शक आणि कार्यक्षम सरकार

**महाराष्ट्राचे २७ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतलेल्या देवेंद्र फडणवीस यांची, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमासाठी 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांनी मुलाखत घेतली. यात त्यांनी नव्या सरकारची वाटचाल कशी असेल, नव्या सरकारपुढच्या प्राथमिकता काय आहेत, आव्हाने काय आहेत, राज्याचा आर्थिक कारभार कसा हाकणार अशा अनेक प्रश्नांबाबत आपली सविस्तर आणि स्पष्ट मते नोंदविली. या मुलाखतीचा संपादित भाग...**

**– नगरसेवक, देशातील दुसरे तरुण महापौर, आमदार, पक्षाध्यक्ष अशी पदे तुम्हाला मिळत गेली. मुख्यमंत्रिपदाचे ध्येय कधी होते का?**
खरे सांगायचे झाल्यास पदे डोळ्यासमोर ठेवून कधीच काम केले नाही. पदे मिळत गेली. जेव्हा महापौर झालो तेव्हा वाटले नव्हते की आमदार होईन, आमदार होतो त्यावेळी मुख्यमंत्री होईन असे मुळीच वाटले नाही. राजकारण हे समाजात बदल करण्यासाठी असते हा आमचा विचार आहे. त्यामुळे कोणत्याही पदाची कधीच अपेक्षा ठेवली नाही. अपेक्षांच्या ओझ्याखाली कधीच काम होत नाही. त्यामुळे पदे मिळत गेली, मी कधी कधी स्वतःलाच हा प्रश्न विचारतो की, ही जबाबदारी पेलण्याची ताकद आपल्यात आहे का? आताही मुख्यमंत्रिपदाच्या जबाबदारीचे थोडे दडपण आहे. दडपणापेक्षा मी जास्त याला जबाबदारी म्हणेन. आता यापुढचा कोणताही दिवस माझा नाही तो राज्याचा आहे ही खूणगाठ मनाशी पक्की बांधली आहे.

**– तुम्ही जुन्या मित्रांना जवळ करणार का?**
तुमच्या प्रश्नाचा रोख मला कळला आहे. आम्ही २५ वर्षे सोबत काम केले आहे. आम्ही स्वप्नेही एकत्र बघितली. त्यामुळे ऐकेकाळच्या मित्रपक्षाला सोबत घेऊन काम करू अशी



## राज्य जनतेचे...

राज्यातील सरकार स्थिर ठेवण्यासाठी कटू निर्णय घ्यावे लागले तरी ते घेतले जातील, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. हे राज्य जनतेचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एका वाक्याचा मुख्यमंत्र्यांनी आवर्जून उल्लेख केला ते म्हणाले, पंतप्रधानांनी मला सांगितले आहे की, 'सरकार बचाने के लिए काम मत करो, जनता के लिए काम करोगे तो सरकार गयी भी तो जनता वापस सत्ता देगी.' त्यामुळे सरकार कोणत्याही व्यक्तीसाठी काम करणार नाही, जनतेसाठी काम करेल.

अपेक्षा आहे.

**– असा कोणता क्षण ज्यावेळी तुम्हाला वाटले की आपण मुख्यमंत्री होऊ शकतो. क्रिकेटच्या भाषेत विचारायचे झाल्यास शतक पूर्ण होईल असे वाटले होते का?**

मी भाजपचा महाराष्ट्र प्रदेशचा अध्यक्ष होतो आणि पक्ष आपल्याकडे लक्ष देतोय याची जाणीव होती. निवडणूक प्रचारादरम्यान पक्षाने अनेक जबाबदाऱ्या दिल्या होत्या, त्यामुळे आपल्यावर पक्ष मोठी जबाबदारी देईल, असे वाटत होते. फलंदाजी करायला गेलेला प्रत्येक खेळाडू काही तरी धावा करायच्या एवढेच डोक्यात ठेवतो. तसेच माझेही होते पण शतक होईल, असे कधी वाटले नव्हते.

**–विरोधी पक्षातील नेतेही तुमची स्तुती करतात. खासकरून माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले होते की देवेंद्र फडणवीस हे भाजपचे सर्वार्थाने योग्य असे मुख्यमंत्रिपदाचे दावेदार आहेत, त्याबद्दल काय सांगाल?**

खरे तर हे पृथ्वीराज चव्हाणजींचे मोठेपण आहे. विरोधी पक्षातील नेत्याने आपले कौतुक केल्याने बरेही वाटते, पण खरे तर मी विरोधी बाकावर असताना विविध प्रश्नांवर मांडलेले मुद्दे आणि उपस्थित केलेल्या प्रश्नांचा मला फायदा मिळाला. अनेक प्रश्नांवर मांडलेल्या आक्रमक भूमिकेमुळे मी इथपर्यंत पोचलो. पण मला इथे एक गोष्ट आवर्जून सांगायची आहे की, आमच्याबाबतीत एक गोष्ट नेहमी सांगतात की, हे विरोधात असले की, चांगले असतात आणि सत्ता मिळाली की काम करत नाहीत. आम्हाला राज्याला हे दाखवून द्यायचे आहे की आम्ही सत्तेतही खूप चांगले काम करतो. त्यामुळे पारदर्शी आणि सकारात्मक काम करण्याची जबाबदारी आमच्यावर आहे. नाही तर लोक उद्या म्हणतील, अरे हे तर विरोधातच चांगले होते.

**– सरकार चालविण्यासाठी काही पक्षांचा पाठिंबा घेतला तर त्यांचा दबाव राहील का?**

माझी भाजपच्या नेतेपदी निवड झाल्यावर मी पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांना भेटलो होतो. त्यावेळी त्यांनी एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले, 'देवेंद्र जनता के लीए काम करो, सरकार बचाने के लीए काम मत करो. अगर जनता के लिए काम करते करते सरकार चली भी गयी तो जनता वापस सत्ता देगी.' त्यामुळे आता माझ्यापुढे सरकार वाचविण्याचा प्रश्न नाही. जे सरकारला योग्य वाटेल, जनतेसाठी जे योग्य असेल ते केले जाईल. लोकांना सरकार बदलले आहे आपले सरकार आले आहे याची जाणीव झाली पाहिजे. त्यासाठी बदलांची मालिकाच आणावी लागेल. जनतेला आता पारदर्शक आणि कार्यक्षम कारभार हवा आहे. जिथे पारदर्शकता आहे तिथे कार्यक्षमता नाही आणि जिथे कार्यक्षमता आहे तिथे पारदर्शकता नाही. त्यामुळे आता हे बदलायला लागेल आणि हे बदल दृश्य स्वरूपात असेल. आम्ही निर्णय घेण्याला घाबरणार नाही. जर आमच्या मनाला पटले आणि ते योग्य असेल तर त्यावर टीका झाली तरी निर्णय घेताना कुचराई करणार नाही. सरकारचे काम जनतेच्या हिताचे निर्णय घेणे आणि धोरणे राबवणे हेच असते.यात कोणाही एकाच्या वैयक्तिक लाभासाठी मात्र काम केले जाणार नाही हे मी आवर्जून सांगेन.

**– कापसाचा विचार केला तर एकात्मिक खरेदी योजना आता निरुपयोगी ठरलेली आहे असे आपल्याला वाटते काय? नव्या उपाययोजना काय करणार?**

अगदी खरे आहे. एकाधिकार योजनेमार्फत शेतकऱ्यांना लाभ मिळेल, असे वाटत नाही. हमी भावाचा प्रश्न आहे. मूळात या कापूस उत्पादक क्षेत्रातील सिंचनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शेतीमध्ये आता दीर्घकाळाच्या लाभदायी शेतीचा विचार करावा लागणार आहे. कापसाची शेती करताना वीजपुरवठा, सिंचनक्षमता, कर्जपुरवठा, राज्यनिहाय हमी भाव, उत्तम वाणांचा पुरवठा अशा सर्व घटकांचा नेमके उद्दिष्ट ठरवून विचार करावा लागेल. सोबतच जुन्या सर्वच योजना कालबाह्य ठरवता येणार नाही. आपल्या पायाभूत सुविधांचा, योजनांचा पूर्ण क्षमतेने वापर झाला पाहिजे.

**– तुम्ही अर्थसंकल्पाचे चांगले भाष्यकार आहात. राज्यावर ३ लाख कोटींवर कर्ज आहे. अशावेळी राज्याची आर्थिक घडी कशी बसविणार?**

कर्ज घेण्यास माझी हरकत नाही. सध्याच्या विकसनशील अर्थव्यवस्थेत राज्य कर्जमुक्त वगैरेच्या गोष्टी शक्य नाहीत, पण एक गोष्ट महत्त्वाची आहे ती म्हणजे घेतलेले कर्ज खर्च कोठे होते हे बघणे गरजेचे आहे. विकासकामावर तो पैसा खर्च होतो का? त्यातून परतावा मिळतोय का हे बघणे गरजेचे आहे. त्यातून परतावा मिळणारे भांडवल उभे होते काय? कर्ज वाढत असताना विकास कुठे आहे हेही बघायला हवे.

**– अर्थसंकल्पाचे पावित्र्य भंग होतेय त्याबद्दल काय म्हणाल?**

अगदी खरे आहे. अर्थसंकल्पाचे पावित्र्य जपलेच पाहिजे. वित्तीय तूट कमी करण्याची गरज आहे. गेल्या काही वर्षांत मूळ अर्थसंकल्पापेक्षा पुरवण्या मागण्यांवर जास्त निधी खर्च झाला आहे. त्यामुळे अर्थसंकल्पावेळी वित्तीय तूट कमी दाखविली

## खोचक प्रश्न टाळले नाहीत

गिरीश कुबेर यांनी मुख्यमंत्र्यांना अनेक थेट प्रश्न विचारले, मग ते भ्रष्टाचाराबद्दल, विदर्भाबद्दल किंवा मित्र पक्षांबद्दल असतील, या प्रश्नांना गोलमोल उत्तरे न देता प्रश्नाचा रोख विचारात घेऊन त्यांनी थेट उत्तरे दिली. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर संदिग्ध ठेवले नाही. विचारात स्पष्टता असेल तरच कामात स्पष्टता येते याचा आवर्जून उल्लेख त्यांनी केला.

## पहिलीच घटना

राज्याच्या कारभारात पारदर्शकता असली पाहिजे आणि त्यासाठी जनतेचा सहभाग वेळोवेळी घेतला पाहिजे, अशी भूमिका श्री. फडणवीस यांनी निवडणुकीच्या प्रचारात वारंवार मांडली होती. त्यामुळे शुक्रवारी शपथ घेतल्यानंतर त्यांनी त्याच दिवशी राज्यातील जनतेपुढे नव्या सरकारची ध्येयधोरणे काय असतील याची दिशा स्पष्ट केली. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच शपथविधीनंतर मुख्यमंत्र्यांनी जनतेशी संवाद साधण्याची आणि त्यांच्या मनातील प्रातिनिधिक प्रश्नांना उत्तर देण्याची ही पहिलीच घटना ठरली.

गेली असली तरी ती तशी नाही. पुरवण्या मागण्यांवर खर्च ५-१० टक्के शक्य आहे पण हजारो कोटी रुपये त्यावर खर्च करणे हे योग्य नाही. १३ व्या वित्त आयोगाचे हे शेवटचे वर्ष आहे. त्यामुळे केंद्राकडून निधी मिळवायचा असेल तर आम्हाला वित्तीय तूट कमी दाखवावी लागणार आहे. आधीच्या सरकारने अनेक योजना करून पैसे वाटले असल्याने वित्तीय तुटीचा राक्षस पुढे उभा आहे. त्यामुळे आमचे हक्काचे पैसे मिळणार की नाहीत याबाबत प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे आम्ही केंद्रीय अर्थमंत्र्यांना विनंती करणार आहोत की आम्हाला निधीसाठी आणखी एक वर्ष वाढवून द्या.

**- निवडणुकीदरम्यान तुम्ही राज्य टोलमुक्त करणार असे आश्वासन दिले होते?**

नाही. आम्ही अन्यायकारक टोल रद्द करणार असे म्हटले होते. जगभरात आता टोलचे धोरण स्वीकारले गेले आहे. लोकांना टोल नको आहे असे नाही. आता जे टोल लावले आहेत ते कंत्राटदारांच्या इच्छेनुसार लागले आहेत. त्यात बदल करावाच लागेल. टोलबाबतचे धोरण पारदर्शी ठेवावे लागेल. आणि जे टोल खरोखर अन्यायकारक आहेत ते बंद करावे लागतील.

**- शहरांच्या विकासासाठी काय योजना आहेत.**

मुंबईसारख्या शहाराचा विकास करायचा झाल्यास शहराची वाढ आणि त्याच गतीने पायाभूत सुविधांची वाढ ही गती साधणे आवश्यक आहे. मुंबईत केंद्राची गुंतवणूक वाढली पाहिजे. केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी या अर्थसंकल्पात तशी तरतूद केली आहे पण त्याचबरोबर ती आणखी वाढवली गेली पाहिजे याचा आग्रह धरला जाईल. जगभरात शहर विकासासाठी अशीच पद्धत अवलंबली जाते.

**- स्थानिक संस्था कर अर्थात एलबीटीबाबत काय निर्णय घेणार?**

एलबीटीबाबत व्यापाऱ्यांच्या मनात अनेक प्रश्न आहेत त्यामुळे त्यांचा त्यांना विरोध आहे. त्यामुळे तो रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येईल. मागील सरकारनेही याबाबत काहीतरी उपाय योजण्याचे ठरविले होते, तसा एक मसुदा तयारही झाला होता, त्याबाबत व्यापाऱ्यांनीही सकारात्मकता

---



## तुमच्या पुढील अशी कोणती पाच क्षेत्रे आहेत की ज्यावर तातडीने काम करावे लागेल?

सर्वच क्षेत्रात काम करावे लागेल. त्यामुळे आम्ही प्रत्येक विभागाला सांगितले आहे की, तुमचे उद्दिष्टांचे सादरीकरण करा. नेमके काय केले पाहिजे, कसे केले पाहिजे आणि ते करताना त्यात काय अडचणी येतील, याची माहिती द्या. उद्दिष्ट ठेवून काम केले तरच ते पूर्ण होईल. एका दिवसांत महाराष्ट्र बदलणार नाही हे खरेच पण त्याची प्रक्रिया तरी सुरू करावी लागेल. अगदीच क्षेत्रांची नावे घ्यायची झाल्यास रस्ते, **दळण-वळण, सिंचन, विमानतळे, गुंतवणूक, वीज, कृषी** अशा सर्वच क्षेत्रात काम करावे लागेल. हे बघा उदाहरणच द्यायचे झाल्यास सिंचनाचे क्षेत्र घेऊ. देशात आता ४४ टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे तर महाराष्ट्रात ते अवघे १८ टक्के आहे. त्यामुळे या क्षेत्रात काम करावे लागेल. ठिबकसारख्या योजनांना प्रोत्साहन द्यावे लागेल. प्रतिहेक्टर उत्पादन वाढविले गेले तर शेतकऱ्यांना आपण हमी भाव देऊ शकतो. आपल्याकडच्या कापूस उत्पादकांपेक्षा इतर राज्यातील कापूस उत्पादक जास्त कापूस पिकवितात. आपल्याकडच्या शेतकऱ्यांनाही उत्पादनवाढीसाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे.

## आपलासा वाटणारा नेता

राज्यातील जनतेला देवेंद्र फडणवीस हे आपले नेते वाटतात. त्यांच्या देहबोलीतूनही ते सहज प्रकट होते. मुलाखतीदरम्यान पाण्याची बाटली कॅमेरामनला खटकत होती, त्याने ती काढून टाकण्यासाठी आपल्या सहकाऱ्याला सांगितले. फडणवीस यांच्या ती बाब लक्षात आल्यावर त्यांनी स्वतः बाटली उचलून ठेवली. ही बाब तशी अगदी छोटी होती, मात्र त्यामुळे त्यांच्यावरील संस्कार चटकन लक्षात आले...

दाखविली होती. जर तो निर्णय मान्य असेल तर तो घेतला जाईल. जकात रद्द झाली पाहिजे पण त्याचबरोबर स्थानिक संस्थांना करही मिळाले पाहिजेत. येत्या दोन वर्षात जीएसटी लागू होईल, त्यामुळे हा प्रश्न अगदी काही काळासाठीच असणार आहे.

**– आज गुजरात महाराष्ट्रापेक्षा पुढे आहे, असे म्हटले जाते. आपण प्रचारही तसाच केला होतात. आता राज्यातील गुंतवणूक वाढीसाठी काय प्रयत्न राहतील?**

खरे आहे, काही बाबतीत गुजरात महाराष्ट्रापेक्षा पुढे नक्की गेला आहे. पण आता आपल्याला सर्वच क्षेत्रात प्रगती करून क्रमांक १ चे राज्य करायचे आहे.

मा. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदीजी हेही वारंवार सांगतात की, महाराष्ट्र पुढे गेल्याशिवाय देश पुढे जाणार नाही. त्यामुळे राज्यातील उद्योगांना मूलभूत सुविधा पुरविणे आणि पोषक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. महाराष्ट्राला हा सर्व क्षेत्रांत गुजरातपेक्षाही पुढे घेऊन जाणे हेच आमचे ध्येय असेल आणि या उद्दिष्टपूर्तीवर सर्वाधिक खूश होणारे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी असतील, याची मी ग्वाही देतो. याबरोबरच मी आणखी एक गोष्ट सांगतो की, राज्यातील सरासरी वय २७ वर्षाच्या आसपास आहे. जवळपास ५० टक्के लोकसंख्या २५ वर्षाच्या आतील आहे. त्यामुळे या लोकसंखेला अर्थातच तरुणाईला दिशा आणि कौशल्य देण्याची गरज आहे. रोजगार निर्मितीसाठी उद्योगधंदे जसे राज्यात येणे आवश्यक आहे तसेच तरुणांना कौशल्य देऊन या रोजगार संधीचा फायदा घेण्यासाठी सक्षम करणे हेही गरजेचे आहे. त्याचमुळे केंद्र सरकारप्रमाणेच राज्याचेही एक मानव संसाधन खाते असले पाहिजे, याबाबतचा आम्ही विचार करत आहोत.

### प्रचंड आत्मविश्वास

गेल्या १५ वर्षांपासून विरोधी पक्षातील नेता म्हणून विधानसभेत प्रवेशणारे श्री. फडणवीस यांनी शपथविधी सोहळ्यानंतर शुक्रवारी (ता. ३१) पहिल्यांदा सत्ताधारी पक्षाचे प्रमुख म्हणूनच विधानसभेत प्रवेश केला. राज्याच्या नेतृत्वाचे सुकाणू हातात घेतलेल्या फडणवीस यांच्या देहबोलीतून प्रचंड आत्मविश्वास प्रकट होत होता.

**– सहकाराबाबतचे काय धोरण असेल?**

राज्यातील सहकार वाचला पाहिजे, वाढला पाहिजे हे आमचे धोरण आहे. शेजारील गुजरात राज्यात सहकारी संस्था खासगी कंपनीला विकताच येत नाही. तसाच एक कायदा महाराष्ट्रात लागू करण्याचा आमचा विचार आहे.

**– भ्रष्टाचाराची चौकशी होणार का?**

जिथे सकृतदर्शनी काही घोटाळे झाल्याचे दिसते आहे तिथे त्याचा तपास केला जाईल. पण भ्रष्टाचाराची चौकशी करताना राजकीय सूडबुद्धीने किंवा आकसाने कारवाई केली जाणार नाही. जनतेचा पैसा जनतेच्या तिजोरीत परत गेला पाहिजे ही आमची भूमिका आहे. याबाबत मी एवढेच म्हणेन की मी उक्तीपेक्षा कृतीला जास्त महत्त्व देतो हे लोकांच्या लक्षात येईल.

**–आपण नेहमीच छोट्या राज्याचा पुरस्कार केला आहे, आता तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यात काही फरक पडेल?**

मुळात लक्ष द्या आम्ही काही उर्वरित महाराष्ट्राचे विरोधी नाही. विदर्भाची भूमिका मांडतो म्हणजे आम्ही महाराष्ट्र विरोधी भूमिका घेऊ, असे होऊ शकत नाही. छोट्या राज्यातून विकास होतो हे आम्ही देशाच्या अन्य भागात दाखवून दिले आहे. आताही विदर्भाची सामाजिक आणि सांस्कृतिक ओळख ही उर्वरित महाराष्ट्रासारखीच आहे. आमचे आस्थेचे विषयही तेच आहेत. आम्ही वारसा सांगणार तो छत्रपती शिवाजी महाराजांचाच. विदर्भाचा माणूसदेखील वाट चालणार ती पंढरपूरच्याच विठोबाची. त्यामुळे आर्थिक सामाजिक परिवर्तन हे आमचे धोरण आहे.

**– शब्दांकन : प्रवीण कुलकर्णी**

❑ ❑



**भ्रष्टाचाराचा मुद्दा मोठा बनला आहे. लोकांना प्रत्येक कामाला पैसे द्यावे लागतात, त्याबद्दल काय उपाययोजना करण्यात येतील.**

शपथविधीनंतर आमची पहिली मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्यात आम्ही लोकसेवा हमी कायदा करण्याचा निर्णय घेतला आहे. याद्वारे जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. आगामी आधिवेशनात किंवा अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा कायदा मंजूर होईल. काम करायला आलेला माणूस 'बकरा' वाटला नाही पाहिजे. ज्याचे काम त्याने केले पाहिजे आणि जनतेला ती हमी मिळाली पाहिजे. त्यामुळे हा कायदा करण्यात येणार आहे. माहिती अधिकाराच्या धर्तीवरच त्याचा वापर लोकांना करता येईल. ई-प्लॅटफॉर्म आवश्यक आहे. आमची भूमिका आता सेवा देणारी आहे, त्यामुळे कोणता विभाग कोणती सेवा देतो हे घोषित करणे बंधनकारक आहे. किती वेळात सेवा देणार आहे हे देखील जाहीर करावे लागेल. ई-सर्व्हिसला चालना दिली जाईल. त्यामध्ये अनिवार्यता आणली जाईल. मंत्रालयात सुई पडली तरी जनतेला कळते. त्यामुळे भ्रष्टाचार कमी झाला असे वातावरण तयार होईल आणि भ्रष्टाचार बंद झाल्याची चर्चा लोकांमध्ये निश्चित घडेल, याची मला खात्री आहे.

राज्यातील जनतेने जात-धर्म-पंथ न बघता केवळ विकासाच्या बाजूने कौल दिला आहे. त्यामुळे जनतेला आता विकास हवा आहे. गेल्या १५ वर्षात राज्य अनेक आघाड्यांवर पिछाडीवर राहिले आहे. यापूर्वीच्या सरकारांनी काहीच केले नाही असे आमचे म्हणणे नाही. ज्या योजना लोकाभिमुख आहेत त्यांचा आणखी विस्तार करण्यात येईल, कारभारात पारदर्शकता आणून सर्वसामान्य जनतेला हे सरकार आपले वाटले पाहिजे याकडे कटाक्षाने लक्ष दिले जाईल. कोणत्याही राज्यात दलित-महिला-गरीब यांची सुरक्षा महत्त्वाची असते, त्यांची सुरक्षा आणि विकासाकडे आमचे सरकार कटाक्षाने लक्ष देईल. बेरोजगारी, कुपोषण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे राज्यातील प्रमुख प्रश्न आहेत. त्यामुळे शेतीविकास, आरोग्य आणि उद्योगवाढीसाठी जोरकस पावले टाकले जातील.

**राज्यातील जनतेने मोठ्या आशेने आमच्या हाती सत्ता सुपुर्द केली आहे, त्यामुळे त्यांच्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी नव्या सरकारवर आहे. शेती, उद्योग, शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या क्षेत्रात गतिमान कारभार करून प्रत्येक क्षेत्रात राज्य क्रमांक एकचे होईल या दिशेने वाटचाल करण्यात येईल. *महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस* सांगताहेत राज्याच्या आगामी वाटचालीची दिशा...**

सहकार क्षेत्रही टिकावे यासाठी विशेष योजना आखण्यात येतील. ग्रामीण भागाचा विकास सहकारामुळे झाला आहे. त्यामुळे सहकार चळवळ टिकली पाहिजे, ज्या गरीब शेतकऱ्यांनी भागभांडवल उभारून सहकार चळवळीला मोठे केले त्यांच्या भागभांडवलाची सुरक्षा हा आता कळीचा मुद्दा बनला आहे. त्यामुळे सहकार आणि सभासद यांच्या हिताचे निर्णय घेण्यात येतील.

**शेतीविकासदर वाढीसाठी प्रयत्न**

गेल्या १५ वर्षात महाराष्ट्रात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकऱ्यांची ही परवड थांबविण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात येईल. खासकरून शेतीसाठी पाणी हा कळीचा मुद्दा आहे. शेतापर्यंत पाणी पोचले तर शेतकरी आत्महत्येकडे वळणार नाहीत. मागील काही वर्षांत सिंचनावर खर्च वाढत गेला. सिंचनाखालील क्षेत्र मात्र वाढले नाही. त्यामुळे सिंचनाखालील क्षेत्रवाढीसाठी ठोस कार्यक्रम हाती घेण्यात येईल. त्यासाठी अपुऱ्या सिंचन योजना पूर्ण करण्यावर भर राहील. शेतीला किमान दहा तास वीजपुरवठा कशा रीतीने करता येईल याकडेही लक्ष देण्यात येणार आहे. तसेच शेतीला पाणी पुरवण्याकडेही विशेष लक्ष देण्यात येईल.

# आपले सरकार



## मेक इन महाराष्ट्र




एकेकाळी राज्य उद्योगात क्रमांक एकचे राज्य होते. आजही अनेक उद्योग राज्यात येण्यास उत्सुक आहेत, मात्र त्यासाठी पायाभूत सुविधा सुधारणे आवश्यक आहे. विशेषत: विजेची उपलब्धता होणे आवश्यक आहे, उद्योगांसाठी कुशल कामगार आणि दळणवळणाच्या सोयी उपलब्ध झाल्या तर उद्योग राज्यात येतील. त्यामुळे यासाठी विशेष सेलची निर्मिती करण्यावर आमचा भर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मेक इन इंडिया या संकल्पनेच्या धर्तीवर मेक इन महाराष्ट्र ही संकल्पना राबवण्यात येईल. त्यासाठी उद्योगांना पूरक वातावरण निर्माण करण्यासाठी राज्यातील इन्स्पेक्टर राज घालवून तेथे एक खिडकी योजना राबवण्यात येणार आहे. त्यामुळे उद्योगांना एकाचवेळी एकाच ठिकाणी सर्व परवाने मिळतील. उद्योग वाढले तरच आपण बेरोजगारीवर मात करू शकतो, त्यामुळे गरिबी आणि बेरोजगारी हटविण्याच्या दृष्टीने उद्योगांना पूरक वातावरण निर्माण करून देण्यावर आमचा भर असणार आहे. राज्यातील औद्योगिक वसाहतींचा (एमआयडीसी) आढावा घेतला जाईल. जे उद्योग पुनरुज्जीवित होऊ शकतात त्यांना पुन्हा संधी देण्यात येईल. त्यासाठी खास धोरण आखण्यासाठी आमचे सरकार कटिबद्ध आहे.

तिसऱ्या जलआयोगाच्या शिफारशीनुसार खोरेनिहाय पाणी आडविले जाईल. ठिबक योजनांना प्रोत्साहन देण्यासाठी अनुदानात ९० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा विचार आहे. पाणीवाटपाबाबत समन्यायाची भूमिका राबवण्यात येईल. पाण्याबाबतच्या सर्व कायद्यांचे काटेकोर पालन करण्यात येईल. विदर्भातील कापूस उत्पादकाला सूक्ष्म सिंचनाचा कसा लाभ होईल याकडे लक्ष दिले जाईल.

पडीक जमीन लागवडीखाली आणली तर राज्याच्या कृषीविकासदर वाढीसाठी फायदा होईल, त्यामुळे या पडीक जमिनीवर फळबागा होतील याकडे लक्ष देण्यात येणार आहे.

सध्याच्या अनेक योजनांमध्ये बदल करणेही आवश्यक आहे. त्याचबरोबर शेतींतर्गत असणारे रस्ते रोहयोच्या माध्यमातून करण्यात येतील. शेतीपूरक उद्योगांना चालना देण्यात येईल. जेथे जे पिकते त्या दृष्टीने विचार करून त्या-त्या भागात प्रक्रिया केंद्राची निर्मिती करण्यात येईल. मत्स्यशेती, पशुपालन यासाठी योजना करण्याचा सरकारचा विचार आहे.

शेती पिकवण्याबरोबरच शेतीमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे ही सरकारची भूमिका आहे. एकीकडे कृत्रिमरीत्या भाव वाढविले जाऊ नयेत याची सरकार जशी काळजी घेते, त्याचप्रमाणे कृत्रिमरीत्या शेतीमालाचे भाव कोलमडू नयेत याच्याकडेही सरकार लक्ष देईल. खासकरून कांदा, टोमॅटोसारख्या पिकांचे भाव स्थिर नसतात. हे भाव कोसळले तर शेतकरी कोलमडून जातो. त्यामुळे यासाठी खास कृषी उत्पादन सुरक्षा निधीची निर्मिती करण्यात येईल.

### ऊर्जा क्षेत्रासाठी नवे धोरण

उद्योग आणि शेतीचा विकास हा ऊर्जेच्या विकासावर अवलंबून आहे त्यामुळे राज्याची सध्याची गरज, भविष्यातील निकड ओळखून ज्यादा वीजनिर्मितीवर भर देण्यात येईल, त्याचबरोबर वितरण सुधारण्यासाठी आणि वीज गळती रोखण्यासाठी राज्याचे नवे ऊर्जा धोरण तयार करण्यात येईल. अपारंपरिक ऊर्जास्रोतांच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्यात येईल.

### लोकाभिमुख प्रशासन

राज्यातील जनतेला हे सरकार आपलं वाटले पाहिजे. जनतेला आपला आवाज सरकारपर्यंत पोचवता आला पाहिजे यासाठी ई पोर्टल तयार करण्यात येईल. लोकशाहीत जनताच सार्वभौम असते त्यामुळे जनतेच्या समस्यांचे निराकरण करणे हे सरकारचे दायित्व आम्ही मानतो. त्यामुळे त्यांचा आवाज सरकारपर्यंत पोचविण्यासाठी खास उपाययोजना करण्यात येतील. त्यासाठी मोबाईल ॲप तयार करण्यात येतील. ॲप्सद्वारे तक्रारींची दखल घेण्यात येईल. सरकारी कामे वेळेत व्हावीत याकडेही लक्ष देण्यात येईल.

### महानगरांचा विकास

राज्यातील शहरीकरणाचा वेग प्रचंड आहे. शहराकडे लोकांचा लोंढा वाढत आहे, त्याचबरोबर ग्रामीण भागाचेही झपाट्याने शहरीकरण होत आहे. त्यामुळे शहरांवर ताण येऊन अनेक समस्या निर्माण होत आहेत. खासकरून महानगरांमध्ये दळणवळणाची समस्या निर्माण झाली आहे. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद यांसारख्या शहरांमध्ये वाहतुकीच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी उपाययोजना आखल्या जातील. मुंबई प्रदेशासाठी मेट्रो, मोनोसह बहुमजली रस्ते, जल वाहतूक, एलिव्हेटेड रेल्वेसारखे उपाय योजावे लागतील. त्या दृष्टीने माझे सरकार प्राधान्याने काम करेल.

राज्यात स्मार्ट शहरे वसविण्यात येतील. ग्रामीण भागातून शहरात काही कामानिमित्त येणाऱ्या लोकांना राहायची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी एसटी बसस्थानकावर धर्मशाळा आणि रात्रीचा निवारा केंद्र उभारण्यावर भर राहील.

**पायाभूत सुविधा**

विकासाचा गाडा धावायचा असेल तर त्यासाठी पक्क्या आणि चांगल्या रस्त्यांची गरज आहे. त्यामुळे रस्त्यांच्या विकासाकडे लक्ष देण्यात येईल. त्यासाठी धोरणात्मक बदल केला जाईल. ग्रामीण भागाला पक्क्या चांगल्या रस्त्यांची गरज आहे, त्याचप्रमाणे राज्यातील मोठ्या शहरांना जोडणारे एक्स्प्रेस वेसुद्धा गरजेचे आहेत. विशेषत: मुंबई-जळगाव-नांदेड-सोलापूर-कोल्हापूर-रत्नागिरी आणि पुणे यांना जोडणारे महामार्गांचे जाळे विकसित करण्यावर भर राहील. हे रस्ते विकसित करताना टोल धोरणातही बदल केला जाईल.

**महिला विकास आणि सुरक्षा**

राज्यातील कायदा आणि सुव्यस्थेत सुधारणा करण्यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. त्यांचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पावले उचलली जातील. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न मोठा आहे, त्यामुळे महिला पोलिसांची संख्या वाढवण्याची गरज आहे. महिलांविषयक गुन्हे घडू नये याची काळजी जशी घेतली जाईल, त्याचप्रमाणे अशा गुन्ह्यातील गुन्हेगार मोकाट सुटू नयेत यासाठी न्याय प्रक्रिया जलद राबवली जाईल. महिलांसाठी घराबाहेर सुरक्षित वातावरण निर्माण झाले पाहिजे. महिला विकासात प्रामुख्याने महिलांच्या सुरक्षेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्यासाठी खास महिला पोलिसांची ठाणी स्थापन करण्याचा सरकार विचार करेल.

**शिक्षण आणि युवक कल्याण**

अनेकदा मुलांना दहावी-बारावीनंतर उच्चशिक्षण घेण्याऐवजी अर्थार्जन करावे लागते. त्यामुळे या विद्यार्थ्यांना नोकरी करतानाच पदविका अभ्यासक्रम पूर्ण करता येईल अशी एक अभिनव योजना राबवण्यात येईल. केवळ इंग्रजी भाषेचा अडसर विद्यार्थ्यांना नोकरी मिळविताना येऊ नये यासाठी खास इंग्रजीत प्रावीण्य मिळवून देणारी स्वतंत्र यंत्रणा सुरू करण्यात येईल. विद्यार्थ्यांमधील कौशल्यवाढीवर भर देण्यात येईल. ग्रामीण विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात शेतीविषयक अभ्यासाचा समावेश करण्याचाही विचार आहे. त्याचबरोबर बी.ए., बी.कॉम, बी. एस्सीच्या विद्यार्थ्यांना सहा महिन्यांच्या अनुभव-शिक्षणाची जोड देण्याचाही सरकारचा मानस आहे. ग्रामीण भागात संगणक शिक्षणावर भर देण्यात येणार असून त्यामुळे डिजीटल इंडिया ही संकल्पना आणखी प्रभावीपणे राबवण्यात येईल.

**सामाजिक न्याय**

हे सरकार सामाजिक न्यायासाठी कटिबद्ध आहे. आरक्षणाचा लाभ मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या दहावीच्या प्रमाणपत्राबरोबरच जात प्रमाणपत्र देण्यात येईल. त्याचप्रमाणे जात प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया पारदर्शी करण्यात येईल. वारंवार प्रमाणपत्र सादर करावे लागू नये यासाठी ऑनलाईन तपासणी योजना लागू करता येईल का याचा विचार करण्यात येईल. अपंगांची जबाबदारी ही सर्वांची आहे. त्यामुळे त्यांच्या विकासात समाजाबरोबर सरकारचाही नेहमीच पुढाकार राहील. अपंगांच्या आरक्षण धोरणाची तंतोतंत अंमलबजावणी करण्यात येईल. याप्रमाणेच आदिवासींच्या कल्याणासाठी विविध योजना राबवण्याचा विचार आहे. त्यांच्या हक्कावर गदा येऊ नये याची काळजी घेतली जाईल. आदिवासींच्या वनहक्काचा लढा आम्ही दीर्घकाळ लढलो आहे. तो हक्क त्यांना मिळाला पाहिजे यासाठी कार्यवाही केली जाईल. त्याचबरोबरीने बनावट आदिवासी ओळखून सरकारी नोकरीतील त्यांची घुसखोरी थांबविली जाईल.

**पर्यटन**

राज्यात पर्यटनवाढीला प्रचंड वाव आहे. पर्यटनातून रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणात होते हे आता जगजाहीर आहे. अशा स्थितीत राज्याला लाभलेला प्रचंड मोठा सागरकिनारा आणि गडकिल्ले पर्यटनाच्या नकाशावर ठळकपणे आणण्यासाठी विशेष योजना आखण्यात येतील.

राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी हे सरकार कटिबद्ध आहे. राज्यातील जनतेला 'आपले सरकार' असल्याचा विश्वास वाटेल अशा योजना आणि धोरणे आम्ही प्रभावीपणे राबवणार आहोत.

## महाराष्ट्राची संस्कृती आणि अस्मिता

महाराष्ट्राची संस्कृती आणि अस्मिता कायम राहण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची उभारणी करण्यास प्राधान्य देण्यात येईल. त्याचबरोबर लहुजी वस्ताद व उमाजी नाईक यांच्या स्मारकाचीही उभारणी करण्यात येईल. राज्यातील ऐतिहासिक ठिकाणे जागतिक नकाशावर आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. वाचनसंस्कृती वाढीसाठी प्रयत्न करण्यात येतील.



# सर्व घटकांच्या हितास सर्वोच्च प्राधान्य



**महसूल, कृषी, मदत व पुनर्वसन, उत्पादन शुल्क, पशुसंवर्धन व दुग्ध विकास, मत्स्यव्यवसाय, फलोत्पादन आणि अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री एकनाथराव खडसे यांची विशेष मुलाखत.**

‘बी फोर’ या नावाने प्रसिद्ध असणारा मंत्रालया समोरचा बंगला हा परंपरेने महाराष्ट्राच्या विधानसभेतील विरोधी पक्ष नेत्याला निवासासाठी दिला जातो. या आधी शरद पवार, मधुकरराव पिचड वा नारायण राणे हे जेव्हा विरोधी पक्ष नेता होते तेव्हा त्यांचे वास्तव्य याच बंगल्यात होते. गेली पाच वर्षे एकनाथराव खडसे हे भारतीय जनता पक्षाचे नेते व विधानसभेतील विरोधी पक्ष नेते या नात्याने या बंगल्यात राहत आहेत. खरेतर त्यांचे विरोधी नेता पद तेराव्या विधानसभेच्या स्थापनेबरोबरच समाप्त झाले आहे. सरत्या सप्ताहात ३१ ऑक्टोबर रोजी वानखेडे स्टेडियमवर झालेल्या ऐतिहासिक अशा भव्य सोहळ्यात त्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. पण नव्या मंत्रिदर्जाच्या मोठ्या बंगल्यात जाण्यास अद्याप थोडाफार अवधी असल्याने त्यांचे वास्तव्य सध्या बी फोरवरच आहे. मंत्रिमंडळाच्या क्रमवारीत सध्या उपमुख्यमंत्रिपद नाही. हे पद कोणालाही न देण्याचे नव्या सरकारचे धोरण दिसते आहे. पण मुख्यमंत्र्यांच्या नंतर शपथ घेण्यासाठी झालेला खडसेंच्या नावाचा पुकारा आणि मागच्या सरकारमधील उपमुख्यमंत्र्यांसाठी खास तयार करण्यात आलेल्या मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील दालनावरही झळकलेली खडसेंच्या नावाची पाटी या गोष्टी याचीच ग्वाही देतात की, एकनाथराव खडसे हे या मंत्रिमंडळातील क्रमांक दोनचे नाव राहणार आहे.

मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी खडसे साहेबांकडे महसूल, कृषी, मदत व पुनर्वसन, उत्पादन शुल्क, पशुसंवर्धन व दुग्ध विकास, मत्स्यव्यवसाय, फलोत्पादन आणि शिवाय अल्पसंख्याक कल्याण व औकाफ अशी डझनभर खाती सोपवलेली आहेत. यातूनही त्यांचे श्रेष्ठत्व स्पष्ट व्हावे. शपथविधीनंतर लगेचच नव्या सरकारने कामकाजाला सुरुवात केली. पाठोपाठ मंत्रिमंडळाच्या बैठका पार पडल्या. मध्ये दोन दिवसांची सुटी आली तरी लगेचच मंत्रिमंडळाची बैठक झाली. सहाजिकच राज्यभरातून त्यांना भेटण्यासाठी शुभेच्छा देण्यासाठी ,आणि काही जुनी रखडलेली कामे नव्या मंत्र्यांच्या कानी घालण्यासाठी असंख्य लोक गर्दी करीत आहेत. मंत्रीमंडळाची दीर्घ काळ चाललेली बैठक आटोपून खडसे साहेब बंगल्यावर आले तेव्हाही सर्व दालने प्रतीक्षा करणाऱ्या लोकांनी भरून गेली होती. शिवाय पत्रकार, आमदार, अधिकारी आणि काही मंत्र्यांच्यादेखील गाठीभेटी त्या गर्दीत चालूच होत्या. त्या अशा उत्सवी व उत्साही वातावरणात खडसे यांनी प्रस्तुत प्रतिनिधी बरोबर मनमोकळी बातचीत केली आणि आपल्या मनातील विविध खात्यांच्या कारभाराविषयींच्या संकल्पना मांडल्या.

---

**महसूल विभागासाठी कोणती विशेष योजना तुमच्या मनात आहे?**

महसूल विभाग हा राज्य शासनाचा कणा मानला जातो. राज्यातील ग्रामीण असो वा शहरी असो प्रत्येक व्यक्ती ही या विभागाच्या अखत्यारीत या ना त्या प्रकाराने येतेच येते! शेतकऱ्यांच्या जमिनीचे मोजणी करण्याचे प्रश्न आहेत. या संदर्भात सुदूर संवेदन केंद्राच्या उपग्रहाच्या साहाय्याने मोजणी करून घेण्याचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्य सरकारने हाती घेतला होता. त्या अंतर्गत सर्व राज्यातील जमिनींची शास्त्रशुद्ध मोजणी उपग्रहाद्वारे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे सुदूर संवेदन केंद्र जे हैद्राबाद येथे आहे त्यांच्या माध्यमातून करून घ्यायची

**अनिकेत जोशी**
(ज्येष्ठ पत्रकार)

आहे. तसे झाले तर बागायती व जिरायती अशा दोन्ही क्षेत्रांची मोजणी करून घेता येईल. त्या पद्धतीचे तयार सातबारा उतारे शेतकऱ्यांना घरपोच दिले पाहिजेत. या मोजणीच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाला केंद्राकडून अधिक निधी आता आम्ही मिळवणार आहोत व राज्य आणि केंद्राच्या सहकार्याने हा प्रकल्प पूर्णत्वास नेला जाईल. ५० ते ५५ प्रकारच्या ईनामी जमिनी आहेत, त्याबाबतचे असंख्य प्रश्न आहेत. कमाल जमीन धारणा क्षेत्राच्या कायद्यानुसार ज्या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या त्यांचेही प्रश्न आहेत. ते सर्व आपल्याला निकाली काढायचे आहेत.

**कृषी व फलोत्पादन विभागांतर्गत आपण केंद्रीय कृषिमंत्र्यासमवेत तातडीने एक बैठक घेतली, त्याविषयी काही सांगा...**

हो. केळी या फळासाठी पीक विमा योजना लागू करण्यात आली आहे. हवामानातील बदलाचा या पिकावर बरावाईट परिणाम होत असतो. पण त्याने झालेल्या नुकसानीसाठी पीक विम्याचे पैसे शेतकऱ्यांच्या पदरी पडत नाहीत असा विषय होता. जळगाव जिल्ह्यात वाईट हवामानामुळे सात ते आठ हजार शेतकऱ्यांना मोठे नुकसान सोसावे लागले. पण काही महसुली सर्कलमधील बाराशे शेतकऱ्यांना पीकविम्याचा पैसा अजिबातच मिळाला नाही. कारण त्या सर्कलमधील सुदूर संवेदन केंद्राची हवामान मापक यंत्रे कामच करीत नव्हती. या यंत्रांवर हवामानातील बदलाची जी नोंद होत असते ती उपलब्ध न झाल्यामुळे त्या शेतकऱ्यांना भरपायी दिली जात नव्हती. असे बाराशे शेतकरी होते व त्यांच्या विम्याची रक्कम ६९ कोटी होती. मी शपथ घेतल्यानंतर लगेचच या प्रश्नासाठी केंद्रीय कृषीमंत्री राधामोहन सिंग यांच्याबरोबर चर्चा केली. ते स्वत: मुंबईत आले. त्यांच्या समवेत कृषी सचिव डी. के. जैन हे होते. श्री जैन हे महाराष्ट्राचे अधिकारी आहेत. शिवाय कृषी विमा विषय हाताळणारे केंद्रीय कृषी विभागाचे संबंधित उच्च अधिकारीही या बैठकीसाठी खास आलेले होते. आम्ही विमा कंपनीबरोबर चर्चा करून प्रश्न मार्गी लावला.

**कृषी विम्याचे नवे धोरण तुम्ही आणणार आहात का, कारण या विषयात अनेकदा चर्चाही झालेली आहे शेतकऱ्यांना लाभ होतो की नाही असेही प्रश्न पुढे येतात?**

पीक विम्याचे तीन चार प्रकार असतात. एक तर हवामानातील बदलामुळे होणारे पिकाचे नुकसान, दुसरे नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व तिसरे अन्य कारणांनी झालेले नुकसान भरून देणे. शिवाय पिकाच्या प्रकारानुसार विम्यात बदल होत असतो. विमा कंपन्याही यात फार उत्साहाने पुढे येताना दिसत नाहीत. प्रायोगिक तत्त्वावरच गेल्या पाच सहा वर्षात पीक विमा योजना राबवलेली दिसते. एक सर्वंकष धोरण या संदर्भात आणले जाईल. शेतकऱ्यांना फायदा व्हावा अशी रचना केली जाईल. जर राज्य सरकारने पुढाकार घेऊन विम्याचे हप्ते भरले तर नैसर्गिक आपत्तीवेळी राज्य सरकार तिजोरीतून ज्या रकमा मदतरूपाने देते त्यात काही फरक होऊ शकेल का? हाही विचार करावा लागेल. राज्य सरकारच्या तिजोरीवर भार न येता शेतकऱ्याला संकटकाळी, पुरेशी व योग्य भरपायी दिली जाणार असेल व त्यात विमा कंपन्यांनाही लाभ जाणवत असेल अशी योजना जर आखता आली तर हा प्रश्न सुटू शकेल.

**अल्पसंख्याक विभागाशी संबंधित कोणते विशेष मुद्दे तुम्हाला जाणवतात?**

अल्पसंख्याकामध्ये जसे मुसलमान येतात तसेच ख्रिश्चन, जैन, पारसी आदी देखील येतात. नवबौद्धाचेही अल्पसंख्याक म्हणून काही निराळे प्रश्न आहेत, ते या विभागाशी संबंधित असू शकतात. ख्रिश्चन, शिख समाजाच्या सुरक्षा विषयक काही अडचणी, प्रश्न आहेत. त्यांच्यात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याचा मुद्दा हाताळावा लागेल. जे धर्मांतराने ख्रिश्चन अशा मूळ दलित वा इतर मागासांच्या त्यांच्या सवलतींचे मुद्दे आहेत. दफनभूमिच्या तसेच ख्रिश्चनांच्या चर्च आदिंच्या जमिनीचे प्रश्न आहेत. त्यांच्या संस्थांच्या असंख्य जमिनी आहेत, पण त्यांवर अतिक्रमणे झालेली आहेत. बौद्धांच्या दफनभूमीचेही प्रश्न आहेत. मुस्लिम समाजाच्या जमिनी वक्फ बोर्डाकडे असतात. पण त्यातही अतिक्रमणाचे अनेक मुद्दे आहेत. मराठवाड्यात निजामी राजवटीत वक्फकडे सोपवलेल्या हजारो जमिनी अशा

प्रश्नग्रस्त झाल्या आहेत. अतिक्रमणे झाली आहेत. हे व असे अनेक मुद्दे सोडवावे लागणार आहेत. त्या दृष्टीने कसे नियोजन करावे लागेल याचा विचार आम्ही या क्षेत्रातील तज्ज्ञांसमवेत बसून करणार आहोत.

**- संपर्क : ९८६९००४४९६**



**आपल्याकडे जी अनेकविध खाती सोपवण्यात आली आहेत , त्यातील औकाफ व अल्पसंख्यांक कल्याण हे विभाग थोडे निराळे वाटतात, आपण या खात्यांसाठी मुख्यमंत्र्यांकडे पसंती दिली होती काय?**

मला या विभागात काम करण्याची मनापासून आवड होती. मागणी केली असे नव्हे, पण मी इच्छा प्रकट केली होती. तसेही कोणी अल्पसंख्याक समाजाचे मंत्री आमच्याकडे सध्या नाहीत त्यामुळे कोणाकडेतरी या खात्याचा कारभार सोपवावाच लागणार होता. मी ती तयारी दाखवली. याचेही एक कारण आहे. एकतर माझा अल्पसंख्याक समाजात संपर्क चांगला आहे. व आमच्या १९९५ च्या युती सरकारमध्येही अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडवण्यात माझा पुढाकार राहिलेला आहे. हज हाऊस म्हणून जी इमारत आहे त्याची ही हकीकत आहे. आमचे मागचे सरकार आले , त्याआधीपासून ही इमारत पूर्णत: तयार झालेली होती, पण वापराविना पडून राहिलेली होती. त्याचा वापर सुरू झालेला नव्हता, कारण तेथे प्रवेशद्वारावरच काही बांधकाम होते. ते हटवण्याचे प्रश्न होते. ती मंडळी माझ्याकडे आली. मी माहिती घेतली व मग आमचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री गोपिनाथराव मुंडेंकडे तो विषय नेला. त्यांनी तत्काळ कारवाईचे आदेश दिले व आम्ही अडथळे दूर करून हज हाऊसच्या वापराचा मार्ग मोकळा केला. तसे माझे राज्यभरातील अल्पसंख्याक समाजातील पुढाऱ्यांशी चांगले संबंध आहेत, संवाद आहे. या विभागात मी चांगले काम करून दाखवेन असा मला विश्वास आहे.

# अष्टपैलू

माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी विधानसभा निवडणुकीचे निकाल लागण्यापूर्वी एक विधान केले होते. ते म्हणाले होते, 'देवेंद्र फडणवीस चांगले मुख्यमंत्री होऊ शकतात.' योगायोग असा, की राज्यात भारतीय जनता पक्ष हा सर्वाधिक जागा मिळवणारा मोठा पक्ष ठरला. १२२ जागा जिंकून हा पक्ष सत्तेवर आला आणि देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्रीही बनले. पृथ्वीराज चव्हाण यांच्याप्रमाणेच देवेंद्र फडणवीस यांची ओळखही 'मिस्टर क्लीन' अशीच आहे.

**आई-वडलांनी केलेल्या संस्काराची शिदोरी घेऊन मुख्यमंत्र्यांनी आपली राजकीय वाटचाल सुरू ठेवली. वडलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवल्याने सार्वजनिक जीवनात सक्रिय असूनही त्यांनी आपली प्रतिमा स्वच्छ ठेवली. तळागाळापासून राजकारणाला सुरुवात. भाजयुमोचा कार्यकर्ता, नगरसेवक, सततचा प्रवास, भटकंती, वाचनवेड, तंत्रज्ञानाची आवड आणि प्रिय राजकारण असे हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस !**



वास्तविक काँग्रेस आणि भाजप हे दोन भिन्न विचारसरणीचे राष्ट्रीय पक्ष आहेत. या देशात गेल्या साठ वर्षांत अनेक पक्ष उदयास आले. सर्वच पक्षात अनेक नेते असे आहेत की, ते इतर पक्षातही प्रिय असतात. निवडणुकीदरम्यान आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत असतात, टीका होत असली तरी एखाद्या नेत्यामधील नेतृत्वगुण ओळखून त्याचे कौतुक केले जाते. त्याच्या नेतृत्त्वावर विश्वास व्यक्त केला जातो. हा नेता राज्याचे किंवा देशाचे भले करेल. तो रंजल्यागांजल्यांची सेवा करेल. समाजातील सर्वच घटकांना बरोबर घेऊन न्याय देईल अशी भावना व्यक्त करण्यासाठीही धाडस लागते. चव्हाण यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याविषयी व्यक्त केलेले मत नक्कीच फडणवीस यांचा गौरव करणारे आहे.

देवेंद्र फडणवीस हे राज्याचे दुसरे तरुण मुख्यमंत्री आहेत. यापूर्वी शरद पवार यांना मुख्यमंत्री होण्याचा मान अवघ्या ३७ व्या वर्षी मिळाला होता. त्यावेळी राज्यात पुलोदचे (१९७८) सरकार स्थापन झाले होते. त्यानंतर म्हणजेच तब्बल ३६ वर्षांनी राज्याला तरुण मुख्यमंत्री मिळाला आहे. मुख्यमंत्र्यांचे वय सध्या ४४ वर्षे आहे. पुढील पाच वर्षांचे व्हिजन मुख्यमंत्र्यांसमोर आहे. राज्यातील जनतेसाठी काहीतरी करून दाखविण्याची जबर महत्त्वाकांक्षा त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येते.

देशातील अन्य राज्याचा विचार केला तर असे लक्षात येईल की, महाराष्ट्रात आजपर्यंत जे कोणी मुख्यमंत्री बनले त्या सर्वांनाच दूरदृष्टी होती. दूरदृष्टी असलेल्या मुख्यमंत्र्यांमुळेच आज महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. आपल्या

**प्रकाश पाटील**
(पत्रकार, सकाळ पुणे)

कार्यकर्तृत्वाने मुख्यमंत्री राज्यातील जनतेच्या मनावर वेगळा ठसा उमटवतील अशी आशा आहे.

मुख्यमंत्रिपदावर पोचलेल्या मुख्यमंत्र्यांनी तळागाळापासून राजकारणाला सुरुवात केली आहे. कौटुंबिक पार्श्वभूमी राजकारणाची असली तरी त्यांनी स्वकर्तृत्वावर इथपर्यंत मजल मारली आहे असे म्हणावे लागेल. वडील विधानपरिषदेवर आमदार होते. काकू शोभाताई फडणवीस आमदार आणि पुढे युतीच्या काळात मंत्री होत्या. आता स्वत: देवेंद्र फडणवीस तर मुख्यमंत्रीच बनले आहेत.

**फडणवीस घराणे**

कुठल्याही क्षेत्रातील व्यक्ती जेव्हा उच्चपदावर पोहोचते तेव्हा साहजिक त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी जाणून घेणे प्रत्येकाला आवडते. ते कोण? कुठले? याबाबत उत्सुकता असते. फडणवीसांची कर्मभूमी नागपूर असली तरी मुळात फडणवीस घराणे पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाईचे. फडणवीस यांच्या पूर्वजांना चंद्रपूर जिल्ह्याच्या सावली तालुक्यातील मूल हे गाव (सध्या मूल हे तालुक्याचे ठिकाण आहे) वतन म्हणून दिले होते. त्यामुळे फडणवीस घराणे वाई सोडून चंद्रपूर जिल्ह्यात स्थायिक झाले. फडणवीस हे मूळचे वाईचे असले तरी आज तसा वाईशी त्यांचा काहीही संबंध राहिला नाही. मूल शहरात फडणवीस घराण्याची शेती होती. त्यामुळे मुख्यमंत्री

एका शेतकरी कुटुंबातीलच आहेत, असे म्हणावे लागेल.

**मुख्यमंत्र्यांचा जीवनपट**

देवेंद्र फडणवीस यांचा जन्म २२ जुलै १९७० रोजी मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांच्या वडलांचे नाव गंगाधरराव आणि आईचे नाव सरिता. त्यांच्या मोठ्या भावाचे नाव आशिष आहे. गंगाधरराव हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावंत स्वयंसेवक होते. जनसंघाच्या तिकिटावर ते प्रथम विधानपरिषदेत त्यानंतर भारतीय जनता पक्षातर्फे ते विधानपरिषदेवर निवडून आले होते. त्यांनी विधानपरिषदेत आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता. आशिष हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्यकर्ते होते. देवेंद्र फडणवीस यांच्या जडणघडणीत मोठ्या भावाचाही सिंहाचा वाटा आहे.

आई-वडलांनी केलेल्या संस्कारांची शिदोरी घेऊन मुख्यमंत्र्यांनी आपली राजकीय वाटचाल सुरू ठेवली. वडिलांच्या पावलावर पाऊल टाकले आहे. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला आहे.

फडणवीस यांचे शिक्षण नागपुरातील सरस्वती मंदिरात झाले. पुढे धरमपेठ येथील विद्यालयातून पदवी आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून एलएलबी., एम.बी.ए, डिप्लोमा इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, जर्मनीच्या बर्लीन येथून डि. एस. ई. ही पदवीही घेतली आहे.

महाविद्यालयात असतानाच फडणवीस 'भाजयुमो'चे सदस्य बनले. युवकांच्या प्रश्नावर ते नेहमीच झगडत राहिले. एक सामान्य कार्यकर्ता असताना निवडणुकीत भिंती रंगविण्यापासून ते छोटीमोठी कामे करीत असत. पुढे १९९२ मध्ये ते खऱ्या अर्थाने राजकारणाच्या मैदानात उतरले. त्यावेळी त्यांचे वय अवघे २२ वर्षे होते. नागपुरातील रामनगर प्रभागातून त्यांनी नगरसेवकपदाची निवडणूक लढविली. ते विजयी झाले. पुढे पाच वर्षांनी म्हणजेच १९९७ मध्ये ते दुसऱ्यांदा निवडून आले आणि वयाच्या २६ व्या वर्षी नागपूरचे महापौर बनले. नागपूरचे सर्वांत तरुण महापौर होण्याचा मान त्यांना मिळाला. पुढे त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. १९९९ मध्ये ते आमदार म्हणून निवडून आले.



## परिचय

| | | |
|---|---|---|
| जन्म | : | २२ जुलै १९७० |
| वडील | : | गंगाधरराव फडणवीस |
| आई | : | सरिता फडणवीस |
| पत्नी | : | अमृता फडणवीस |
| मुलगी | : | दिवीजा |
| भाऊ | : | आशिष |
| निवासाचा पत्ता | : | निवास २७६, दादासाहेब फडणवीस पार्क, धरमपेठ, नागपूर : ४४००१० |
| उच्चशिक्षण | : | एलएलबी., एम.बी.ए, डिप्लोमा इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, डि. एस.ई. बर्लिन, जर्मनी |

**नगरसेवक ते मुख्यमंत्री**

| | | |
|---|---|---|
| १९८९ | : | वॉर्ड अध्यक्ष,भाजयुमो |
| १९९० | : | पदाधिकारी, नागपूर शहर पश्चिम |
| १९९२ | : | अध्यक्ष, नागपूर शहर भाजयुमो |
| **१९९२ ते २००१** | : | सलग दोन टर्म नागपूर महापालिकेचे सदस्य, दोन वेळा महापौर |
| १९९४ | : | प्रदेश उपाध्यक्ष, भाजयुमो |
| १९९९ ते २०१४ | : | सलग ४ वेळा विधानसभेवर निवड |
| २००१ | : | राष्ट्रीय उपाध्यक्ष, भाजयुमो |
| २०१० | : | सरचिटणीस, महाराष्ट्र भाजप |
| २०१३ | : | अध्यक्ष , प्रदेश भाजप |
| २०१४ | : | महाराष्ट्राचे मुख्यमंत्री. |
| **मतदारसंघ** | **:** | **५२, नागपूर दक्षिण-पश्चिम** |

१९९९ ते २०१४ पर्यंत ते सलग पंधरा वर्षे आमदार आहेत. या वर्षात राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे आघाडी सरकार सत्तेवर होते. त्यांनी विरोधीपक्षातील एक आमदार म्हणून आपला वेगळा ठसा उमटविला आहे. विधानसभेतील अभ्यासपूर्ण कामकाजाची दखल घेऊन त्यांचा उत्कृष्ट संसदपटू म्हणून गौरवही करण्यात आला. तसेच अनेक मानाचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष पद सांभाळतानाही पक्षात त्यांनी आपले वजन निर्माण केले.

२०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या झंझावाताने संपूर्ण देश ढवळून निघाला. त्यापाठोपाठ राज्यातही विधानसभेची निवडणूक झाली. राज्यात नरेंद्र मोदी यांच्या २३ जाहीर सभा झाल्या. प्रदेश भाजपतील ज्येष्ठ नेते नितीन गडकरी, एकनाथ खडसे, सुधीर मुनगंटीवार, विनोद तावडे, पंकजा मुंडे-पालवे आदी ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेत्यांच्या खांद्याला खांदा लावून फडणवीस यांनी महाराष्ट्र पिंजून काढला आणि पक्षाला घवघवीत यश मिळवून दिले.

राज्यात भाजपने सर्वाधिक जागा मिळविल्या आहेत. राज्याचे २७ वे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे ते १८ वे व्यक्ती आहेत. आई-वडील, भावाप्रमाणे त्यांच्या यशस्वी वाटचालीत पत्नी अमृता यांचाही सिंहाचा वाटा आहे. आपली लाडकी कन्या दिवीजा तर त्यांचा जीव की प्राण! भाजयुमोचा कार्यकर्ता, नगरसेवक, प्रवासवेड, वाचनवेड, तंत्रज्ञानाची आवड आणि सर्वात प्रिय राजकारण असे हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस !

जनसंघाचे माजी खासदार रामभाऊ म्हाळगी यांनी म्हटले होते, राज्यकर्त्यांचे वर्तन नेहमी संयमी हवे. राज्यकर्त्यांच्या डोक्यावर बर्फ, तोंडात साखर आणि पायाला भिंगरी हवी. 'सार्वजनिक जीवनात वावरणाऱ्या प्रत्येक राज्यकर्त्याने याचे भान ठेवले पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे संघाच्या मुशीत तयार झाले आहेत. संयमी नेतृत्व म्हणूनच त्यांची ओळख आहे.

**संपर्क : ९८८१९०७२११**

# प्रतिभा आणि प्रतिमा

मुख्यमंत्रिपदाच्या संपूर्ण शपथग्रहण सोहळ्यात देवेंद्र अतिशय गंभीर होता, समोर लाखभर लोक तरी हर्ष व्यक्त करीत होते. पण त्यांच्याकडे स्मित नजरेने बघितले ते शपथग्रहण झाल्यावर, शपथपुस्तिकेवर सही केली तेव्हाच. तोपर्यंत जो चार-दोन मिनिटांचा काळ होता. कदाचित कमीही असेल, पण त्याचा तोच होता, आणि फक्त त्याचा होता. आपल्या आयुष्यातील संघर्ष, मूर्ती घडविण्यासाठी केलेले संस्कार, त्या

**मी, देवेंद्र गंगाधरराव फडणवीस... हे शपथविधीतील शब्द कानावर पडले आणि अंगावर एक वेगळेच रोमांच उभे झाले. त्या क्षणाला दिवंगत गंगाधरराव फडणवीस, वसंतराव भागवत, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे या सर्वांना स्वर्गातही धन्यधन्य वाटले असेल! त्यांच्या मार्गदर्शनात, अनुभवाने शिकत, घडत देवेंद्र राजकारणात यशस्वी होत होत आज महाराष्ट्राच्या एका सर्वोच्च पदावर पोहोचला आहे. तो महाराष्ट्राचा मुख्यमंत्री झाला आहे. तो आज शपथ घेतो आहे. म्हणतो आहे. मी, देवेंद्र गंगाधारराव फडणवीस.... त्या क्षणाला त्याच्या चित्तवृत्ती थरारून गेल्या असतील; पण संयमाचे आवरण ल्यालेल्या देवेंद्र फडणवीसांनी ते जगाला दिसू दिले नाही. ते सर्व भावनांचे कढ आपल्यापुरते सीमित ठेवले. शपथ घेताना टाळ्या वाजत होत्या. जयजयकाराच्या घोषणा दिल्या जात होत्या. त्यांचा मित्रपरिवार तर जणू आपणच मुख्यमंत्री झालो आहोत या स्वप्नात वावरत होता.**



संस्काराचा स्वीकार करणारी मनोवृत्ती, संस्कार करणारे अनेकजण, गंगाधररावांच्या निधनानंतर आई सरिताताईंनी लावलेले वळण, उंच झेप घेण्यासाठी सिद्ध हो, पण जमिनीवर पाय मात्र मजबूत राहू दे, पत्नी अमृताने दिलेली साथ अगदी लहानग्या दिविजाने बाबांना म्हटलेले- बेस्ट ऑफ लक...हे सर्व त्याच्या भोवती गर्दी करीत असणार. खरच मी मुख्यमंत्री झालो असे वाटण्यापूर्वी त्याचा तो होता, व तो म्हणत होता, मी देवेंन्द्र गंगाधरराव फडणवीस!

देवेंद्रचे अनेक 'पहिलेपण' सगळ्यांनी अनुभवले. पहिल्यांदा तो महाराष्ट्रात भाजपाचा मुख्यमंत्री होत होता. आतापावेतो स्वातंत्र्यप्राप्तीपासून कधीही नागपूर नगरीला मुख्यमंत्री या राज्याला देता आला नाही. जुन्या मध्यप्रांतात १९३५ साली डॉ.ना.भा.खरे पंतप्रधान झाले होते. त्यावेळी मुख्यमंत्री हे पद नव्हते. त्यावेळी गांधी-खरे वादही खूप रंगला होता. हा इतिहास खरा पण मुख्यमंत्री होण्याचा मान देवेंद्रला मिळाला. नागपूर नगरीचा महापौर राहिलेली व्यक्ती मुख्यमंत्री होत होती. हा आनंद फक्त देवेंद्रने दिला होता. ज्या स्थानावरून 'मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस' असे मुख्यमंत्री म्हणत होते, ते स्थानही वैदर्भीयांचे होते. मुंबईसारख्या महानगरात एखाद्या वैदर्भीय व्यक्तीच्या नावाने स्टेडियम होणे हा देखील एक वेगळा भाग आहे. नानासाहेब वानखेडे यांच्या नावाने ते

**सुधीर पाठक**
**(ज्येष्ठ पत्रकार, तरुण भारतच्या नागपूर आणि मुंबई आवृत्तीचे माजी संपादक)**

स्टेडियम ओळखले जाते. महाराष्ट्राच्या राजकारणात नानासाहेब वानखेडे एक प्रस्थ होते. ते देखील नागपूर नगरीचे पहिले महापौर होते.

### सुंदर योगायोग

नागपूरच्या पहिल्या महापौरांच्या नावाच्या मुंबईमधील स्टेडियममध्ये नागपूरचा सर्वात तरुण महापौर राहिलेल्या देवेंद्रचा मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. हाही योगायोगाचा भाग म्हणावा लागेल. नानासाहेब वानखेडे यांचा अमरावती मार्गावरील कृष्णवाटिका हा बंगला व देवेंद्रचे त्रिकोणीपार्क धरमपेठ येथील घर यात फार तर अर्धा-एक किलोमीटर अंतर असेल, त्या स्टेडियमवर देवेंद्र संपूर्ण महाराष्ट्राला सांगत होता. एक अभिवचन देत होता. 'मी देवेंद्र गंगाधारराव फडणवीस.'

देवेंद्रच्या रूपाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद विदर्भाकडे चौथ्यांदा येत होते. या आधी मूल

तालुक्यातील मारोतराव कन्नमवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले होते. त्यानंतर वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ सलगपणाने राहिलेले मुख्यमंत्री होते. पण हे दोघेही सत्तेवर येताना सहमतीचे वा संमतीचे मुख्यमंत्री म्हणून आले होते. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री झाले होते. ते शरद पवारांचा त्यांच्यावर सर्वात जास्त विश्वास होता म्हणूनच. पण त्यांनाही निवडताना शरद पवारांनी सर्वांची सहमती घेतली होती. ते तर शंभरटक्के कॉंप्रमाइज्ड कँडिडेट होते. पण देवेंद्रच्या बाबतीत तसे नव्हते, तो सर्वांना घेऊन चालणारा तरीही आपल्या दिशेने जाणारा मुख्यमंत्री होता. म्हणूनच आपल्या सर्वांना आता महाराष्ट्राला देशातील सर्वात प्रगत राज्य करायचे आहे, हे लक्षात घेऊनच तो सांगत होता. बोलत होता. 'मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस'!

आणीबाणीमध्ये देवेंद्रचे वडील गंगाधरराव यांना स्थानबद्ध करण्यात आले होते. त्याचा परिणाम देवेंद्रवर झाला होता. आणीबाणीनंतर गंगाधररावांची सुटका झाली. त्यांच्यावर पक्षाने नवीन जबाबदारी टाकली. विदर्भ पदवीधर मतदारसंघातून ते विधान परिषदेवर आमदार म्हणून निर्वाचित झाले. त्यांच्या कर्तृत्वाला एक मोठे व्यासपीठ उपलब्ध झाले. कामाला नवीन क्षेत्र मिळाले. जी जबाबदारी येईल, ती मागेपुढे न बघता, घरदार न बघता पूर्ण करायची असते. याचे बाळकडूच गंगाधररावाच्या वर्तनातून देवेंद्र फडणवीस यांना मिळाले. जनसंघ हा पक्ष तेव्हा संपला होता. जनता पार्टी या नावाने सर्वजण कार्यरत झाले होते.

त्यावेळी जुन्या जनसंघाचे नेते पक्षाच्या कामाला येत प्रचाराला येत. ते कुठल्याही हॉटेलात वा आमदार निवास वगैरे मध्ये थांबत नसत. त्यांचा मुक्काम कार्यकर्त्यांच्या घरीच राहत असे. विशेषत: जुन्या जनसंघाचे कार्यकर्ते जनसंघाच्या कार्यकर्त्यांकडेच जात. प्रमोद महाजन त्यावेळी सक्रिय राजकरणात आले होते. प्रदेशाची जबाबदारी ते सांभाळीत. या सर्वांना घडविणारे आणि पुढील स्वप्ने दाखवणारे महान संघटक होते वसंतराव भागवत. या सर्वांचा मुक्काम गंगाधररावांकडेच राहत असे. ते सगळे नेते कसे वागतात, किती सहजतेने त्यांचा घरात वावर असतो, आणि नेहमी देशाचा, पक्षाचा विचार कसे करतात हे अनुभव बालपणापासून देवेंद्रला येणे सुरू होते. त्यातून जडणघडण होत होती.

संघ संस्कार तर देवेंद्रवर बालपणापासून होत होते. देवेंद्रचे आजोबा रावसाहेब काशीनाथपंत फडणवीस हे मूळचे मालगुजार होते आणि त्यांचे जे काही खटले वगैरे असत ते चंद्रपूरचे ख्यातनाम वकील मधुकरराव भागवत चालवत असत. मधुकरराव म्हणजे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचे वडील. तेव्हापासून भागवत व फडणवीस कुंटुंबाचा सहज संबंध होता. त्यातून संघ संस्कार देवेंद्रांवर होत होते.

धरमपेठ परिसरात राहणारे बन्याजी जोशी व त्यांचे सुपुत्र आजचे क्षेत्र प्रचारक डॉ. रवींद्र जोशी यांच्याशीही त्यांचा स्नेहसंबंध होता. रा. स्व. संघात विविध सकारात्मक संस्कार केले जातात. रोज शाखेत जात जे घडणे असते तेच खरे घडणे असते. त्यातून होणारे संस्कार खूप खोलवर रुजवणारे असतात. आपल्या बाजूला उभा असलेला स्वयंसेवक कोण आहे. त्याचा दर्जा काय? त्याचे वडील काय करतात. माझे वडील तर आमदार आहेत हा भाव कधीच येत नाही. दोघेही फक्त आणि फक्त स्वयंसेवक असतात.

जसा पालकांच्या दर्जाचा, आर्थिक स्थितीचा संघात विचार होत नाही. तसाच जात-पात धर्म यांचाही विचार होत नाही. त्यातूनच जात-पात विरहित असा देवेंद्रचा उदय झाला आहे. तरी देवेंद्रावर त्याचा कधीच परिणाम झाला नाही. त्यांचे मित्र सर्व जात, पथ, उपपंथ यांचे राहिले आहेत. राजकरणात वावरत असतानाही त्यांनी कधीच जाती पातीचा-धर्माचा विचार केला नाही. हे नक्की शंभर टक्के संघसंस्कार आहेत.

गंगाधररावांचा जसा मित्रपरिवार होता तसाच विस्तारलेला मित्रपरिवार देवेंद्रानी जवळ राखला आहे. गंगाधररावांचा मित्रपरिवारात जसा साधारण भाजी विक्रेता, पानटपरीवाला, चहा देणाराही राहत, तसेच देवेंद्रचेही आहे. सर्व स्तरातील, सर्व जाती-धर्मात विखुरलेला त्यांचा मित्रपरिवार आहे. त्या मित्रपरिवारासाठी काहीही करण्याची देवेंद्राची तयार असते, त्यामुळे सर्व समाजपुरुषच्यावतीने ते महाराष्ट्राला आश्वासन देते झाले आहे. बोलते झाले आहेत. 'मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस'!

**मल्टीनॅशनल कंपनीच्या सीईओची झाक**

देवेंद्राच्या व्यक्तिमत्त्वात राजकारण्याची पारंपरिक झाक दिसत नाही. उलट त्यांच्यात एखाद्या मल्टीनॅशनल कंपनीत असणाऱ्या सीईओची झाक दिसते. हा परिणाम कसा झाला असेल. नियम समजणे, जाणून घेणे व प्रभावीपणाने राबविणे त्यांना कसे जमत असेल. हा प्रश्न अनेकदा पडतो. तो प्रभाव नक्कीच त्यांचे काका. जुन्या पिढीतील सनदी अधिकारी माजी विक्रीकर आयुक्त ना.का.

## वेगळी चुणूक



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वडील गंगाधरराव सक्रिय राजकारणात होते. संघाचे निष्ठावान स्वयंसेवक होते. विलक्षण लोकसंग्रह असणारा तरुण नेता म्हणूनच ते ज्ञात होते. १९७५ साली जून-जुलै महिन्यात ते नागपूर महापालिकेत उपमहापौर म्हणून निर्वाचित झाले होते. पण ते उपमहापौरपद फार काळ अनुभवता आले नाही. महिन्याच्या आतच देशात आणीबाणी लागली. आणि तत्कालीन जनसंघाच्या अन्य नेत्याप्रमाणे तेही स्थानबद्ध झालेत. नागपूरच्या मध्यवर्ती कारागृहात त्यांना ठेवण्यात आले होते. ज्यावेळी मध्यमवर्गीय घरातील कर्ता पुरुष स्थानबद्ध होतो. त्यावेळी त्या घरावर कसे आभाळ कोसळले असेल, याचा आपण अंदाज करू शकतो. त्यावेळी ५-६ वर्षे वय असलेला देवेंद्र फडणवीस यांनी तोवर इंदिरा कॉन्व्हेंटमध्ये जायला सुरुवात केली होती. पण आपल्या वडलांना ते फक्त जनसंघाचे आहेत, म्हणून इंदिरा गांधींनी स्थानबद्ध केले होते, याचा परिणाम त्यांच्यावर झाला होता. त्यांनी इंदिरा कॉन्व्हेंटमध्ये पाय ठेवणेही मान्य केले नाही. त्यानंतर नवीन शाळेत त्याच्या प्रवेशाची व्यवस्था करावी लागली होती.



## अभ्यासू आमदार

आपण अभ्यास केला पाहिजे व सभागृहात फक्त अभ्यासू आमदार म्हणूनच आपली प्रतिमा झाली पाहिजे. याची दक्षता फडणवीस यांनी घेतली आणि म्हणूनच अवघ्या तीन वर्षात ते उत्तम संसदपटू हा गौरव प्राप्त करते झाले आहे. महाराष्ट्राच्या या मुख्यमंत्र्यात आक्रमकता व वार करण्याची जिगर खूप आहे पण त्याचवेळी सांसदीय नियम व शिष्टाचार यांच्या पालनात देवेंद्रनी तज्ज्ञता प्राप्त केली आहे. स्वत:वर त्याचे निर्बंध घातले आहेत. म्हणूनच उगाच हौद्यात येणे, आरडाओरड करणे, सभागृहात गोंधळ करणे, कागदपत्रे फाडणे, राजदंड पळविणे आदी सवंग लोकप्रियतेचे उद्योग त्यांनी केले नाहीत. म्हणूनच मीडियाने त्यांच्याबद्दल एक आदरयुक्त प्रेम राखले आहे. त्यामुळेच उगाच मीडियातील कुणी देवेंद्रचा मित्र म्हणून मिरवीत नाही. संसदीय कायदा, व्यवस्था पाळणे त्यातून ते व्यक्तिमत्त्व साकारले आहे. ते व्यक्तिमत्त्व लोकप्रिय झाले आहे. भाजपात बहुमत मिळाल्यावर वा सर्वांत मोठा पक्ष म्हणून सन्मान मिळाला तर मुख्यमंत्री कोण होणार याचे स्वाभाविक उत्तर देवेंद्र हेच होते.

फडणवीस यांचा आहे. ती वृत्तीही देवेंद्रमध्ये आली आहे, त्या संस्कार भरवशावरच ते महाराष्ट्राला सांगू शकलेत की 'मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस'!

**जीवनश्रद्धा**

देवेंद्राचे रोल मॉडेल शंभरटक्के गंगाधरराव होते. ते स्वत:ही सांगतात की, 'राजकारणात कोणताही निर्णय घेताना मी वडलांचे स्मरण करतो. बाबा कसे वागले असते, असे स्वत:ला विचारतो अन् तसा वागतो'. त्यामुळेच इतके वर्षे राजकारणात वावरूनही दोघेही पितापुत्र कुठल्या वादात कधी अडकले नाहीत. जे चूक असेल, जे गैर असेल, वावगे असेल. कायद्यात बसणारे नाही ते करायचे नाही. ही दोघांचीही जीवनश्रद्धा राहिली. ती श्रद्धा लहानपणापासूनच देवेंद्रात आली आहे. व वर्धिष्णू झाली आहे. वादग्रस्तता जीवनाला स्पर्शूच द्यायची नाही. या त्यांच्या वृत्तीमुळेच ते ठामपणाने सांगू शकलेत. महाराष्ट्राला अभिवचन देऊ शकले. 'मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस'!

गंगाधररावांचे कॅन्सरमुळे अकाली – त्यांची कारकीर्द बहरत असताना –१९८७ मध्ये निधन झाले. त्यानंतर पित्याची राजकीय जबाबदारी सहजपणे देवेंद्रांनी आपल्याकडे घेतली. अ.भा. विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून विद्यापीठाच्या राजकारणात प्रवेश केला. ते विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निर्वाचित झालेत. हे करतानाच एकदा त्यावेळी रा. स्व. संघाचे प्रांत प्रचारक असणाऱ्या प्रा. विलासजी फडणवीस यांनी देवेंद्रांना सांगितले, 'आता राजकारणात उतरायचे आहे'. त्यातून ते सर्वात लहान वयात नगरसेवक झालेत आणि पुढे २६ व्या वर्षी नागपूर नगरीचे पहिले तरुण महापौर झाले. जीवनातील जनसेवेचा भाव तेव्हापासून प्रस्फुरित होऊ लागला. पुढे नागपूर नगरीत मेयर इन कौन्सिलचा प्रयोग झाला. त्यावेळी सर्वांचा नैसर्गिक पर्याय देवेंद्र हेच होते आणि ते महापौर झाले. महापौर असतानाच्या काळात त्यांचा नोकरशाहींशी चांगला संबंध आला. त्यांनी नोकरशाहांना कधी विनाकारण ताणले नाही. पण त्यांना होकारार्थी विचार करण्याची सवय लावली. त्यामुळे नोकरशाहीचे ते चांगले मित्र, स्नेही झालेत. नोकरशाहीचा चांगला विश्वास अर्जित करू शकलेत. त्यामुळेच नोकरशाहांना मित्रत्वाने वागवीत. त्यांच्याकडून चांगले काम करून घेणे देवेंद्रांना चांगले जमते. आता तर ते त्यात तज्ज्ञ झाले आहेत. त्यामुळेच ते मुख्यमंत्रिपदाचे स्वाभाविक पर्याय ठरलेत आणि त्या आधारावरच वानखेडे स्टेडियमवरून संपूर्ण महाराष्ट्राला सांगू शकले की, 'मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस'!

**ठाम नकार देण्याची क्षमता**

सामान्यत: राजकारणात कुणाला नकार देणे जमत नाही हा सार्वत्रिक अनुभव आहे. पण देवेंद्र हे असे राजकारणी आहेत, जे काम होणारे नसेल तर अतिशय स्पष्टपणाने सांगतात, की काम होणार नाही. माणसाला उगाच आशा लावीत आपल्यामागे फिरविणे त्यांच्या 'डीएनए'त येत नाही. मग निर्णयाचे काय परिणाम होतील याचा विचार न करता ते ठामपणाने नकार देऊ शकतात. त्यामुळेच ते राजकारण्यांपेक्षा वेगळे असतात. मात्र काम करायचेच नाही. प्रश्न सोडवायचेच नाहीत हा भाव त्यांच्याकडे कधीही नसतो. देवेंद्र हे नागपूर नगरीचे महापौर असताना पत्रकारांच्या एका नेत्याला खूप जास्त मालमत्ता कर आकारला गेला होता. तो त्यांनी बरीच वर्षे भरला नाही. शेवटी घर जप्त होण्याची व त्याचा लिलाव महापालिकेकरवी करण्याची वेळ आली. आपणावर प्रचंड अन्याय झाला असे वाटून ते पत्रकार, महापौर असलेल्या देवेंद्रांकडे आलेत. देवेंद्र यांनी ती सर्व कागदपत्रे चाळली व सांगितले की काही कर हा तर भरावाच लागेल. त्यानंतरच आपणाला मार्ग काढता येईल.

देवेंद्र यांनी संबंधित अधिकाऱ्याला आपल्या कक्षात बोलावून घेतले आणि सांगितले की आपल्याला यांना मदत करायची आहे. कशी मदत करता येईल ते सांगा. मात्र त्यांना काही कर हा भरावा लागलाच पाहिजे. ते पत्रकारही तेथे होते. देवेंद्रांनी घेतलेल्या पुढाकारामुळे त्या अधिकाऱ्यांनी मार्ग शोधत एक रक्कम द्यावी, असे ठरले पण तेवढी रक्कम त्या पत्रकाराजवळ नसेलच हे जाणून त्याचे हप्ते पाडून देण्यात आले. त्या पत्रकारालाही काम झाल्याचे, अन्याय दूर झाल्याचे समाधान झाले आणि मनपालाही आपला महसूल गमवावा लागला नाही. नोकरशहांना होकार द्यायला लावणे व राजकारणी म्हणून नकार द्यायला शिकणे यातून एक वेगळे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदी आले आणि सांगते झालेत की 'मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस'!

**ध्येयनिष्ठ**

देवेंद्राच्या जीवनात अशक्य, असंभव वाटणारी अशी एकही गोष्ट नाही. सुरुवातीला देवेंद्राचे व्यक्तिमत्त्व चांगले लठ्ठगुट्ठ होते. आकारमानही बरेच जास्त होते. पण एके क्षणी त्यांनी मनात घेतले की, आपले प्रस्थ आवरते घ्यायचे. त्यासाठी आवश्यक असणारी शस्त्रक्रिया करून घेतली. त्यानंतरही आहारावर नियंत्रण ठेवून त्यांनी वजन आटोक्यात राखले आहे. त्यासाठी पहाटे फिरायला जाणे, पहाटपक्षी होणे देवेंद्रानी स्वीकारले ते भरपूर व्यायामही करू लागले त्यातून देवेंद्र इतके रेखीव–आखीव दिसू लागलेत. त्यांनी एका ठिकाणी मॉडेल म्हणून काम करावे अशी गळ त्यांच्या काही मित्रांनी घातली. नागपुरातील ख्यातनाम छायाचित्रकार विवेक रानडे यांनी (तेही देवेंद्रचे मित्रच) शूट केले. नागपूर शहरातील चौकाचौकात देवेंद्रचे ती छायाचित्रांचे होर्डिंग लागले होते.




स्वत: माजी पंतप्रधान अटलजींनीही देवेंद्रचे कौतुक केले होते. त्या कौतुकाच्या बळावर देवेंद्र महाराष्ट्राला सांगते झाले, 'मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस'! पण मॉडेलिंग करणे हा व्यवसाय नव्हता. तो छंद होता. त्या छंदाला नागपूरने खूप भरभरून प्रतिसाद दिला पण त्यानंतर मात्र विवेक रानडे वा शैलेश जोगळेकर यांना देवेंद्रांना मॉडेलिंगसाठी तयार करता आले नाही.

**पंखात मजबूत बळ**

यशाची शिखरे गाठताना, आकाशात उंच झेप घेताना पंखात मजबूत बळ लागत असतं पण त्याचबरोबर लागत असते ते जमिनीवर आपले पाय मजबूत असणे, ठाम उभे राहणे. जमिनीचा आधार सुटला अन् पंखातील बळ संपले की मग वावटळीत उडणाऱ्या पतंगाप्रमाणे दिशाहीन प्रवास सुरू होतो. हेलकावणे सुरू होते. राजकारणात हा अनुभव नेहमी येत असतो. पण अन्य राजकारणांपेक्षा देवेंद्र हे वेगळे निघाले आहेत. आपल्या पायाखालील दगड घसरणार नाहीत. जमिनीवर पाय मजबूत राहतील याची दक्षता घेतली आहे. म्हणूनच ते म्हणू शकले. ...मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस!

सामान्य स्थिती: दबाव व तापमानात वैज्ञानिक भाषेत ज्याला NTP म्हणतात. त्यावर सर्व नेते सारखे असतात. त्यांच्यात समान नेतृत्वगुण असतात. पूर्वी अभ्यासलेल्या, अन्यांनी चोखाळलेल्या मार्गावरून ते वाटचाल करीत असतात. अशा मार्गक्रमणातही ते यशस्वी होतात पण जेव्हा NTP नसते. परिस्थिती सामान्य नसते त्यावेळी डोके शांत ठेवणे आणि सारासार विचार करून निर्णय घ्यावे असे करावे लागते. त्यात खरा नेतृत्वाचा कस लागतो. देवेंद्र हे महाराष्ट्र भाजपाचे अध्यक्ष होते आणि २५ वर्षे सुखसमाधानाने एकत्र नांदलेली युती फुटली होती. ही युती फुटली आहे, आता वाटा वेगवेगळ्या आहेत. हे नक्की झाल्यावर २५ वर्षांच्या मित्राने कितीही अकांडतांडव केले तरी आपण मात्र त्यांच्यावर टीका करायची नाही हा निर्णय घ्यायला खूप मोठा कलेजा लागतो. हा कलेजा त्यांच्याजवळ होता म्हणूनच ते सांगू शकलेत की, 'सेना आमचा मित्र पक्ष होता. आम्ही मागील २५ वर्षे हातात हात घालून वाटचाल केली. ते प्रसंग आनंदाचे होते. तसेच कठीण परीक्षा घेणारही होते'. राजकारणात अस्पृश्य ठरविलेल्या युगातही हिंदुत्वाच्या मुद्यावर ते एक झाले होते. ही वाटचाल करणे बाळासाहेब ठाकरे आणि प्रमोद महाजन यांनी शिकविले होते.

आज आम्ही एकत्र नाही म्हणून लगेच वाक्प्रहार करणे योग्य ठरणार नाही. आपण सेनेवर अजिबात टीका करायची नाही असा निर्णय त्यांनी घेतला आणि तो कसोशीने पाळला. त्यामुळेही युती तुटूनही भाजप १२२ जागांवर विजयी झाला.

## पंतप्रधानांकडून कौतुक

विधानसभा निवडणूक काळात नागपुरात जी प्रचार सभा झाली त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुक्त कंठाने देवेंद्रचे कौतुक केले होते. सुरुवातीला त्यांनी चंद्रपूरचे हंसराज अहीर यांनी कोळसा घोटाळा उघडला म्हणून त्यांचे कौतुक केले पण देवेंद्रचे कौतुक करताना त्यांचे शब्द अतिशय अलवार व साहित्यिक होते. वास्तविक या शब्दांनी स्पष्ट झाले होते की, नेतृत्वाची हवा कोणत्या दिशेने वाहत आहे. त्या वेळी देवेंद्रही मोदींच्या समवेत व्यासपीठावर होते. संकोचलेले देवेंद्र त्यावेळी बघायला मिळाले. काहीसे संकोचतच त्यांनी जनतेला अभिवादन केले होते. नमस्कार केला होता. अगदीच मीडियाने गाठले तर हा नेता म्हणाला होता. 'नरेंद्रभाईंनी कौतुक केले. आमच्या नेत्याने कौतुक केले याचा आनंद आहे. पण म्हणून मुख्यमंत्री म्हणून वगैरे काही नाही. बहुमत मिळाल्यावर आमच्या पदाचे निर्वाचित आमदार ठरवितात नेता कोण ते, तोच महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होईल.' तसेच झाले. दिल्लीचा कौल तर आधीच मिळाला होता.

त्यानंतर बहुमताची खात्री असतानाही शिवसेनेशी संपर्क सुरू झाला. सुरुवातीला मुख्यमंत्री शपथविधीवर बहिष्कार टाकणारे सेनेचे नेते उध्दवजी ठाकरे शपथविधीला आले. त्यांनी देवेंद्रचा भाजपाचा मित्रपक्ष वाढला. मी देवेंद्र गंगाधरराव फडणवीस! ही शपथ घेतानाही ते सर्व मित्र समोर होते. समवेत होते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे शब्द, 'देवेंद्र, सरकार वाचविण्यासाठी म्हणून काही करू नको तर जनतेला न्याय देण्यासाठी सरकार चालव. एखादा कटू निर्णय घेण्याची वेळ आली तर तो जरूर घे.....' जनतेसाठी सरकार पणाला लावण्याची क्षमताही त्यांची आहे. असा हा आगळावेगळा मुख्यमंत्री आहे. अशी मुख्यमंत्री देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांची जडणघडण झाली आहे.

**संपर्क : ८८८८३९७७२७**

# कृतिशील महापौर...अभ्यासू आमदार

**राजकारण समाज परिवर्तनाचे साधन पण प्रत्यक्षात तेथे स्वच्छ, प्रामाणिक माणसांना शिरावेसेही वाटत नाही. हे आपले काम नाही, किंबहुना राजकारणाच्या दलदलीत शिरायचे नाही. या समजावर सगळे ठाम असतात. निवडणुकीतला पैशाचा वापर, आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी सुरू असलेली धडपड, यामुळे राजकारणाचे क्षेत्र चांगल्या माणसांनी अस्पृश्य ठेवल्यागत झाले आहे. या दलदलीतही अपवादात्मक चांगली माणसे राजकारणात आली, सर्वोच्चपदाला पोहोचली. महाराष्ट्रात सध्या हा कपिलाषष्ठीचा योग आला आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वाटचाल म्हणजे प्रामाणिक, अभ्यासू आणि मूल्यांसाठी कोणतीही तडजोड न करणारी एक संघर्षयात्रा आहे. तिचा प्रवास खडतर तर होताच पुढचेही भविष्य थोडेफार संघर्षमय असणार हे उघड आहे. पण तत्त्वांचा आग्रह धरणारी व्यक्ती राजकारणात सर्वोच्च स्थानावर पोहोचू शकते, हे सत्य प्रेरणादायी आहे. मुख्यमंत्रिपदी झालेली देवेंद्र फडणवीस यांची निवड प्रचलित काळात व्यवस्थेच्या चांगुलपणावरचा विश्वास निर्माण करणारी आहे. या वाटचालीला शुभेच्छा देताना, त्यांचा आजवरचा प्रवास त्यांना येथवर कसा घेऊन आला, ते तपासणेही उचित ठरेल.

**नियतीची साथ**

कायद्याचे शिक्षण पूर्ण करत असताना फडणवीस यांच्या मनात राजकारणात जाणे होतेच .महापालिका ही नागरी भागातील राजकारणाची प्रशिक्षण शाळा. ग्रामीण भागात पंचायत समिती, जिल्हा परिषद गट ग्रामपंचायती या माध्यमातून नेते तयार होत असतात. शहरी भागात हा मान नगरपरिषदा, महापालिकांना मिळतो. नागपूर महापालिकेची निवडणूक लढण्याचा त्यांचा निर्णय पक्का झाला होताच . पण वय साथ देत नव्हते. दोन वर्षांनी लहान असलेल्या या तरुणाचा राजकारणातला प्रवेश काही काळ लांबेल असे वाटत असतानांच निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. नियतीने साथ दिली. देवेंद्र फडणवीस नगरसेवक झाले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नशिबाची या निवडणुकीपासून जोड मिळाली. पश्चिम नागपुरातल्या दलित वस्त्या, गरिबांच्या वसाहती यातही फडणवीसांनी मोठे संघटन उभे केले.

**नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी यंत्रणा**

स्वत:च्या कोणत्याही कामाची फारशी वाच्यता न करणारे फडणवीस महापालिका राजकारणात रुजून गेले. पहिल्या टर्ममधील यशानंतर भारतीय जनता पक्षाला महापौरपदी पोहोचण्याची संधी मिळाली, तेव्हा या तरुणाची निवड झाली ती कामामुळे, अभ्यासामुळे आणि तत्त्वे जपत उभ्या केलेल्या कार्यकर्त्यांच्या जाळ्यामुळे नगरसेवक म्हणून त्यांनी नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी यंत्रणा उभी केली, महापालिका कार्यालये लोकाभिमुख होतील, याकडे आवर्जून लक्ष दिले. महापौरपदी निवड झाली तेव्हा आव्हाने मोठी होती. मुळात या पदाचे स्वरूप शोभेचे होते. नागपूर




**मृणालिनी नानिवडेकर**
(सकाळ वृत्तपत्र समूहातील ज्येष्ठ पत्रकार)

महापालिका आर्थिकदृष्टया संपन्नही नव्हती. शहराचे प्रश्न उग्र स्वरूपाचे होते. जकात, पाणीपट्टी वसुली, पालिका प्रशासनात उभे झालेले हितसबंधीयांचे जाळे सारेच प्रतिकूल होते. तरुण वयातला महापौर हे प्रश्न सोडवण्याची ममता बाळगतो काय हा प्रश्न होताच. फडणवीस यांनी कोणताही गाजावाजा न करता अत्यंत शांतपणे पावले टाकायला सुरुवात केली.

**नवे पर्व**

शहर सुंदर रहावे, यासाठी थुंकणाऱ्या व्यक्तीने दंड भरावा, असा कायदा तयार झाला. त्यावर बराच वाद झाला. आवश्यक त्या सुविधा देता येत नाही, तर दंड कशाला आकारता असा सूर भाजपने लावला होता. अखेर दबावामुळे हा निर्णय मागे घेण्यात आला. नागपूर त्या वेळी नव्या युगासाठी सज्ज करावे, असा प्रयत्न फडणवीसांनी सुरू केला. मध्यप्रदेशलगतचे राज्य तेथील नदीतले पाणी नागपूरकडे वळवायचे आणि जलनिर्मितीसाठी अडवलेल्या धरणातली वीज मध्यप्रदेशाकडे वळवायची, असा करार महापौर फडणवीसांनी त्या राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांच्याशी केला. नागपूर महानगरात आज पाणीटंचाई नाही, याचे कारण हा करार आहे. फडणवीसांना

नागपुरात महापौरपदाची दुसरी कारकिर्द मिळाली, तेव्हा महाराष्ट्रात भाजप शिवसेना युतीचे सरकार स्थानापन्न झाले होते. त्यातच महापौर परिषदेचा नवा प्रयोग सुरू झाला. या प्रयोगात महापौराला अधिकार होते. नागपुरात काही महत्त्वाचे प्रकल्प या काळात कार्यान्वित झाले. एव्हाना राज्यात पुन्हा सत्ता परिवर्तन झाले. ९९ सालच्या विधानसभा निवडणुकांनी पश्चिम नागपूरला नवा आमदार
दिला–देवेंद्र फडणवीस. यानंतर सुरू झाले ते फडणवीसांच्या राजकीय कारकिर्दीतले नवे पर्व. हे पर्व त्यांच्या कारकिर्दीतला अत्यंत महत्त्वाचा किंबहुना त्याचे राजकीय जीवन घडवणारा टप्पा आहे.

**संसदीय आयुधांचा प्रभावी वापर**

१९९९ साली कोणत्याही पक्षाला निर्णायक कौल मिळाला नव्हता. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस निकालानंतर एकत्र आले. भाजप आणि शिवसेनेला मिळालेली संख्याही लक्षणीय होती. सरकारच्या कारभारावर लक्ष ठेवणे हे विरोधकांचे मुख्य काम. नवनिर्वाचित आमदार देवेंद्र फडणवीस यांनी त्या मार्गावर पुढे जाणे सुरु केले. नागपूर शहराचे प्रश्न मार्गी लावणे हा प्रारंभीच्या काळातला त्यांचा प्राधान्यक्रम असे. मिहान प्रकल्प, गजराज प्रकल्प, नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करण्यासाठी हालचाली या सर्व प्रयत्नांना त्यांनी विविध संसदीय आयुधे वापरत विधीमंडळात वाचा फोडली. त्यांचे दिवंगत वडील गंगाधरराव यांच्या विधिमंडळातील कार्यकर्तृत्वाची सातत्याने आठवण येते, असे ज्येष्ठ पत्रकार आवर्जून नमूद करत. नंतरच्या आमदारकीच्या कार्यकाळात फडणवीस खऱ्या अर्थाने विरोधी पक्षाचा आवाज ठरले. वीज दरवाढी विरोधातले आंदोलन, भारनियमन तसेच सिंचन, वीज या क्षेत्रातले घोटाळे ते विधानसभेच्या समोर आणत. यात कुठेही व्यक्तिगत टीकाटिप्पणी नसे. पण गैरव्यवहाराचे जे पुरावे ते सादर करत ते सत्तापक्षाला अडचणीत आणत. एकदा तर त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या जवळ जाऊ इच्छिणाऱ्या एका उद्योगपतीने जल वाहतुकीसाठी कसा चुकीचा दस्तावेज सादर केला याची माहिती दिली. देवेंद्र तुझी विश्वासार्हता तू स्वत:च धोक्यात आणतो आहेस, असे आरोप केले. पण फडणवीस गप्प बसले नाहीत.

**विदर्भाचा अनुशेष**

विदर्भाच्या अनुशेषाचा प्रश्न हा त्यांच्या जिव्हाळ्यांचा विषय. विदर्भवादी नेते ॲड. मधुकर किंमतकर यांनी सिंचन अनुशेषाबाबत कार्यपालन अहवालाचा आग्रह धरला. तो राज्यपालांनी मान्य केला. मात्र अर्थसंकल्पात तशी तरतूद अर्थमंत्री करत नसत. या मुद्यावर फडणवीस सरकारला अडचणीत आणत. एका अर्थसंकल्पात तर यासंबंधातील कायदेशीर बाजू त्यांनी अशा खुबीने समोर आणली की, राज्याच्या महाधिवक्त्यालाही विरोधी बाक बरोबर असल्याचे मान्य करावे लागले.

**संसदीय लोकशाहीतले मानाचे पान**

फडणवीसांनी २००० ते २०१४ या कालावधीत महानियंत्रकांचे अहवाल, सिंचन घोटाळ्याची चौकशी करणारा चितळे समिती अहवाल सभागृहात सादर केला. सत्तापक्ष या बाबतीत चालढकल करत असताना विरोधी पक्षातला आमदार ज्या शिताफीने काम करे ती लढाई संसदीय लोकशाहीतले मानाचे पान आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आजवर जे बोललो ते आता प्रत्यक्षात आणण्याची संधी मिळाली आहे, हा आत्मविश्वास व्यक्त केला तो याच अनुभवामुळे!

**आव्हानांची जाणीव**

तरुण वयात मुख्यमंत्री झाल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी आव्हानांची जाणीव असल्याची कल्पना देत नवा आराखडा तयार करण्याचा विश्वास व्यक्त केला आहे. बहुमत नाही, सरकारमध्ये फारसे अनुभवी मंत्री नाहीत, असा खरे तर विषम सामना असतानाही फडणवीस कशी वाटचाल करतील? प्रामाणिक आणि पारदर्शी वर्तन हे या लढाईतले त्यांचे मुख्य भांडवल ठरेल. राज्यातील नागरिकांचे सरासरी वय तरुण असतांना त्याच वयोगटातील व्यक्ती प्रमुखपद सांभाळते आहे ही जमेची बाजू . या तरुणाईला रोजगार मिळवून देतानाच राज्याच्या विकासात या शक्तीचा उपयोग करणे हा फडणवीसांचा मार्ग असेल. सचोटीने काम करणारा लोकप्रतिनिधी मुख्यमंत्री होणे ही आनंदाची बाब आहेच, त्यांची कारकिर्द यशस्वी ठरणे, हे चांगुलपणावर विश्वास असलेल्या प्रत्येकाला आवश्यक वाटते आहे.

**– संपर्क : ९८२१५०३०४१**

## नागरी सनद

सर्वप्रथम फडणवीस यांनी कल्पना मांडली ती नागरी सनदेची. नागपूर त्या काळी केवळ उपराजधानीचे बिरुद मिरवायचे. पायाभूत सुविधांची वानवाच, नागरिकांना काय हवे याची मांडणी करणाऱ्या सिटीझन फोरमला हाताशी धरून फडणवीसांनी सर्वांना कोणत्या सुविधा हव्यात. याची आखणी सुरू केली. ते स्वत: जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून तयार झालेले तर सिटीझन फोरम हा साम्यवादी, समाजवादी विचारसरणीचा पगडा असलेला. पण कोणताही पाठभेद मनात न ठेवता या दोन वेगळ्या विचारधारांच्या मंडळींनी सिटीझन चार्टर (नागरी सनदे)ची कल्पना मांडली. मुख्यमंत्री झाल्यावर आज ज्या 'सेवा हमीचा कायदा' करण्याचे फडणवीस नमूद करताहेत त्याचाच हा प्रारंभ होता. नागपूरच्या बहुपक्षीय महापालिकेत या कल्पनेला म्हणावा तितका प्रतिसाद मिळाला, का हा प्रश्नच. पण प्रारंभ तर केला गेला.



**तत्कालीन महापौर देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन महापालिका आयुक्त जे. एस. सहारिया.**

# कणखर आणि सहृदय

***प्रत्येक पर्वतात माणिक सापडत नाहीत, हत्तींकडे मोती नसतात, चंदन सर्व वनांत सापडत नाही, तसे साधू वृत्तीचे लोक सर्वत्र नसतात.***

या ओळींतला आशय वेगवेगळ्या रूपात आयुष्यात आला, बघायला मिळाला. अनेक मोठमोठी माणसे जवळून बघायला मिळाली आणि अनेक मोठ्यांचे स्वल्परूपही दिसले. आयुष्यात अवचित भेटलेल्या काही माणसांना आपण विसरूनही जातो परंतु त्यातील एखादा मात्र कायमचा लक्षात राहतो. आपला संपर्क तुटला तरी. काही काळानंतर तो सर्वोच्च पदावर गेल्याचे दिसल्यावर आपल्यालाही त्या उंचीने श्रीमंत झाल्यासारखे वाटू लागते. देवेंद्र फडणवीस हे असेच अवचित भेटून गेलेले व्यक्तिमत्व. ते वर्ष होते १९९२. लोकसत्ताच्या नागपूर आवृत्तीच्या कामाला नुकती सुरुवात झाली होती. महाराष्ट्र टाइम्सची नोकरी सोडून नागपूरला लोकसत्तात वृत्तसंपादक म्हणून रुजू झाल्यावर अनेक गोष्टींची जुळवाजुळव करायला सुरुवात केली. नेमकी

**अनेकांना हेवा वाटावा असे बलवत्तर नशीब देवेंद्र फडणवीस यांना लाभले आहे. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी प्रत्येक पद पादाक्रांत केले. राजकारणातील त्यांचा चढता आलेख त्याची साक्ष आहे. दोनदा नागपूरचे महापौरपद. अन् तेही अवघ्या २६व्या वर्षी. सलग तीनदा आमदारकी. प्रदेशाध्यक्षपद अन् आता मुख्यमंत्रिपद. सारे कसे कल्पनातीत. त्यांचे व्यक्तिमत्त्व सौम्य दिसत असले तरी बाणा मात्र लढाऊ आणि कणखर आहे. विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात त्याचा अनेकदा अनुभव आला आहे. राजकारणातील व्यक्तीला लागणारी संवेदनशीलता त्यांच्याकडे उपजत असल्यामुळे इतर राजकारण्यांत दिसणारे बनचुकेपण त्यांच्यात कधी आढळले नाही. त्यांच्याकडे मोठी उदारवृत्ती आहे. या उदारतेमुळेच त्यांच्याकडून अपेक्षा खूप वाढल्या आहेत. आपण हे सरकार केवळ चालवण्यापुरते नव्हे तर लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी, विकासासाठी आणि कार्यक्षम करण्यासाठी सत्तेवर आलो आहोत हे त्यांचे उद्गार आश्वासक आहेत.**

**चंद्रशेखर जोशी**
(ज्येष्ठ पत्रकार आणि लोकसत्ता, प्रहार या दैनिकांमध्ये संपादकीय कामांचा प्रदीर्घ अनुभव)

त्याचवेळी नागपूर महापालिकेची निवडणूक तोंडावर आलेली होती. नागपुरात निवडणूक मग ती कोणतीही असो, महापालिका, विधानसभा किंवा लोकसभा, सत्ता कॉँग्रेसचीच हे ठरलेले असायचे. तरीही भाजपचे कार्यकर्ते जिद्दीने उभे राहात आणि आपला मतदार



वाढवित नेत. संधी सोडत नसत. या गडबडीतच एका सायंकाळी सुनील औरंगाबादकर हा मित्र धावतच लोकसत्ताच्या ऑफिसात आला आणि एका उमेदवाराचा छानसा राजकीय 'सीव्ही' करून देतोस काय अशी पृच्छा त्याने केली. पृच्छा कसली? गळच घातली. उमेदवार कोण, कुठला याची काही माहिती नसताना काय लिहून देणार असे भाव चेहऱ्यावर उमटायचाच अवकाश, 'आपल्या गंगाधररावांचा मुलगा रे', असे सांगून त्याने शंका दूर केल्या आणि होकार पदरात पाडून घेतला.



गंगाधररावाचा मुलगा (निवडणूक लढवण्या) इतका मोठा झालाय? हे विचारण्याच्या आत सुन्या निघून गेला होता. दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे मी लिहून ठेवलेला 'सीव्ही' सुनील घेऊन गेला आणि बराच काळ अंतर्धान पावला. त्यानंतर संपर्क नाही, भेट नाही. निवडणुकीच्या प्रचारात ते सगळे गुंतून गेले अन् आम्ही नव्या आवृत्तीच्या तयारीत. या धावपळीत सीव्ही-बीव्हीचे सारे विसरूनही गेलो. काही दिवसानंतर मुंबईला जाण्यासाठी रेल्वे स्थानकावर आलो असताना, अचानक सुनील, माझ्या समोर उभा ठाकला. त्याच्यासोबत उंचपुरी अशी आणखी एक व्यक्ती होती. सुन्याने ओळख करून दिली, हा देवेंद्र! 'सीव्ही'चे प्रकरण तर मी विसरून गेलो होतो. पण देवेंद्रनेच त्याची आठवण करून देत त्यांचे परिचयपत्र चांगले करून दिल्याबद्दल आभार मानले. माझ्या लेखी, मित्राने सांगितलेले काम एवढेच ते होते. देवेंद्र फडणवीस पुढे मुख्यमंत्री होतील याची पुसटशी कल्पनाही तेव्हा आलेली नव्हती.

## देदीप्यमान राजकीय प्रवास

देवेंद्र यांचा पुढचा सारा राजकीय प्रवास आता डोळ्याखालून गेला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या पैतृक संघटनेची स्थापना नागपुरात झाली असली तरी भारतीय जनता पक्षाचा किंवा तेव्हाच्या जनसंघाचा प्रभाव खुद्द नागपुरात फारसा नव्हता. रामप्रकाश आहुजा, सुमतीबाई सुकळीकर आणि नितीन गडकरी यांच्या मातोश्री ताई गडकरी अशी मोजकी मंडळी जनसंघाचा प्रचार करीत. सतरंज्या जमवण्या, घालण्यापासून भाषणाला उभे राहण्यापर्यंत सर्व कामे त्यांच्यावरच पडत. गंगाधररावांचा या तिन्ही घरांशी कौटुंबिक घरोबा. पदवीधर मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढविणाऱ्या गंगाधर फडणवीसांनी नितीन गडकरी यांची राजकारणातील जडणघडण केली तर गडकरी यांनी देवेंद्रची. वयाच्या अवघ्या २२व्या वर्षी गडकरींनी देवेंद्रला पालिकेच्या निवडणुकीत उतरवले आणि रामनगर वार्डातून निवडूनही आणले.

यानंतर देवेंद्र यांनी कधी मागे वळून पाहिलेच नाही. म्हणतात ना आयुष्यात नुसती मेहनत करून उपयोग नसतो. मेहनतीला नशिबाची जोडही लागते. ताई म्हणून प्रसिद्ध असलेल्या सुमतीबाईंनी जनसंघाच्या तिकिटावर अनेकदा आमदारकीची निवडणूक लढवली, कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची शर्थ केली परंतु विजयाने त्यांना नेहमीच हुलकावणी दिली. केवळ सुमतीताईच नव्हे, अनेक जनसंघीयांची त्या काळात ही शोकांतिका होती. पण प्रतिकूलतेतही मनाची उभारी आणि वृत्तीचा पीळ कधी कमी झाला नाही.

## चढता आलेख

देवेंद्र त्यामानाने भाग्यवान आहेत. अनेकांना हेवा वाटावा असे बलवत्तर नशीब त्यांना लाभले आहे. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी प्रत्येक पद पादाक्रांत केले. राजकारणातील त्यांचा चढता आलेख त्याची साक्ष आहे. दोनदा नागपूरचे महापौरपद. अन् तेही अवघ्या २६व्या वर्षी. सलग तीनदा आमदारकी. प्रदेशाध्यक्षपद अन् आता मुख्यमंत्रिपद. सारे कसे कल्पनातीत. नशीब फिदा आहे म्हणून त्यांनी प्रयत्न सोडले असे नाही. उलट नागपुरातील झोपडपट्ट्यांना पाणीपुरवठा करण्यापासून भोपाळच्या युनियन कार्बाइड कारखान्याच्या विषारी घटकांना राज्याबाहेर पाठवण्यापर्यंतच्या प्रश्नांचा शेवटपर्यंत पाठपुरावा करण्यात ते कधी कमी पडले नाहीत. त्यांचे व्यक्तिमत्त्व सौम्य दिसत असले तरी बाणा मात्र लढाऊ आणि कणखर आहे. विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात त्याचा अनेकदा अनुभव आला आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न त्यांनी ज्या पोटतिडकीने मांडला त्यातून त्यांची गरीब शेतकरी कुटुंबाविषयी कळकळच दिसली. राजकारणातील व्यक्तीला लागणारी संवेदनशीलता त्यांच्याकडे उपजत असल्यामुळे इतर राजकारण्यांत दिसणारे बनचुकेपण देवेंद्र यांच्यात कधी आढळले नाही.

## अपेक्षा वाढल्या

चतुरस्त्र रसिकता त्यांच्यात आहे की नाही याची कल्पना नाही परंतु उदारवृत्ती मात्र निश्चित आहे. या उदारतेमुळेच त्यांच्याकडून अपेक्षा खूप वाढल्या आहेत. अपेक्षांचे हे ओझे, युती आघाडीतील घटकपक्षांचे ब्लॅकमेलिंग, रुसवेफुगवे निस्तरता निस्तरता त्यांच्यातील सहृदय माणूस कायम राहायला हवा. आपण हे सरकार केवळ चालवण्यापुरते नव्हे तर लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी, विकासासाठी आणि कार्यक्षम करण्यासाठी सत्तेवर आलो आहोत हे त्यांचे उद्गार आश्वासक आहेत. द्रव्यार्थी मनुष्य लघुदृष्टीचा असतो, तसा राजकारणी माणसाचा आवाका, समज संकुचित असतो. पण मुत्सद्दी, बुद्धिमान दर्जाचा माणूस दूरवरचे पाहतो असे नित्से या तत्त्वज्ञाने म्हटले आहे. फडणवीस यांचे आजवरचे कार्य पाहता त्यांना त्यातील दुसरा भाग लागू पडतो.

## सकारात्मकता सांगणारी यशोगाथा



राजकारणात थोडेफार स्थान मिळालेली माणसे थोडक्या काळात, पोकळ मिजाशीत किती मस्तवाल होतात हे अनुभवल्यानंतर एवढ्या कमी वयात इतके सारे मिळालेल्या देवेंद्र यांच्यासारख्या व्यक्तीचे पाय जमिनीवर कसे असा प्रश्न कोणालाही पडणे स्वाभाविक आहे. परंतु ही किमया त्यांनी करून दाखवली ती त्यांच्यावरील संस्कारांनी. प्रचंड जनसंपर्क, कोणाचेही विधायक काम करण्याची तयारी, मनाची सहृदयता, कळकळ, उत्तम स्मरणशक्ती, प्रत्येक प्रश्नाचा, समस्येचा सखोल अभ्यास, व्यासंग, लब्धप्रतिष्ठितांऐवजी सामान्यांत वावर, चिकित्सक वृत्ती आणि कायदेशीर बाबींचा आधार हे त्यांच्या तत्पर कार्यकुशलतेचे आणि यशाचे इंगित आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. स्वत: देवेन्द्र यांनीही अपेक्षिले नसेल एवढी राजमान्यता आणि लौकिक, वैभव त्यांना अल्पवयात लाभले आहे. सकारात्मकता सांगणारी त्यांची यशोगाथा आहे.

**संपर्क : ९७६९००४७१४**

मंत्रिमहोदयांचा परिचय

# आपले मंत्री

## प्रभावी आणि कार्यक्षम

अत्यंत अभ्यासू म्हणून परिचित असलेले एकनाथराव खडसे हे विधानसभेवर १९९० पासून निवडून येत आहेत. यंदाची त्यांची निवडून येण्याची सहावी वेळ. खडसे यांना प्रशासकीय कामकाजाचा दांडगा अनुभव आहे. जून १९९५ ते सप्टेंबर १९९५ या काळात उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री आणि सप्टेंबर १९९५ ते जून १९९७ या कालावधीत वित्त व नियोजन खात्याचे मंत्री, जून १९९७ ते ऑक्टोबर १९९९ या कालावधीत पाटबंधारे विभागाचे मंत्री म्हणून त्यांनी आपला ठसा उमटवला. महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून प्रभावी कामगिरी बजावली. भेदक आवाजातील अभ्यासपूर्ण मांडणीमुळे सरकार पक्षावर वचक ठेवण्यास त्यांना यश मिळाले.

तरुण वयातच त्यांनी सामाजिक व राजकीय कार्यात स्वत:ला झोकून दिले.

महाराष्ट्रासह उत्तर महाराष्ट्रातील राजकारणावर त्यांचा कायम वरचष्मा राहिला आहे. या भागातील राजकीय क्षेत्रात स्वत:च्या पक्षाचा प्रभाव राहण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहेत.

त्यांच्यातील नेतृत्वगुणांमुळे त्यांना १९९० ते १९९५ या कालावधीत पुणे विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य म्हणून आणि २००२ मध्ये महात्मा फुले कृषी विद्यापीठ व्यवस्थापक परिषदेचे सदस्य म्हणून संधी मिळाली. त्यांनी १९९० ते १९९५ या कालावधीत भाजप विधीमंडळ पक्षाचे प्रतोद म्हणून आपला प्रभाव पाडला. २००३ ते २००४ या कालावधीत ते भाजपा विधिमंडळ पक्षाचे गट नेते होते.

मुक्ताई सहकारी सूतगिरणी आणि इतर संस्थांच्या माध्यमातून त्यांनी संस्थात्मक कार्यामध्ये आपला ठसा उमटवला आहे.



**एकनाथराव खडसे** **महसूल, कृषी, राज्य उत्पादन शुल्क, अल्पसंख्याक विकास, औकाफ, मत्स्यपालन, पशुसंवर्धन, दुग्धविकास**

### परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | एकनाथराव गणपतराव खडसे |
| जन्म | : | १ जून १९५२ |
| जन्म ठिकाण | : | कोथळी, तालुका मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव |
| शिक्षण | : | बी.कॉम. |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी व इंग्रजी |
| वैवाहिक माहिती | : | विवाहित, पत्नी मंदाकिनी |
| अपत्ये | : | दोन मुली, स्नुषा खासदार रक्षा खडसे |
| व्यवसाय | : | शेती |
| मतदारसंघ | : | २० - मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव |

### राजकीय वाटचाल

- १९९० ते १९९५-पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य
- २००२- पासून महात्मा फुले कृषी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य
- १९९१ ते १९९५ जळगाव भाजप अध्यक्ष
- २००४ पासून अखिल भारतीय भाजपाचे कार्यकारिणी सदस्य
- १९९०-९५ - प्रतोद, भाजपा विधिमंडळ पक्ष
- २००३-०४ व २००७ पासून गटनेता, भाजपा विधानसभा पक्ष
- जून १९९५ ते सप्टेंबर १९९५ उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री
- सप्टेंबर १९९५ ते जून १९९७ वित्त आणि नियोजन खात्याचे मंत्री
- जून १९९७ ते ऑक्टोबर १९९९- पाटबंधारे खात्याचे मंत्री
- ११ नोव्हेंबर २००९ पासून महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते.
- १९९० पासून एकूण ६ वेळा आमदार.

# अभ्यासू व्यक्तिमत्त्व

**वि**धानपरिषदेत सर्व संसदीय आयुधांचा अत्यंत प्रभावी उपयोग करणारे लोकप्रतिनिधी अशी स्वत:ची ओळख निर्माण करणारे सुधीर मुनगंटीवार हे विधानसभेत पाचव्यांदा निवडून आले आहेत. चंद्रपूर आणि बल्लारपूर या मतदारसंघातून त्यांनी विजय मिळवला आहे.

युवा नेता म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीचा प्रारंभ केला. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालयाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी उत्कृष्ट कार्य केले. १९८९ साली त्यांनी बेरोजगारांच्या हक्कासाठी मोर्चाचे आयोजन करून बेरोजगारांच्या प्रश्नांना चालना दिली. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच चंद्रपूर आणि गडचिरोली या आदिवासी जिल्ह्यांसाठी स्वतंत्र गोंडवाना विद्यापीठाची स्थापना होऊ शकली. विद्यापीठामुळे या आदिवासी भागातील युवकांना उच्च शिक्षणाच्या संधी त्यांच्या घराजवळच उपलब्ध झाल्या आहेत.

महाराष्ट्रातील संत परंपरेबद्दल त्यांना अतीव आदर असून, नागपूर विद्यापीठाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे नाव तर संत गाडगेबाबा यांचे नाव अमरावती विद्यापीठाला मिळावे यासाठी त्यांनी विधिमंडळात विविध आयुधांचा वापर करीत हा प्रश्न धसास लावला. विदर्भातील धान उत्पादक, कापूस उत्पादक तसेच खाणींबद्दलचा त्यांचा अभ्यास वाखाणण्यासारखा आहे. १९८७ साली चंद्रपूर जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष, १९९३ साली महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता युवा मोर्चाचे उपाध्यक्ष आणि २०१० मध्ये भाजपाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी आपले नेतृत्वगुण सिद्ध केले. पक्षाचा पाया अधिकाधिक मजबूत करण्यासाठी त्यांनी या काळात अथक परिश्रम घेतले. फेब्रुवारी १९९९ ते १ ऑक्टोबर १९९९ या कालावधीत पर्यटन व ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले. संघटनात्मक कौशल्य, प्रशासकीय कौशल्य, प्रभावी वक्तृत्व, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, विपुल वाचन आणि महाराष्ट्राच्या विविध सामाजिक प्रश्नांची उत्तम जाण यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रभावी घडले आहे.



**सुधीर मुनगंटीवार** **वित्त आणि नियोजन, वने**

## परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार |
| जन्म | : | ३० जुलै १९६२ |
| जन्म ठिकाण | : | चंद्रपूर |
| शिक्षण | : | एम्. कॉम. एलएलबी., बी.जे., डी.बी.एम., एम.फिल. |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी व इंग्रजी |
| वैवाहिक माहिती | : | विवाहित, पत्नी सपना |
| अपत्ये | : | एक मुलगी |
| व्यवसाय | : | शेती |
| मतदारसंघ | : | ७२ - बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर |

## राजकीय वाटचाल

- अध्यक्ष, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय
- अध्यक्ष, राष्ट्रचेतना लोककल्याणकारी संस्था
- १९८९ - बेरोजगारांच्या हक्कासाठी मोर्चाचे आयोजन
- राज्यात स्वतंत्र खनिज विकास मंत्रालयासाठी पाठपुरावा
- चंद्रपूर, गडचिरोली या दोन जिल्ह्यांसाठी स्वतंत्र गोंडवाना विद्यापीठ निर्मितीसाठीच्या लढ्याचे नेतृत्व
- १९८७ -अध्यक्ष, चंद्रपूर जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चा
- १९९३ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता युवा मोर्चा
- १९९६- सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष
- २००२- उपाध्यक्ष, अखिल भारतीय युवा मोर्चा
- एप्रिल २०१०-प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष
- फेब्रुवारी १९९९ ते ऑक्टोबर, १९९९- राज्याच्या पर्यटन व ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री
- १९९५ पासून सतत ५ वेळा आमदार.

# तडफदार आणि संवेदनशील

**अ**खिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ कार्यकर्ता ते राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांचा हा प्रवास राजकारणात येऊ इच्छिणाऱ्या हजारो तरुणांसाठी पथदर्शी आहे. सर्वसामान्य कुटुंबातील तरुणांनाही राजकारणात सच्चेपणा, कठोर मेहनत आणि पक्षावर विश्वास ठेवला तर राजकीय उंचीवर पोहचता येते, ही बाब तावडे यांच्या उदाहरणावरून स्पष्ट होते.

आपल्या सामाजिक कार्याला त्यांनी विद्यार्थी दशेतच सुरुवात केली. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांचे प्रश्न धसाला लावण्याचा प्रयत्न केला. गिरणी कामगारांची वस्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गिरगावमध्ये बी. ई. इलेक्ट्रॉनिक्स पदवी मिळवल्यानंतरही त्यांनी अ.भा.वि.प.चे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणूनच राहण्याचा निर्णय घेतला. त्यांच्यामुळेच अभाविप ही एक परिणामकारक चळवळ म्हणून महाराष्ट्रात उदयास आली. अभाविपचे ते राष्ट्रीय सरचिटणीस होते. त्यानंतर त्यांची भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. बाराव्या व तेराव्या लोकसभा निवडणुकीच्या संचालन समितीचे समन्वयक आणि राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य म्हणूनही त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. एका बाजुला राजकीय प्रवासाचे टप्पे पार करत असताना त्यांनी आपल्या संवेदनशील मनाचेही दर्शन नेहमीच घडवून दिले आहे. त्यातूनच त्यांनी अंतर्नाद प्रकल्पाची सुरुवात केली. २००२ ते २०१४ पर्यंत त्यांनी विधान परिषदेचे सदस्य म्हणून काम केले. २०१२ ते २०१४ मध्ये त्यांनी विरोधी पक्षनेता म्हणून आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

या काळात त्यांनी जनतेच्या अनेक प्रश्नांना सभागृहात मांडून राज्य सरकारचे लक्ष त्याकडे वेधले आहे. राज्यकर्त्यांचे काम सर्वसामान्यांचे जगणे सुसह्य करणे हे असले पाहिजे हा त्यांचा विचार आहे. त्यांना कोणत्याही प्रश्नाच्या मुळापर्यंत जाऊन उकल करण्यास आवडते.

शपथविधीच्या वेळेस श्री. तावडे यांनी, स्वत:चे नाव उच्चारताना वडील श्रीधर यांच्यासोबतच आई विजया यांचा आवर्जुन उल्लेख करून आपले वेगळेपण सिद्ध केले.



**विनोद तावडे** — **शालेय शिक्षण आणि क्रीडा, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा आणि सांस्कृतिक कार्य**

## परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | विनोद श्रीधर तावडे |
| जन्म | : | २० जुलै, १९६३ |
| जन्म ठिकाण | : | मुंबई |
| शिक्षण | : | बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स) |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी, इंग्रजी व मालवणी |
| वैवाहिक माहिती | : | पत्नी, वर्षा |
| अपत्ये | : | एक मुलगी |
| व्यवसाय | : | उद्योग |
| मतदारसंघ | : | १५२ - बोरीवली (मुंबई उपनगर) |

## राजकीय वाटचाल

- अखील भारतीय विद्यार्थी परिषदेचे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून राजकीय कारकिर्दीस सुरुवात.
- अभाविपचे राष्ट्रीय सरचिटणीस म्हणून विशेष कार्य
- १९९५ ते १९९९ आणि २००२ ते २०११ या कालावधीत महाराष्ट्र भाजपाचे सरचिटणीस.
- १९९९ ते २००२ अध्यक्ष, भाजप मुंबई प्रदेश
- २००२-२००८ महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
- २००८ मध्ये विधानपरिषदेवर फेरनिवड
- २३ डिसेंबर २०११ रोजी विधानपरिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदी निवड
- विधान परिषदेत विरोधी पक्षनेता म्हणून प्रभावी कामगिरी
- बाराव्या व तेराव्या लोकसभा निवडणुकीच्या संचालन समितीचे समन्वयक आणि राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य
- अंतर्नाद प्रकल्पाची सुरुवात
- रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी संचालकमंडळाचे सदस्य.
- २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत विजयी.

# कर्मयोगी

**गि**रणी कामगाराचा मुलगा ते राज्याचे मंत्री ही चंद्रकांत पाटील यांची वाटचाल आहे. संघटन कौशल्य आणि समर्पित वृत्ती ही चंद्रकांत पाटील यांची केवळ विशेषणे नसून ती त्यांची ओळख आहे. शिक्षण क्षेत्र, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात दीर्घकाळ त्यांनी काम केले आहे.

पश्चिम महाराष्ट्रात चंद्रकांत पाटील हे नाव चिरपरिचित आहे. अत्यंत संयमी परंतु तितकेच विकासासाठी आग्रही नेता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांची सामाजिक कारकिर्द अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून झाली. १९८० ते १९९३ पर्यंत त्यांनी अभाविपचे पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम केले.

भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाचे सरचिटणीस आणि सांगली, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्याची संघटनात्मक जबाबदारीही त्यांनी पेलली. सध्या ते भाजपचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तर विधानपरिषदेत पक्षाचे प्रतोद आहेत. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे ते सरचिटणीस आहेत. गेल्या ३० वर्षाहून अधिक काळ त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक जबाबदाऱ्या पेलल्या आहेत.

गारगोटीजवळील खानापूर हे पाटील यांचे मूळ गाव. वडील मुंबईत गिरणी कामगार होते. येथेच त्यांनी आपले माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. बीकॉमची पदवी घेत असतानाच त्यांनी अभाविप या विद्यार्थी चळवळीत भाग घेतला. पाटील व त्यांचे सहकारी विनोद तावडे यांच्यामुळेच ही विद्यार्थी संघटना राज्यभर पसरली. विद्यार्थी आणि युवकांचे प्रश्न ते पोटतिडकीने मांडीत असत. त्यामुळे पदवीधर मतदारसंघातून त्यांना तरुणांनी दोनदा निवडून दिले. आधी राष्ट्र मग पक्ष आणि नंतर वैयक्तिक आकांक्षा या धोरणानुसार त्यांनी नेहमी समाजकार्य आणि राजकारण केले. अत्यंत अभ्यासू, संयमी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आग्रही अशी त्यांची ओळख बनत गेली.



## चंद्रकांत पाटील

**सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रमांसह)**

## परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील |
| जन्म | : | १० जून १९५९ |
| जन्म ठिकाण | : | मुंबई |
| शिक्षण | : | बी. कॉम |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी, इंग्रजी |
| वैवाहिक माहिती | : | विवाहित, पत्नी अंजली |
| अपत्ये | : | – |
| व्यवसाय | : | टेलिकॉम मार्केटींग |
| मतदार संघ | : | पुणे पदवीधर मतदार संघ |

## राजकीय वाटचाल

- १९९० ते१९९३–अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय सरचिटणीस
- १९९५ ते१९९९ –राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कोल्हापूर विभागाचे सरकार्यवाह
- भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश माजी सरचिटणीस. सांगली,कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यांची संघटनात्मक जबाबदारी.
- भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशचे उपाध्यक्ष,
- महाराष्ट्र विधान परिषद भारतीय जनता पक्षाचे प्रतोद.
- स्व. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (भारतीय जनता पक्षाचे प्रशिक्षण केंद्र)चे सरचिटणीस, शिक्षण, समाजकारण आणि राजकारणातील अनेक वर्षाचा अनुभव
- विद्याप्रबोधिनीचे अध्यक्ष
- टेलिमॅटिक इंजिनिअर्स प्रा.लि.चे चेअरमन
- २००८ पासून पुणे पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेवर सदस्य
- २०१४ ला पुन्हा पुणे पदवीधर मतदारसंघातून विधानपरिषदेवर सदस्य.

# लढाऊ बाणा

**बी**ड जिल्ह्यातील परळी येथे जन्मलेल्या पंकजा मुंडे यांना वडलांकडून नेतृत्व व चळवळीचे बाळकडू मिळाले. वडलांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या कर्तुत्वाला व व्यक्तिमत्त्वाला उभारी मिळाली. वयाच्या तिसाव्या वर्षी ऑक्टोबर २००९ मध्ये परळी मतदारसंघातून त्या विधानसभेवर निवडून आल्या.

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्या आकस्मिक निधनामुळे मराठवाड्याच्या नेतृत्वात पोकळी निर्माण झाली होती. ती पोकळी भरून काढण्यासाठी पंकजाताई अविरत परिश्रम घेत आहेत. राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांचे जन्मस्थान सिंदखेडराजा ते राणी अहिल्याबाई होळकर यांचे जन्मस्थान चौंडी अशी २१ जिल्ह्यातून त्यांनी संघर्षयात्रा काढली. राज्यातील ओबीसी समाजाच्या चळवळीचा वारसा त्यांना वडलांकडून मिळाला आहे. बीएस्सी. आणि एम.बी.ए. झालेल्या पंकजा मुंडे-पालवे यांचे संघटन कौशल्य मजबूत आहे. भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुराही त्यांनी लीलया पेलली. विधानसभा निवडणुकीत त्यांनी ८० मतदारसंघात सभा घेतल्या होत्या. ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे, त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्यही त्यांनी केले. वैद्यनाथ सर्वांगीण विकास संस्थेमार्फत शाळा, महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि अभियांत्रिकी महाविद्यालये सुरू केली.



## पंकजा मुंडे

**ग्रामविकास आणि जलसंधारण, महिला आणि बालविकास**

महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी परिसरात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणावर बचतगट स्थापन केले. भटक्या, विमुक्त व इतर मागास घटकातील तसेच आर्थिक दुर्बल घटकातील लोकांना त्यांनी मदत केली आहे.

महिला हक्कासाठी त्यांनी संघर्ष केला असून आपली भूमिका मांडली आहे. स्त्री-भ्रूण हत्येविरोधातही मोहीम उघडून मोठ्या प्रमाणावर जनजागृतीचे काम केले आहे. विविध सामाजिक प्रश्नांवर वेळोवेळी आवाज उठवला आहे. विधानसभेमध्ये प्रभावी काम केल्याबद्दल मुंबईच्या 'न्यूजमेकर्स ब्रॉडकास्टिंग ॲण्ड टेलिकम्युनिकेशन'ने (एनबीसी) त्यांना राजकाराणातील 'उत्कृष्ट वक्ता' पुरस्कार प्रदान केला आहे.

## राजकीय वाटचाल

- वैद्यनाथ सर्वांगीण विकास संस्थेमार्फत शाळा, महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले
- महिलांच्या आर्थिक उन्नतीकरिता बचत गट स्थापन केले, त्या माध्यमातून महिलांना रोजगार व अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले
- भटक्या, विमुक्त व इतर मागास समाजातील तसेच आर्थिक दुर्बल घटकातील लोकांना सतत साहाय्य, ऊसतोड कामगारांच्या उन्नतीसाठी प्रयत्न.
- संचालक, पंडित दिनदयाळ उपाध्याय सहकारी बँक व पन्नगेश्वर सहकारी साखर कारखाना लि.
- ऑक्टोबर २००९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड.
- राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेबांचे जन्मस्थान सिंदखेडराजा ते राणी अहिल्याबाई होळकर यांचे जन्मस्थान चौंडी अशी २१ जिल्ह्यातून संघर्षयात्रा काढली.
- मराठवाड्यात पक्षसंघटन वाढीमध्ये सक्रिय सहभाग
- २००९ पासून २ वेळा आमदार.

## परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | पंकजा गोपिनाथराव मुंडे-पालवे |
| जन्मतारीख | : | २६ जुलै १९७९ |
| जन्मठिकाण | : | परळी, जिल्हा बीड |
| शिक्षण | : | बी.एस्सी., एम.बी.ए. |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी, इंग्रजी |
| वैवाहिक माहिती | : | विवाहित, पती चारुदत्त ऊर्फ अमित |
| अपत्ये | : | एक मुलगा |
| व्यवसाय | : | शेती व समाजसेवा |
| मतदार संघ | : | २३३ - परळी, जिल्हा बीड |




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी वानखेडे स्टेडियम खचाखच भरले होते

# ऐतिहासिक शपथविधी

**दि. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी देवेंद्र फडणवीस यांनी खचाखच भरलेल्या वानखेडे स्टेडियमवर मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक राज्यांतील मुख्यमंत्री उपस्थित होते. राज्यातील उद्योग, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गजांना शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण देण्यात आले होते. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या मुख्यमंत्र्यांचा एवढ्या मोठ्या उत्साहात शपथविधी सोहळा पार पडला. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लोक वानखेडे स्टेडियमवर आले होते. त्यातील काही क्षणचित्रे...**



राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्याकडून मुख्यमंत्री पदाची आणि गोपनीयतेची शपथ घेताना देवेंद्र फडणवीस






पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून अभिनंदन स्वीकारताना



शपथविधी सोहळ्याच्यावेळी बातचित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी व ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी



मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या चाहत्यांनी केलेला अभिनंदनाचा वर्षाव



पत्नी अमृता यांच्यासोबत



खासदार पूनम महाजन फडणवीस कुटुंबीयांचे छायाचित्र काढताना



शपथविधी सोहळ्याला महाराष्ट्रातील विविध धर्मांच्या संत-महंतांना निमंत्रित करण्यात आले होते



राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधराराजे शिंदे, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि माजी केंद्रीय मंत्री प्रफुल्ल पटेल



भाजपचे ज्येष्ठ नेते मुरली मनोहर जोशी, केंद्रीय मंत्री वेंकय्या नायडू आणि शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्री आणि दिग्गज नेते



शपथविधी सोहळ्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले



शपथविधी सोहळ्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांसोबत छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले.

# उत्कृष्ट संघटक

**न**व्या मंत्रिमंडळात उद्योग, खाण आणि संसदीय कामकाज मंत्रिपदाचा कार्यभार सांभाळणारे प्रकाश महेता उत्तम संघटन कौशल्य आणि दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून राजकीय वर्तुळात परिचित आहेत.

लोकसेवा हाच आवडता छंद मानणाऱ्या प्रकाशभाईंनी वयाच्या सतराव्या वर्षी जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता. १९७४ मध्ये बिहार, गुजरातमध्ये छात्र संघर्ष वाहिनी, नवनिर्माण आंदोलनाच्या माध्यमातून भ्रष्टाचार विरोधात लढणाऱ्या विद्यार्थ्यांवर गोळीबार झाला होता. या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रकाशभाईंनी सर्वोदयी चळवळीत सहभागी होऊन आर्थिक मदत उपलब्ध करून दिली.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत सहाव्यांदा विजयी झालेल्या महेतांची राजकीय कारकिर्द जनसंघात सहबुथप्रमुख म्हणून सुरू झाली. त्यानंतर युवक आघाडीचे तालुकाध्यक्ष, भाजपाचे जिल्हा युवक मोर्चाचे प्रभारी अशी विविध पदे प्रकाशभाईंनी भूषविली.

मे १९९५ ते ऑगस्ट १९९६ या कालावधीत त्यांनी गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधार, घरदुरुस्ती व पुनर्बांधणी, नागरी कमाल धारणा, सेवायोजन राज्यमंत्री म्हणून कार्य केले. तसेच ऑगस्ट १९९६ ते जून १९९७ या कालावधीत ते ग्राहक संरक्षण, विशेष साहाय्य आणि पर्यटन खात्याचे मंत्री होते. मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्य उत्पादन शुल्क मंत्री म्हणून यापूर्वी त्यांनी समर्थपणे कार्य केले.

कुर्ता पायजमा अशा साध्या वेषात वावरणाऱ्या प्रकाशभाईंना निवांतपणे ध्यानधारणा आणि आध्यात्मिक वाचन करायला आवडते. जनतेला त्यांचे हक्क आणि सोयीसुविधा मिळाव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत.



**प्रकाश मंछुभाई महेता** **उद्योग आणि खानिकर्म, संसदीय कार्य**

## राजकीय वाटचाल

- १९७५ जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनात सहभाग
- १९९९ संस्थापक, जैन जागृती सेंटर, पंतनगर
- अध्यक्ष, जागृती ग्रुप, घाटकोपर
- सल्लागार, युथ फोरम ट्रस्ट, चिराग युथ फाउंडेशन व संस्थापक, घाटकोपर एज्युकेशन अँड चॅरिटेबल संस्था.
- मे १९९५ ते ऑगस्ट १९९६ – गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधार, घरदुरुस्ती व पुनर्बांधणी, नागरी कमाल धारणा व सेवायोजन राज्यमंत्री
- ऑगस्ट १९९६ ते जून १९९७ – ग्राहक संरक्षण, विशेष साहाय्य आणि पर्यटन खात्याचे मंत्री व मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री
- जून १९९७ ते जुलै १९९९ – राज्य उत्पादन शुल्क व विशेष साहाय्य खात्याचे मंत्री व ऑगस्ट १९९६ ते ऑक्टोबर १९९९– मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री.
- १९९० पासून सलग ६ वेळा आमदार.

## परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | प्रकाश मंछुभाई महेता |
| जन्मतारीख | : | २२ एप्रिल १९५९ |
| जन्मठिकाण | : | घाटकोपर, जिल्हा मुंबई उपनगर |
| शिक्षण | : | एस.एस.सी. |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराथी |
| वैवाहिक माहिती | : | विवाहित, पत्नी किशोरी |
| अपत्ये | : | दोन मुलगे |
| व्यवसाय | : | व्यापार |
| मतदारसंघ | : | १७०–घाटकोपर (पूर्व), जिल्हा मुंबई उपनगर |

# साधेपणा आणि सच्चेपणा



**विष्णू सवरा** — **आदिवासी विकास, सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य**

**आ**दिवासी व मागास भागाचे नेतृत्व करण्याची चांगली हातोटी असलेले विष्णू रामा सवरा यांचा कॅबिनेट मंत्र्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र सरकारमध्ये त्यांच्यावर आदिवासी विकास, सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य विभागाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. फेब्रुवारी १९९९ ते ऑक्टोबर १९९९ मध्ये युती सरकारच्या काळात त्यांनी आदिवासी विकासमंत्रीपदाची धुरा सांभाळली होती.

व्यवसायाने शेतकरी असलेले विष्णू रामा सवरा यांनी पुणे विद्यापीठातून १९७३ मध्ये बी. कॉम मध्ये पदवी मिळवली आहे. पूर्वी भारतीय स्टेट बँकेत नोकरी करणारे सवरा मागासलेल्या समाजाच्या उन्नतीसाठी राजकारणात उतरले. राजकारणात राहूनही त्यांनी समाजकारण करत साधेपणा आणि आपली प्रतिमा जपली आहे. समाजकार्यात त्यांचे भरीव योगदान राहिले आहे. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये ते हिरिरीने सहभाग घेत आले आहेत. लोककल्याणासाठी विविध संस्था, आश्रमशाळा त्यांनी उघडल्या. लोकप्रतिनिधी म्हणून लोकसेवा करतानाच ते विविध आघाड्यांवर आपली भूमिका बजावत आहेत. ठाणे येथील अरविंद स्मृती संस्थेचे ते अध्यक्ष आहेत. या संस्थेंतर्गत ठाणे जिल्ह्यातील दादडे (ता. विक्रमगड) येथे अरविंद आश्रमशाळा, देवगाव (ता. वाडा) येथे माधवराव काणे आश्रमशाळा तसेच नांदणी, गायगोठा (ता. वाडा) येथेही आश्रमशाळा चालवली जाते. कल्याण (जि. ठाणे) येथील छत्रपती शिक्षणमंडळाचे ते उपाध्यक्ष आहेत. ठाणेस्थित प्रगती प्रतिष्ठानचे चिटणीस, वाडा येथील उत्कर्ष नागरी सहकारी पतपेढीचे अध्यक्ष अशा विविध आघाड्यांवर त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. तर पक्षात भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेशचे चिटणीस म्हणूनही त्यांनी जबाबदारी पार पाडली आहे.

शेतकरी, कामगार आणि आदिवासींच्या प्रश्नांच्या आंदोलनात त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. भाजपच्या आदिवासी आघाडीचे अध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

## परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | विष्णू रामा सवरा |
| जन्मतारीख | : | १ जून १९५० |
| जन्मठिकाण | : | गालतरे, तालुका-वाडा, जिल्हा ठाणे. |
| शिक्षण | : | बी. कॉम. |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी व इंग्रजी |
| वैवाहिक माहिती | : | विवाहित, पत्नी जयश्री. |
| अपत्ये | : | एकूण ३ (दोन मुलगे व एक मुलगी) |
| व्यवसाय | : | शेती. |
| मतदारसंघ | : | १२९-विक्रमगड, जिल्हा: ठाणे |

## राजकीय वाटचाल

- आदिवासी व मागासवर्गीयांसाठी विविध आश्रमशाळांमार्फत समाजोन्नतीचे कार्य
- भाजपच्या आदिवासी आघाडीचे अध्यक्ष
- अरविंद स्मृती ठाणे, या संस्थेमार्फत दादडे येथे अरविंद आश्रमशाळा, देवगाव येथे माधवराव काणे आश्रमशाळा, नांदणी येथे आश्रमशाळा सुरू केल्या आहेत.
- उपाध्यक्ष, छत्रपती शिक्षणमंडळ कल्याण, जिल्हा ठाणे,
- ठाणे ग्रामीण भाजपाध्यक्ष
- अध्यक्ष, उत्कर्ष नागरी सहकारी पतपेढी, वाडा, जिल्हा ठाणे
- शेतकरी, कामगार व आदिवासींच्या प्रश्नांच्या आंदोलनात सहभाग
- भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश, विविध पदांचा कार्यभार
- फेब्रुवारी १९९९ ते ऑक्टोबर १९९९ आदिवासी विकास मंत्री;
- १९९० पासून सतत ६ वेळा आमदार.

# जनहितासाठी दक्ष

सत्ता असो वा नसो समाजासाठी नेहमी कार्यरत राहायचे हे सूत्रच दिलीप कांबळे यांचे जीवन बनून गेले आहे. सर्वसामान्य कुटुंबात जन्माला येऊनही समाजाप्रती असलेल्या तळमळीने त्यांना कधीही स्वस्थ बसू दिले नाही. अखंड काम हेच त्यांचे वैशिष्ट्य बनले आहे.

सत्तेसाठी तत्त्वाशी कोणतीही तडजोड न करणारे दिलीप कांबळे सर्वसामान्य जनतेचा आवाज बनून राहिले आहेत. तळागाळातील जनतेपर्यंत सरकारी योजना पोहचल्या पाहिजेत यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

१ जून १९६२ रोजी गरीब कुटुंबात जन्मलेल्या दिलीप कांबळे यांनी आपल्या सामाजिक कार्याच्या सेवेची सुरुवात राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून केली. १९८० पासून त्यांनी भाजपच्या कामास सुरुवात केली. पक्षाने त्यांच्यावर विविध जबाबदाऱ्या सोपविल्या. त्या त्यांनी समर्थपणे पेलल्या. १९९५ मध्ये त्यांनी पर्वती मतदासंघातून निवडणूक लढविली आणि ती जिंकलीही. त्यावेळी पक्षाने त्यांच्यावर समाजकल्याण खात्याचे राज्यमंत्री म्हणून जबाबदारी सोपविली. या काळात सर्वसामान्यांना मदत करण्यास ते नेहमीच अग्रेसर होते. युतीच्या काळामध्ये मागासवर्गीयांच्या संदर्भातील कार्यामध्ये आपली ठाम भूमिका मांडून त्यांनी उत्तम आदर्श घालून दिला होता. सत्ता असताना आणि नसतांनाही ते आपल्या मतदारसंघात विविध उपक्रम राबवण्यात नेहमीच आघाडीवर असतात. आपल्यापेक्षा राष्ट्र आणि पक्ष मोठा हे सूत्र ते नेहमीच मानतात. त्यामुळे आपल्या यशाचे सारे श्रेय पक्ष आणि कार्यकर्त्यांना देतात. उमेद न सोडता आणि निष्ठा न ढळता काम केले तर यश नक्की मिळते असे त्यांचे म्हणणे आहे. अगदी गरीब परिस्थितीतूनही त्यांनी आपले बीएचे शिक्षण पूर्ण केले. शिक्षणासाठी त्यांना काबाडकष्ट करावे लागले. मागासवर्गीयांच्या सामाजिक उन्नतीसाठी शिक्षणासारख्या सुविधा सार्वत्रिक उपलब्ध व्हाव्यात याकडे त्यांचा कटाक्ष आहे.



**दिलीप कांबळे** आदिवासी विकास, सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य

## परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | दिलीप ज्ञानदेव कांबळे |
| जन्म | : | १ जून, १९६२ |
| जन्म ठिकाण | : | पुणे |
| शिक्षण | : | बी.ए. |
| ज्ञात भाषा | : | मराठी, हिंदी व इंग्रजी |
| वैवाहिक माहिती | : | पत्नी मीलन |
| अपत्ये | : | ३ (२ मुलगे व १ मुलगी) |
| व्यवसाय | : | समाजकारण |
| मतदारसंघ | : | २१४-पुणे कॅन्टोनमेंट (जिल्हा : पुणे) |

## राजकीय वाटचाल

- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून सामाजिक सेवेला सुरुवात.
- भारतीय जनता युवा मोर्चाचे पुणे शहराध्यक्ष म्हणून काम.
- १९९५ मध्ये पुणे शहरातील पर्वती मतदारसंघातून विजयी.
- युतीच्या काळातील कार्यक्षम समाजकल्याण राज्यमंत्री म्हणून प्रभावी कामगिरी.
- आश्रमशाळांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न.
- अनुसूचित जाती आणि जमातीच्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या सुधारणांसाठी पुढाकार.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्थापक असलेल्या औरंगाबादेतील मिलिंद महाविद्यालयाच्या नवीन इमारतीच्या उभारणीसाठी, क्रीडा सुविधा, ग्रंथालयासाठी विशेष तरतूद.
- अण्णा भाऊ साठे यांच्या डाक तिकिटांच्या प्रकाशनात पुढाकार.
- २००९-माळशीरस मतदारसंघातून निवडणूक लढवली.
- २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत फेरनिवड.

# वसा समाजसेवेचा



विद्या ठाकूर    **ग्रामविकास आणि जलसंधारण, महिला व बालविकास राज्यमंत्री**

**वि**द्याताईंना राजकीय आणि समाजसेवेचा वारसा त्यांच्या सासू-सासऱ्यांकडून मिळाले. त्यामुळे आपण समाजासाठी काहीतरी केलेच पाहिजे ही धारणा त्यांच्या मनात पक्की झाली. समाजसेवेचे हे व्रत पुढे चालू ठेवत १९९२ ते २०१२ अशी २० वर्ष त्यांनी मुंबई महानगरपालिकेत नगरसेवकपद भूषविले.

त्यांची नगरसेवकपदाची ही कारकिर्दही वैशिष्ट्यपूर्ण होती. १९९५-१९९६ आणि २००२-२००३ या कालावधीत त्या मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य समितीच्या अध्यक्ष होत्या. तसेच २००७ ते २००८ या वर्षी उपमहापौरपदाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे सांभाळली. सार्वजनिक आरोग्य समितीच्या अध्यक्ष असताना गरीब रुग्णांना मोफत आणि गुणवत्तापूर्ण औषधोपचार कसा मिळेल याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले.

त्यांच्या परिसरातील प्रत्येक नागरिकाशी त्यांचा प्रत्यक्ष संवाद आहे. त्याचाच परिणाम म्हणून पहिल्यांदाच निवडणूक लढविणाऱ्या विद्याताई भरघोस मतांनी विजयी झाल्या.

समाजातल्या ज्वलंत प्रश्नांची त्यांना जाणीव असून, ते सोडविण्याचा त्यांचा नेहमीच प्रयत्न असतो. यातूनच दरवर्षी १० हजार तुळशी रोपांचे वितरण, बेटी बचाओ, बेटी पढाओ जनजागृती अभियान यासारखे अभिनव उपक्रम त्यांनी आतापर्यंत राबवले. गरीब महिलांना रोजगार मिळावा यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. अशा विद्याताईंनी नव्या मंत्रिमंडळात आदिवासी विकास, जलसंधारण आणि महिला व बालविकास राज्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारली आहेत. संघटन, नियोजन, समाजप्रश्नांचा अभ्यास आणि गरिबांप्रती असणारी ममत्वभावना, या त्यांच्या गुणांचा राज्यमंत्री म्हणून त्यांना नक्कीच उपयोग होईल यात शंका नाही.

सार्वजनिक आरोग्य समितीच्या अध्यक्ष असताना त्यांनी केलेले लोकोपयोगी कार्य मुंबई शहराच्या लक्षात आहे. महिला व बालकल्याण संदर्भात त्यांनी केलेल्या कामाचा अनुभव राज्याच्या व्यासपीठावर अधिक व्यापकरीतीने मांडण्याची ही संधी असल्याचे त्यांचे मत असून, त्याचे प्रतिबिंब राज्याच्या कारभारात उमटवण्यासाठी त्यांना पक्षातर्फे संधी दिली गेली आहे.

## परिचय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण नाव | : | विद्या जयप्रकाश ठाकूर |
| जन्म | : | १५ जून १९६१ |
| जन्म ठिकाण | : | मुंबई |
| शिक्षण | : | ८ वी |
| ज्ञात भाषा | : | मराठी, गुजराती, हिंदी व इंग्रजी |
| वैवाहिक माहिती | : | विवाहित, पती जयप्रकाश ठाकूर |
| अपत्ये | : | एक मुलगा |
| व्यवसाय | : | समाजकारण |
| मतदारसंघ | : | १६३- गोरेगाव (मुंबई उपनगर) |

## राजकीय वाटचाल

- पती जयप्रकाश आणि सासरे चंद्रबलीसिंह यांच्याकडून राजकीय वारसा.
- भारतीय जनता पक्षाच्या विविध पदांवर काम.
- सतत चार वेळा महानगरपालिकेत नगरसेविका म्हणून जनसेवा.
- गोरेगाव आणि परिसरात विविध कामांच्या माध्यमातून व आरोग्य सुविधांच्या माध्यमातून लोकसंपर्क.
- महिला संरक्षणासंदर्भात मतदारसंघामध्ये जनजागृतीसाठी संघटनात्मक उपाययोजना.
- १९९२ ते २०१२ अशी २० वर्ष मुंबई महानगरपालिकेत नगरसेविका
- १९९५-१९९६ आणि २००२-२००३ या कालावधीत मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य समितीच्या अध्यक्ष.
- २००७ ते २००८ या वर्षी उपमहापौर.

## मुख्यमंत्री उपराजधानीत

# देवदुर्लभ स्वागत

२ नोव्हेंबर, संत्रानगरी नागपूर शहर आनंदाने व उत्साहाने ओसंडून वाहत होते. विमानतळ ते धरमपेठेपर्यंत रांगोळ्या, मोठमोठे होर्डिंग्ज, घराघरावरील रोषणाईने शहर लखाखून गेले होते. निमित्त होते, नवनिर्वाचित मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या आगमनाचे!

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर ते

**मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस हे दि. २ नोव्हेंबर रोजी नागपूर येथे गेले. नागपूर शहरातील पहिलीच व्यक्ती महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी आरूढ झाल्याचा आनंद तमाम नागपूरकरांना अत्यंत मनस्वीरीत्या झाल्याने फडणवीस यांचे देवदुर्लभ असे स्वागत नागपूरकरांनी केले. या स्वागताचा स्वीकार केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी थेट कामकाजाला सुरुवात केली. नागपूर आणि विदर्भाच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा आणि विचारविनिमय केला. या बैठकांमध्ये त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण व उपयुक्त सूचना केल्या. अधिकाऱ्यांना निर्देश दिले व काही निर्णयही घेतले.**



**उपराजधानी नागपूर येथील नागरिकांकडून स्वागत स्वीकारताना**

प्रथमच आपल्या जन्म व कर्मभूमीत येणार होते. त्यामुळे अबालवृद्धांमध्ये प्रचंड उत्साह होता. बरोबर साडेचार वाजण्याच्या सुमारास त्यांचे विमानतळावर सपत्नीक आगमन झाले. जल्लोषात स्वागत झाल्यानंतर विमानतळासमोर सजवलेल्या रथावर मुख्यमंत्री विराजमान झाले. लेजीम, ढोलताशाच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचा रथ पुढेपुढे सरकत होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. आपल्या लाडक्या मुख्यमंत्र्यांना जवळून पाहता यावे, हा आनंदाचा क्षण डोळ्यात साठवून ठेवता यावा, यासाठी हजारोंच्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती. ठिकठिकाणी रांगोळ्या काढल्या होत्या. शहरभर स्वागताच्या कमानी उभारण्यात आल्या होत्या. रंगीबेरंगी फुगे आकाशात सोडण्यात येत होते. विविध प्रकारच्या त्यांच्या होर्डिंग्जवरील स्वागताचे फोटो सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. विमानतळावरून निघालेला रथ पंधरा मिनिटांनी हॉटेल प्राइडजवळील डॉ. हेडगेवार स्मृतिस्मारकाजवळ आला. त्या ठिकाणी मुख्यमंत्र्यांनी अभिवादन केले. पुन्हा मिरवणूक पुढे चालू लागली. फटाक्याच्या आतषबाजीने परिसर दुमदुमून गेला. सर्व स्तरातील नागरिक या उत्सवात सहभागी झाले. तरुण-तरुणीचा उत्साह ओसंडून वाहत होता. लेजीम व ढोलताशांच्या तालावर धुंद होऊन ही तरुण मंडळी नाचत होती.

**हजारोच्या संख्येने नागरिक सहभागी**

मिरवणूक मार्गक्रमण करीत दीक्षाभूमीवर आली. त्या ठिकाणी मुख्यमंत्र्यांनी अभिवादन केले आणि पुन्हा तेवढ्याच जोमाने मिरवणूक पुढे जाऊ लागली. इकडे त्यांच्या धरमपेठ निवासी त्रिकोणी चौकात आयोजित सत्कार समारंभात हजारोच्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. आपला मुलगा आपला देवेंद्र मुख्यमंत्री झाला, राज्याचा प्रमुख झाला. याचा आनंद नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसत होता. रात्री ९ वाजण्याच्या सुमारास मिरवणूक त्रिकोणी चौकात आली. त्यांनी विनम्रपणे अभिवादनाचा स्वीकार केला. 'मी तुमचाच आहे. तुमच्यामुळे मोठा झालो. राज्याचा प्रमुख झालो. कर्तव्यापासून कधीही विचलित होणार नाही,' असे भावपूर्ण उद्‌गार काढून त्यांनी लोकांची मने जिंकली.



**उपराजधानी नागपूर येथे विविध प्रश्नांबाबत मुख्यमंत्र्यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक**

**तातडीने प्रश्न सोडविण्याचे आदेश**

दुसऱ्या दिवशी ३ नोव्हेंबर रोजी नागपूर विभागातील विविध विभाग प्रमुखांची बैठक 'रामगिरी' या शासकीय निवासस्थानी बोलावण्यात आली होती. विभागातील सहाही जिल्ह्यातील अधिकारी यावेळी उपस्थित होते. बरोबर सकाळी १० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे रामगिरीवर आगमन झाले. सुरुवात त्यांनी त्यांच्या जिव्हाळ्याच्या मिहान प्रकल्पापासून केली. एमएडीसीचे उपाध्यक्ष तानाजी सत्रे यांनी मिहानबाबतचे सादरीकरण केले. संपूर्ण माहिती जाणून घेतल्यानंतर तातडीने काही प्रश्न सोडविण्याचे आदेश त्यांना दिले. मिहानचा प्रश्न त्यांच्यासाठी नवीन नव्हताच. उद्योजकांना स्वस्त दरात वीज मिळण्याचा प्रश्न उद्योजकांच्यावतीने उपस्थित करण्यात आला. हा प्रश्न तातडीने निकाली काढण्याबाबत आदेश त्यांनी दिले. उद्योजकांना रुपये ४.३० प्रती यूनिट दर मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**पत्रकारांशी संवाद**

औद्योगिक विकासाबरोबर कृषी, सिंचन आणि नागरी विकासाचा आढावा त्यांनी घेतला. दरम्यान, सायंकाळी ६ वाजता श्रमिक पत्रकार भवनात 'मीट द प्रेस'चे आयोजन करण्यात आले होते. सहा वाजले तरी बैठक संपलेली नव्हती. बैठक अर्धवट सोडूनच मुख्यमंत्र्यांना श्रमिक पत्रकार भवनात यावे लागले. आतापर्यंतची प्रेस आणि मुख्यमंत्री म्हणूनची प्रेस यामध्ये फरक जाणवत होता. आपला नेता मुख्यमंत्री झाला, याचा आनंदही पत्रकारांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. जवळपास दीड तास पत्रकारांशी संवाद झाल्यानंतर पुन्हा मुख्यमंत्री रामगिरीवर गेले. उर्वरित विभागाची आढावा बैठक घेतली. विविध विभागाच्या बैठका रात्री उशिरापर्यंत चालल्या. सिएट टायर कंपनीने २ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचे मुख्यमंत्र्यांसमोर मान्य केले. एका दृष्टीने ही सकारात्मक सुरुवात आहे.

**- मोहन राठोड**

## जमीन हस्तांतरण

मिहानच्या दृष्टीने हवाई दलाच्या गजराजची जमीन हस्तांतरणाचा प्रश्न होता. यासंबंधी केंद्र सरकारशी चर्चा करून लवकरात लवकर निर्णय घतला जाईल असे मा. मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मिहानमधील व शिवणगाव तसेच भामटी परिसरातील भूसंपादनाचा विषयदेखील महत्त्वाचा आहे. १५ दिवसात अहवाल सादर करण्याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले. गोसीखुर्द प्रकल्प, गडचिरोली जिल्हयातील प्रश्न, गोरेवाडा प्रकल्प, मेट्रो रेल्वे, सेवाग्राम विकास आराखडा, वनसंवर्धन याबाबत गती देण्याचा संकल्प बोलून दाखविला. मिहान प्रकल्प आपल्या अजेंड्यावर असून येत्या काही दिवसात त्याला निश्चित गती मिळेल असे त्यांनी स्पष्ट केले.

# नवे सरकार... नवी आव्हाने

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली नवे सरकार सत्तारूढ झाले आहे. या सरकारपुढे विविध समस्या आणि आव्हाने असणार आहेत. ती आव्हाने नेमकी कोणती आहेत, त्यांचा प्राधान्यक्रम कसा ठरवावा लागेल, या आव्हानांवर मात करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्या लागतील, तसेच जनतेच्या शासनाकडून काय अपेक्षा आहेत, याचा प्रातिनिधिक आढावा.**

**प्रवीण बर्दापूरकर**
**(ज्येष्ठ पत्रकार आणि नागपूर पत्रिका, लोकमत, लोकसत्ता या वृत्तपत्रांत संपादकीय कारकिर्द)**

अनेक नाट्यमय आणि काहीशा अनपेक्षित, अभूतपूर्व घटनांनी महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक यावेळी गाजली. गेल्या साडेतीन-पावणे चार दशकांच्या पत्रकारितेत विधानसभा निवडणूक इतकी नाट्यमय होण्याचा हा माझ्या आयुष्यातला पहिलाच प्रसंग होता. अशा या नाट्यमयतेमुळेच निवडणुकीत चुरस निर्माण झाली आणि मतदार कौल कसा देतो याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. मतदारांनी कोणत्याही एका पक्षाच्या बाजूने कौल दिलेला नाही . मात्र भारतीय जनता पक्ष महाराष्ट्रात सर्वात मोठा पक्ष म्हणून प्रथमच उदयाला आला तरी बहुमतासाठी या पक्षाला किमान २३ जागा कमी पडल्या. आता काही अपक्षांनी भारतीय जनता पक्षाच्या नव्या सरकारला पाठिंबा दिलेला असला तरी बहुमतासाठी सरकारला आणखी आठ-नऊ जागा कमी पडत आहेत. अशी पार्श्वभूमी असली तरी , आता निकाल जाहीर होऊन राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवे सरकार सत्तारूढ झाले आहे.

**प्रशासकीय आणि आर्थिक आव्हान**

नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोरील सर्वात पहिले आव्हान आर्थिक आणि प्रशासकीय असणार आहे . राज्याची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना दिल्याचे विविध प्रसार माध्यमांमधून प्रकाशित झाले आहे.

कर्जाचा विळखा, ढेपाळलेले प्रशासन आणि आर्थिक गैरव्यवहार अशा तीन पातळ्यांवर हे आर्थिक आव्हान आहे . राज्य कर्जाच्या विळख्यात सापडले आहे, तरतूद केलेला निधी विकास कामांवर खर्च होण्याऐवजी अन्यत्र वळवला जात आहे आणि प्रशासनाची गती आणि उमेद हरवलेली आहे . लोकप्रियतेच्या आहारी न जाता अनावश्यक खर्च टाळून, गैरमार्गाकडे जाणाऱ्या पायवाटा जर बंद झाल्या तर विकासकामांसाठी मोठा निधी प्रत्यक्षात हाताशी येऊ शकतो.



## नागरी सुविधांवर ताण

आधीच आपल्याकडे शहराचे नियोजन नव्हते आणि त्यात लोंढ्याची भर पडली त्यामुळे राज्यातील सर्वच शहरातील नागरी सुविधांवर मोठा ताण निर्माण झाला आणि अगदी मुंबईसारख्या शहरातही ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात पाणी टंचाई जाणवते.

न होणारी किमान साफसफाई आणि त्यामुळे फैलावणारी रोगराई, वाहतुकीचा उडालेला बोजवारा, रस्त्यांची अत्यंत वाईट अवस्था अशा अनेक समस्यांमुळे एकीकडे आलिशान व्यवस्था असणाऱ्या हायराइज इमारती आणि दुसरीकडे झोपडपट्ट्यांच्या रांगा असा विरोधाभास मुंबई, नागपूर, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद, पुणे, अमरावती, बीड, सोलापूर, नांदेड, चंद्रपूर, सांगली अशा जवळपास सर्वच शहरात स्पष्टपणे दिसतो आहे.

वेगाने होणाऱ्या शहरीकरणामुळे निर्माण झालेल्या प्रश्नाचे आव्हान नवीन सरकारला समर्थपणे पेलावे लागणार आहे.



**विकेंद्रीकरण आवश्यक**

सध्या राज्याची संपूर्ण सत्ता आणि सर्व निर्णयाधिकार मंत्रालयात केंद्रित झालेले आहेत. त्यामुळे तालुका पातळीवर घेतल्या जाऊ शकणाऱ्या निर्णयासाठीही मुंबईच्या चकरा माराव्या लागतात. त्यात वेळ , श्रम आणि पैसा यांचा मोठा अपव्यय होतो . शिवाय मंत्रालयात अडलेली ही कामे करून देण्यासाठी आर्थिक हितसंबध जोपासणाऱ्या मध्यस्थांची एक नवी साखळी निर्माण झाली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थात जर राज्य सरकारच्या पक्षाची सत्ता नसेल तर राजकीय आकसाने निर्णय घेऊन अडवणूक केली जाते; हा आजवरचा अनुभव आहे . सरकारमधील कर्ते-धर्ते असे, राजकीय भूमिकेतून आकसपूर्ण वागू लागले की प्रशासनातील अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना त्यांच्या मनास हवे तसे वर्तन करण्यासाठी मोकळे रान मिळते . गैरव्यवहाराची ही सुरुवात असते. म्हणूनच कोणताही सोयीचा, रंगाचा आणि राजकीय विचाराचा चष्मा किंवा निकष न लावता मंत्रालयात केंद्रीत झालेल्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे, हे नव्या सरकारसमोरचे आव्हान आहे. आर्थिक पारदर्शकता तसेच प्रशासकीय शिस्तीची बीजे त्यातच आहेत. पारदर्शकतेमुळे गैरव्यवहाराचे मार्ग बंद होतील , प्रशासन गतिमान होईल आणि सरकारची प्रतिमा उजळून आणखी निधी उपलब्ध होण्याचे मार्गही प्रशस्त होत जातील . अर्थात, असे काही उपाय योजले तर त्याला आर्थिक हितसंबध निर्माण झालेल्या राजकारण्यांचा तसेच प्रशासनाचा मोठा विरोध होईल. तो या नवीन सरकारला कठोरपणे मोडून काढावा लागेल .

## प्रमुख आव्हाने

- प्रादेशिक असमतोल
- आर्थिक पारदर्शकता
- कायदा व सुव्यवस्था बळकटीकरण
- आरक्षणासारख्या जटिल मुद्द्यांची सोडवणूक
- वाढते नागरीकरण
- मोडकळीस आलेली कृषी व्यवस्था
- सिंचन क्षमतेत वाढ
- शेतमालाला योग्य भाव
- ओस पडणाऱ्या गावांची सुद्दढता
- शहरांचे नियोजन
- शहरातील झोपडपट्टी निर्मूलन
- मंत्रालयातील अधिकारांचे विकेंद्रीकरण
- मंत्रालयातील कामकाजाचे सुसूत्रीकरण
- मध्यस्थांची साखळी मोडीत काढणे
- राजकीय आकसातून घेतलेल्या निर्णयांना आळा
- सत्ताधारी-विरोधी हा भेद निर्णयप्रक्रियेत न येऊ देणे
- अविकसित भागांमध्ये मोठ्या प्रकल्पांची निर्मिती

**ठोकळेबाज निर्णय टाळण्याची गरज**

विकासाची संकुचित प्रादेशिक भूमिका हे आजवरच्या राज्य सरकारांचे एक प्रमुख वैशिष्ट्य राहिले आहे. त्यामुळे प्रादेशिक विकासाच्या असमतोलाचा असंतोष राज्यात सर्वच भागात धुमसत आहे. त्यातून महाराष्ट्राच्या विभाजनाची मागणी कशी पुढे आली आहे याची जाणीव मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांना चांगली आहे.

प्रत्येक प्रदेश भौगोलिकदृष्ट्या वेगळा असल्याने त्या प्रदेशाचे प्रश्न सोडवण्यासाठी आजवर घेतले गेले, तसे ठोकळेबाज पद्धतीने निर्णय घेणे टाळले पाहिजे. आता राज्याचे नेतृत्वच हाती आल्याने प्रादेशिक गरज लक्षात घेऊन सर्वसमावेशक नियोजनबद्ध भूमिका घेऊन विकासाची गंगा राज्याच्या अविकसित भागाकडे नेण्याचे काम फडणवीस यांना करावे लागणार आहे .

विरोधी पक्षात राहून एखाद्या प्रश्नावर

आंदोलन करणे आणि सत्तेत राहून तो प्रश्न नीटपणे सोडवून घेणे यात मोठे अंतर असते आणि त्या भूमिकाही संपूर्णपणे वेगळ्या असतात. हे अंतर मिटवून आणि नव्या भूमिकेत शिरून फडणवीस यांना प्रादेशिक विकासाच्या असमतोलाचा असंतोष शांत करावा लागेल.

**रेंगाळलेल्या प्रकल्पांना प्राधान्याने निधी**

अविकसित प्रदेशातील दीर्घ काळापासून रेंगाळलेल्या विविध प्रकल्पांना प्राधान्यक्रमाने निधी उपलब्ध करून देऊन ते प्रकल्प गतीने पूर्ण करण्याची भूमिका नवीन सरकारने घेतली तर हा असंतोष बराचसा शांत होऊ शकतो.

त्यानंतरचा पुढचा टप्पा नवीन प्रकल्पांचा असेल. विकासाचे नवे प्रकल्प आणि योजना हाती घेतानाही अविकसित भागांना इतरांची नाराजी पत्करून झुकते माप द्यावे लागणार आहे; त्यातून हा असंतोष पूर्ण शांत होऊ शकेल आणि फुटीच्या बीजांची निर्मिती



यापुढे होणार नाही. असे घडवून आणण्यासाठी स्वतंत्र आर्थिक शिस्त निर्माण करावी लागेल आणि त्याला होणारा संभाव्य विरोध हेही एक आव्हान या नवीन सरकारसमोर आहे .

**वाढते नागरीकरण**

वाढते नागरीकरण आणि मोडकळीस आलेली कृषी व्यवस्था हे एक मूलभूत स्तरावरील अत्यंत गंभीर आव्हान आहे . शेतमाल निर्मितीची प्रत्येक प्रक्रिया दिवसेंदिवस महागडी होत चालली आहे आणि

## सिंचनाची समस्या

मंत्रालयात बसून इंटरनेटवरवरून कोणतीही माहिती घेत कोणत्याही पिकाला दर हेक्टरी एक किंवा दीड पाळी पाणी असे सिंचनाचे धोरण आखले गेले आहे; अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. अशा अनेक कारणांमुळे शेतकरी अक्षरश: पिचला आहे, टोकाचा निराश झाला आहे आणि त्या नैराश्यातून यापूर्वी अनेकदा तो आत्महत्येच्या मार्गाकडे वळला आहे.

जो शेतकरी आत्महत्येच्या मार्गाकडे वळला नाही त्यापैकी एक मोठा गट मोठ्या संख्येने पोट भरण्यासाठी शहराकडे वळला. त्यामुळे नागरीकरणाचा वेग आणखी वाढला आणि नागरी सोयी-सुविधांवर ताण निर्माण झाल्याने शहरे बकाल झाली . कितीही नागरी सोयी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या तरी त्या अपुऱ्या पडत असल्याने शहरांचे बकालीकरण वाढतच चालले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी शेतीसाठी पाणी , वीज , बी-बियाणे, दळणवळण, बाजारपेठ अशा मूलभूत सोयी गतीने ग्रामीण भागात उपलब्ध करून देण्यासाठी अग्रक्रमाने पुढाकार घेतला जाणे आवश्यक आहे. राज्यात शेतीसाठी पाण्याची उपलब्धता एक तर अनियमित आहे आणि निवडक काहींनाच ते मुबलक उपलब्ध होते. अनेक नद्या आणि धरणातून धनदांडगे पाणी परस्पर उचलून घेत आहेत असे चित्र राज्यात गावोगाव दिसते. या धनदांडग्यांवर कारवाईचा बडगा उभारत सिंचनासाठीच्या पाण्याच्या वापराचे नियोजन आणि वाटप यासंबधी काटेकोर अंमलबजावणी करण्याची गरज आहे. हा प्रश्न भूमिपुत्राच्या नजरेतून नीट समजावून घेऊन मार्ग काढला गेला पाहिजे. अगदी आज टोमॅटो आणि सोयाबिनचे भाव इतके कोसळले आहेत की हे पीक कवडीमोलाने विकले जात आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अपुऱ्या आणि अनियमित पावसाचा फटका बसल्याने कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या डोळ्यांतील आसवेही सुकली आहेत इतकी परिस्थिती गंभीर आहे. हे लक्षात घेऊन तातडीने पावले उचलली जाण्याची गरज आहे आणि हे नवीन सरकार समोरील मोठे आव्हान आहे.



## आरक्षणाचा प्रश्न

मागच्या सरकारने मराठा आणि मुस्लीम समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय राजकीय दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून अत्यंत घाईघाईने घेतला. प्रत्यक्षात मात्र या आरक्षणाचा ते जाहीर झाल्यापासून या दोन्ही समाजांना लाभ मिळाला नाही. हे दोन्ही समाज सरकारवर स्वाभाविकपणे नाराज झाले. शिवाय केवळ समाजातील दोन घटकांना आरक्षण देताना अन्य उपेक्षित घटकांनी केलेल्या आरक्षणाच्या मागण्यांचा विचार न करण्याची चूक करण्यात आली. त्यामुळे आंदोलने पेटली, समाज गटा-तटात विभागला गेला. सामाजिक समतेचा आधारच त्यामुळे कमकुवत झाला. आरक्षणाची मागणी करणाऱ्या या सर्वांना एकत्र बसवून सामंजस्याने हा निर्णय घेतला गेला असता तर



सामाजिक एकतेला तडा गेला नसता . पण तसे घडले नाही हेच खरे . परिणामी आरक्षण दिलेले आणि आरक्षण न मिळालेले असे दोन्ही समाज तत्कालीन सरकार पक्षांच्या विरोधात गेले. राजकीय हेतूने घेतल्या गेलेल्या निर्णयाचा फायदा मावळलेल्या सरकारला मताच्या रूपात मिळाला नाही हेही या निवडणूक निकालाचे एक वैशिष्ट्य आहे. आरक्षण न मिळालेले समाजातील घटक भारतीय जनता पक्षासोबत गेले. सामाजिक समरसतेवर भारतीय जनता पक्षाचा ठाम विश्वास आहे, असे सांगितले जाते. या पार्श्वभूमीवर त्या विश्वासाची आता कसोटी लागणार आहे. सरकार स्थापनेनंतर आरक्षणाच्या प्रश्नाचा गुंता नवीन सरकारला सोडवावा लागणार आहे आणि तो सोडवताना या सरकारचा कस लागणार आहे.

तो मोठा खर्च करून शेतमालाचे उत्पादन घेतले तर त्याला मिळणारा तुटपुंजा भाव; असे एक दुष्टचक्र निर्माण झाले आहे . हे दुष्टचक्र जसे जागतिकीकरण आणि खुल्या अर्थव्यवस्थेमुळे निर्माण झाले तसेच ते वास्तवाचा विचार न करता आखलेले आर्थिक धोरण तसेच चुकीच्या प्राधान्यक्रमानेही निर्माण झाले आहे. उदाहरणार्थ काळ्या सकस मातीत घेतल्या जाणाऱ्या पिकाला दर हेक्टरी आठ तासांची पाण्याची पाळी मिळाली तर चालते पण जमीन सकस नसेल तर जमिनीच्या कसाप्रमाणे दीड-दोन पाळ्या किंवा कधी जास्तही पाणी सिंचनासाठी लागते.

### स्थलांतरितांच्या समस्या

शेती व्यवस्था मोडकळीस येत गेली आणि शेतीवर काम करणाऱ्या अनेकांनी रोजी-रोटीसाठी शहरांचा रस्ता पकडला. त्यात भर पडली ती शहरी जीवनाचे आकर्षण असणाऱ्या आणखी काहींची . ग्रामीण आणि निमशहरी भागातून शहराकडे येणाऱ्यांचा लोंढा त्यामुळे निर्माण झाला. ग्रामीण भागात कोणत्याही गावातल्या गल्लीत चक्कर मारली तर लक्षात येते की गावात वृद्ध माणसेच जास्त आहेत . कारण भावनिक पाश तोडून ते स्थलांतर करू शकत नाहीत. शहरात स्थलांतर केले तरी मातीशी असणारी नाळ त्यांना शहरी भागात रुजू देत नाही.


एकोणीसशे ऐंशी-नव्वद नंतरची पिढी बहुसंख्येने एक तर शिकून नोकरी-धंद्यासाठी गाव सोडून गेली किंवा शेतीतून मिळणारे उत्पन्न पोट भरण्याइतके नसल्याने रोजगाराच्या शोधासाठी स्थलांतरित झाली आहे. ही समस्या काही केवळ मुंबईत येणाऱ्या लोंढ्याची नाहीये हे लक्षात घ्या. विदर्भ , मराठवाडा आणि महाराष्ट्रात सर्वत्र हेच चित्र सर्रास दिसते. खेड्यातला-तालुक्याकडे , तालुक्याचा-जिल्ह्याकडे आणि जिल्ह्याचा शहरातील आणखी मोठ्या शहराकडे असे हे स्थलांतर आहे. आपल्या बहुसंख्य शहरात नागरीकरणाच्या रेट्यामुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. त्यात प्लॉट टाकून नव्या वसाहती निर्माण करणे, त्या वसाहती उभारण्यासाठी बांधकाम उद्योग , त्यासाठीची वाहतूक यंत्रणा, हॉटेल्स, मोटेल्स, ढाबे, दैनंदिन गरजेची आणि दारूची अधिकृत तसेच अनधिकृत दुकाने, पान टपऱ्या, मोबाइल शॉपी... एक ना अनेक असे हे उद्योग असून त्यात काम करणारे कमीच पडतात असा अनुभव आहे.

### समस्यांचा गुंता

एकंदरीत राजकीय, आर्थिक, सामाजिक, अशा विविध आघाड्यांवर नवीन सरकार समोर समस्यांचा गुंता आहे. दलितांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना आणि निवडणुकीच्या निकालातून काही नवीन धुमसणारी जातीय तसेच धार्मिक समीकरणे वेगळे संकेत देत असल्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न जटिल आहेत . ही आव्हाने सकारात्मक दृष्टिकोन घेऊन सोडवत, स्वत:चा ठसा उमटवण्यात मुख्यमंत्री आणि त्यांचे सहकारी कसे यशस्वी होतात याची उत्सुकता आहे.

**- संपर्क : ९८२२०५५७९९**

# कौल जनतेचा



**महाराष्ट्राच्या १३व्या विधानसभेसाठी झालेल्या निवडणुकीत राज्यातील जनतेने कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत दिले नसले तरी भारतीय जनता पक्षाला सर्वाधिक १२२ जागांवर निवडून दिले आहे. गेल्या १९ वर्षात पहिल्यादांच एका राजकीय पक्षाला १०० च्यावर जागा मिळाल्या आहेत. या निवडणुकीत ६३ जागा मिळवून शिवसेना दुसऱ्या तर ४२ जागा मिळवणारा काँग्रेस तिसऱ्या स्थानावर राहिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ४१ जागांवर विजय मिळाला.**

## पश्चिम महाराष्ट्र

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| कसबा पेठ | गिरीश बापट | भाजप | ७३५९४ |
| पुणे कँटोनमेंट | दिलीप कांबळे | भाजप | ५४६९२ |
| हडपसर | योगेश टिळेकर | भाजप | ८२६२९ |
| पर्वती | माधुरी मिसाळ | भाजप | ९५५८३ |
| खडकवासला | भीमराव तापकीर | भाजप | १११५३१ |
| कोथरूड | मेधा कुलकर्णी | भाजप | १००९४१ |
| शिवाजीनगर | विजय काळे | भाजप | ५६४६० |
| वडगाव शेरी | जगदीश मुळीक | भाजप | ६६९०८ |
| भोसरी | महेशदादा लांडगे | अपक्ष | ६०१७३ |
| पिंपरी | गौतम चाबुकस्वार | शिवसेना | ५१०९६ |
| चिंचवड | ॲड. लक्ष्मण जगताप | भाजप | १२३७८६ |
| मावळ | संजय भेगडे | भाजप | ९५३१९ |
| इंदापूर | दत्तात्रय भरणे | राष्ट्रवादी | १०८४०० |
| दौंड | राहूल कुल | रासप | ८७६४९ |
| शिरूर | बाबुराव पाचार्णे | भाजप | ९२५७९ |
| खेड आळंदी | सुरेश गोरे | शिवसेना | १०३२०७ |
| आंबेगाव | दिलीप वळसे-पाटील | राष्ट्रवादी | १२०२३५ |
| जुन्नर | शरददादा सोनावणे | मनसे | ६०३०५ |
| माळशिरस | हनुमंत डोळस | राष्ट्रवादी | ७७१७९ |
| सांगोला | गणपतराव देशमुख | शेकाप | ९४३७४ |
| पंढरपूर | भारत भालके | काँग्रेस | ९१८६३ |
| सोलापूर दक्षिण | सुभाष देशमुख | भाजप | ७००७७ |
| अक्कलकोट | सिद्धाराम म्हेत्रे | काँग्रेस | ९७३३३ |
| सोलापूर शहर मध्य | प्रणिती शिंदे | काँग्रेस | ४६९०७ |

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| सोलापूर शहर उत्तर | विजय देशमुख | भाजप | ८६८७७ |
| मोहोळ | रमेश कदम | राष्ट्रवादी | ६२१२० |
| बार्शी | दिलीप सोपल | राष्ट्रवादी | ९७६५५ |
| माढा | बबनराव शिंदे | राष्ट्रवादी | ९७८०३ |
| करमाळा | नारायण पाटील | शिवसेना | ६०६७४ |
| परांडा | राहूल मोटे | राष्ट्रवादी | ७८५४८ |
| उस्मानाबाद | राणा जगजीतसिंह पाटील | राष्ट्रवादी | ८८४६९ |
| तुळजापूर | मधुकर चव्हाण | काँग्रेस | ७०७०१ |
| कर्जत जामखेड | प्रा. राम शिंदे | भाजप | ८४०५८ |
| श्रीगोंदा | राहुल जगताप | राष्ट्रवादी | ९९२८१ |
| अहमदनगर शहर | संग्राम जगताप | राष्ट्रवादी | ४९३७८ |
| पारनेर | विजयराव औटी | शिवसेना | ७३२६३ |
| राहुरी | शिवाजी कार्डीले | भाजप | ९१४५४ |
| शेवगाव | मोनिका राजळे | भाजप | १३४६८५ |
| नेवासा | दादासाहेब मुरकूटे | भाजप | ८४५७० |
| श्रीरामपूर | भाऊसाहेब कांबळे | काँग्रेस | ५७११८ |
| कोपरगाव | स्नेहलता कोल्हे | भाजप | ९९७६३ |
| शिर्डी | राधाकृष्ण विखे पाटील | काँग्रेस | १२१४५९ |
| संगमनेर | बाळासाहेब थोरात | काँग्रेस | १०३५६४ |
| अकोले | वैभव पिचड | राष्ट्रवादी | ६७६९६ |
| जत | विलासराव जगताप | भाजप | ७२८८५ |
| तासगाव कवठे महांकाळ | आर. आर पाटील | राष्ट्रवादी | १०८३१० |
| खानापूर | अनिल बाबर | शिवसेना | ७२८४९ |
| पलूस - कडेगाव | डॉ. पतंगराव कदम | काँग्रेस | ११२५२३ |
| शिराळा | शिवाजीराव नाईक | भाजप | ८५३६३ |
| इस्लामपूर | जयंत पाटील | राष्ट्रवादी | ११३०४५ |
| सांगली | सुधीर गाडगीळ | भाजप | ८०४९७ |
| मिरज | सुरेश खाडे | भाजप | ९३७९५ |
| शिरोळ | उल्हास पाटील | शिवसेना | ७०८०९ |
| इचलकरंजी | सुरेश हाळवणकर | भाजप | ९४२९३ |
| हातकणंगले | डॉ. सुजीत मिणचेकर | शिवसेना | ८९०८७ |
| शाहूवाडी | सत्यजित पाटील | शिवसेना | ७४७०२ |
| कोल्हापूर उत्तर | राजेश क्षिरसागर | शिवसेना | ६९७३६ |
| करवीर | चंद्रदीप नरके | शिवसेना | १०७९९८ |
| कोल्हापूर दक्षिण | अमल महाडीक | भाजप | १०५४८९ |
| कागल | हसन मुश्रीफ | राष्ट्रवादी | १२३६२६ |
| राधानगरी | प्रकाश आबिटकर | शिवसेना | १३२४८५ |
| चंदगड | संध्यादेवी कुपेरकर | राष्ट्रवादी | ५१५९९ |
| सातारा | शिवेंद्रसिंह भोसले | राष्ट्रवादी | ९७९६४ |
| पाटण | शंभुराज देसाई | शिवसेना | १०४४१९ |
| कराड दक्षिण | पृथ्वीराज चव्हाण | काँग्रेस | ७६८३१ |
| कराड उत्तर | बाळासाहेब पाटील | राष्ट्रवादी | ७८३२४ |
| माण | जयकुमार गोरे | काँग्रेस | ७५७०८ |
| कोरेगाव | शशिकांत शिंदे | राष्ट्रवादी | ९५२१३ |
| वाई | मकरंद जाधव (पाटील) | राष्ट्रवादी | १०१२१८ |
| फलटण | दीपक चव्हाण | राष्ट्रवादी | ९२९१० |
| भोर | संग्राम थोपटे | काँग्रेस | ७८६०२ |

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| पुरंदर | विजय शिवतारे | शिवसेना | ८२३३९ |
| बारामती | अजित पवार | राष्ट्रवादी | १५०५८८ |

## कोकण

| | | | |
|---|---|---|---|
| सावंतवाडी | दीपक केसरकर | शिवसेना | ७०९०२ |
| कुडाळ | वैभव नाईक | शिवसेना | ७०५८२ |
| कणकवली | नितेश राणे | काँग्रेस | ७४७१५ |
| राजापूर | राजन साळवी | शिवसेना | ७६२६६ |
| रत्नागिरी | उदय सामंत | शिवसेना | ९३८७६ |
| चिपळूण | सदानंद चव्हाण | शिवसेना | ७५६९५ |
| गुहागर | भास्कर जाधव | राष्ट्रवादी | ७२५२५ |



| पक्ष | २००९ च्या जागा | २०१४ च्या जागा |
|---|---|---|
| भाजप | ४६ | १२२ |
| राष्ट्रीय काँग्रेस | ८२ | ४२ |
| शिवसेना | ४४ | ६३ |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ६२ | ४१ |
| मनसे | १३ | ०१ |
| राष्ट्रीय समाज पक्ष | १ | ०१ |
| स्वाभिमानी पक्ष | १ | ०० |
| शेकाप | ४ | ०३ |
| ब. वि. आघाडी | २ | ०३ |
| भारीप बहुजन महासंघ | १ | ०१ |
| माकप | १ | ०१ |
| जनसुराज्य शक्ती | २ | ०० |
| समाजवादी पार्टी | ४ | ०१ |
| लोकसंग्राम | १ | ०० |
| एमआयएम | ० | ०२ |
| अपक्ष | २४ | ०७ |
| एकूण | २८८ | २८८ |

## गणपतराव देशमुख सर्वात ज्येष्ठ सदस्य



सांगोला विधानसभा मतदारसंघातून १०व्यांदा विधानसभेवर निवडून आलेले गणपतराव देशमुख (वय ८८) हे सभागृहातील सर्वात ज्येष्ठ सदस्य असणार आहेत. १९६२ मध्ये केशवराव राऊत यांचा पराभव करून गणपतराव देशमुख विजयी झाले होते. १९७२ मध्ये काकासाहेब साळुंखे यांनी त्यांचा पराभव केला होता मात्र पोटनिवडणुकीत ते पुन्हा निवडुन आले. १९७८, १९८०, १९८५ व १९९० मध्ये अशा चारही निवडणुकीत विजयी झाले. १९९५ मध्ये त्यांचा शहाजी पाटील यांनी पराभव केला पण परत १९९९ मध्ये ते निवडून आले त्यानंतर २००४, २००९ आणि २०१४ मध्ये त्यांनी शहाजी पाटील यांचा पराभव केला.

श्रीगोंदा मतदारसंघातून निवडून आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे राहुल जगताप हे सर्वात तरुण आमदार ठरले आहेत. त्यांनी वयाच्या २६ व्या वर्षी विधानसभेमध्ये प्रवेश केला आहे.

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| दापोली | संजय कदम | राष्ट्रवादी | ५२९०७ |
| महाड | भरत गोगावले | शिवसेना | ९४४०८ |
| श्रीवर्धन | अवधूत तटकरे | राष्ट्रवादी | ६१०३८ |
| अलिबाग | सुभाष पाटील | शेकाप | ७६९५९ |
| पेण | धैर्यशील पाटील | शेकाप | ६४६१६ |
| उरण | मनोहर भोइर | शिवसेना | ५६१३१ |
| कर्जत | सुरेशभाऊ लाड | राष्ट्रवादी | ५७०१३ |
| पनवेल | प्रशांत ठाकूर | भाजप | १२५१४२ |
| **मुंबई** | | | |
| कुलाबा | राज पुरोहित | भाजप | ५२६०८ |
| मुंबादेवी | अमिन पटेल | काँग्रेस | ३९१८८ |
| मलबार हिल | मंगलप्रभात लोढा | भाजप | ९७८१८ |
| भायखळा | वारीस पठाण | एमआयएम | २५३१४ |
| शिवडी | ॲड. अजय चौधरी | शिवसेना | ७२४६२ |
| वरळी | सुनील शिंदे | शिवसेना | ६०६२५ |
| माहीम | सदा सरवणकर | शिवसेना | ४६२९१ |
| वडाळा | कालिदास कोळंबकर | काँग्रेस | ३८५४० |
| सायन-कोळीवाडा | कॅप्टन आर. तामिल सेल्वन | भाजप | ४०८६९ |
| धारावी | वर्षा गायकवाड | काँग्रेस | ४७७१८ |
| वांद्रे पश्चिम | ॲड. आशिष शेलार | भाजप | ७४७७९ |
| वांद्रे पूर्व | प्रकाश (बाळा) सावंत | शिवसेना | ४१३८८ |
| कलिना | संजय पोतनीस | शिवसेना | ३०७१५ |
| कुर्ला | मंगेश कुडाळकर | शिवसेना | ४१५८० |
| चेंबूर | प्रकाश फातर्पेकर | शिवसेना | ४७४१० |
| मानखुर्द-शिवाजीनगर | अबू आझमी | सपा | ४१७१९ |
| अणुशक्तीनगर | तुकाराम काते | शिवसेना | ३९९६६ |
| घाटकोपर पूर्व | प्रकाश महेता | भाजप | ६७०१२ |
| घाटकोपर पश्चिम | राम कदम | भाजप | ८०३४३ |
| चांदिवली | मोहम्मद आरिफ खान | काँग्रेस | ७३१४१ |
| विलेपार्ले | पराग अळवनी | भाजप | ७४२७० |
| अंधेरी पूर्व | रमेश लटके | शिवसेना | ५२८१७ |
| अंधेरी पश्चिम | अमीत साटम | भाजप | ५९०२२ |
| वर्सोवा | डॉ. भारती लवेकर | भाजप | ४९१८२ |
| गोरेगाव | विद्या ठाकूर | भाजप | ६३६२९ |
| मालाड पश्चिम | अस्लम शेख | काँग्रेस | ५६५७४ |

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| चारकोप | योगेश सागर | भाजप | ९६०९७ |
| कांदिवली पूर्व | अतुल भातखळकर | भाजप | ७२४२७ |
| दिंडोशी | सुनील प्रभू | शिवसेना | ५६५७७ |
| जोगेश्वरी पूर्व | रवींद्र वायकर | शिवसेना | ७२७६७ |
| भांडूप पश्चिम | अशोक पाटील | शिवसेना | ४८१५१ |
| विक्रोळी | सुनील राऊत | शिवसेना | ५०३०२ |
| मुलुंड | सरदार तारासिंह | भाजप | ९३८५० |
| मागाठणे | प्रकाश सुर्वे | शिवसेना | ६५०१६ |
| दहीसर | मनीषा चौधरी | भाजप | ७७२३८ |
| बोरीवली | विनोद तावडे | भाजप | १०८२७८ |
| **ठाणे** | | | |
| बेलापूर | मंदा म्हात्रे | भाजप | ५५३१६ |
| ऐरोली | संदीप नाईक | राष्ट्रवादी | ७६४४४ |



## महिला आमदारांची टक्केवारी वाढली

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत विविध पक्षांच्या २० महिला आमदार म्हणून निवडून आल्या. गेल्या विधानसभेत ११ महिला आमदार होत्या. १९८० मध्ये १९ महिला आमदार निवडून आल्या होत्या. त्यामुळे यावेळेच्या विधानसभेत आत्तापर्यंतच्या सर्वाधिक महिला आमदार निवडून आल्या आहे. यामध्ये भाजपच्या १२, काँग्रेसच्या ५ तर राष्ट्रवादीच्या ३ महिला आमदारांचा समावेश आहे.

१९६२ मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत एकूण ३६ महिला उमेदवारांनी निवडणूक लढवली होती. त्यापैकी १३ महिला उमेदवार विजयी झाल्या होत्या.

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| मुंब्रा कळवा | जितेंद्र आव्हाड | राष्ट्रवादी | ५६५३३ |
| ठाणे | संजय केळकर | भाजप | ७०८८४ |
| कोपरी पाचपाखाडी | एकनाथ शिंदे | शिवसेना | १००३१६ |
| ओवळा माजिवडा | प्रताप सरनाईक | शिवसेना | ६८५७१ |
| मीरा भाइंदर | नरेंद्र मेहता | भाजप | ९१४६८ |
| कल्याण ग्रामीण | सुभाष भोईर | शिवसेना | ८४११० |
| डोंबिवली | रवींद्र चव्हाण | भाजप | ८३८७२ |
| कल्याण पूर्व | गणपत गायकवाड | अपक्ष | ३६३५७ |
| उल्हासनगर | ज्योती कालानी | राष्ट्रवादी | ४३७६० |
| अंबरनाथ | डॉ. बालाजी किणीकर | शिवसेना | ४७००० |
| मुरबाड | किसन कथोरे | भाजप | ८५५४३ |
| कल्याण पश्चिम | नरेंद्र पवार | भाजप | ५४३८८ |
| भिवंडी पूर्व | रुपेश म्हात्रे | शिवसेना | ३३५४१ |
| भिवंडी पश्चिम | महेश चौगुले | भाजप | ४२४८३ |
| शहापूर | पांडूरंग बरोरा | राष्ट्रवादी | ५६८१३ |
| भिवंडी ग्रामीण | शांताराम मोरे | शिवसेना | ५७०८२ |
| वसई | हिंतेंद्र ठाकूर | बविआ | ९७२९१ |
| नालासोपारा | क्षितिज ठाकूर | बविआ | ११३५६६ |
| बोईसर | विलास तरे | बविआ | ६४५५० |
| पालघर | कृष्णा घोडा | शिवसेना | ४६१४२ |
| विक्रमगड | विष्णू सवरा | भाजप | ४०२०१ |
| डहाणू | पास्कल धनारे | भाजप | ४४८४९ |

## मराठवाडा

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| उमरगा | ज्ञानराज चौगुले | शिवसेना | ६५१७८ |
| औसा | बसवराज पाटील | काँग्रेस | ६४२३७ |
| निलंगा | संभाजी निलंगेकर | भाजप | ७६८१७ |
| उदगीर | सुधाकर भालेराव | भाजप | ६६६८६ |
| अहमदपूर | विनायक पाटील | अपक्ष | ६१९५७ |
| लातूर शहर | अमित देशमुख | काँग्रेस | ११९६५६ |
| लातूर ग्रामीण | त्र्यंबकराव भिसे | काँग्रेस | १००८९७ |
| परळी | पंकजा मुंडे | भाजप | ९६९०४ |
| केज | संगीता ठोंबरे | भाजप | १०६८३४ |
| आष्टी | भीमराव धोंडे | भाजप | १२०९१५ |
| बीड | जयदत्त क्षीरसागर | राष्ट्रवादी | ७७१३४ |
| माजलगाव | आर. टी. देशमुख | भाजप | ११२४९७ |
| गेवराई | लक्ष्मण पवार | भाजप | १३६३८४ |
| वैजापूर | भाऊसाहेब पाटील | राष्ट्रवादी | ५३११४ |
| गंगापूर | प्रशांत बंब | भाजप | ५५४८३ |
| पैठण | संदीपान भुमरे | शिवसेना | ६६९९१ |
| औरंगाबाद पूर्व | अतुल सावे | भाजप | ६४५२८ |
| औरंगाबाद पश्चिम | संजय शिरसाट | शिवसेना | ६१२८२ |
| औरंगाबाद मध्य | इम्तियाज जलील | एमआयएम | ६१८४३ |
| फुलंब्री | हरीभाऊ बागडे | भाजप | ७३२९४ |
| कन्नड | हर्षवर्धन जाधव | शिवसेना | ६२५४२ |
| सिल्लोड | अब्दुल सत्तार | काँग्रेस | ९६०३८ |
| भोकरदन | संतोष दानवे | भाजप | ६९५९१ |
| बदनापूर | नारायण कुचे | भाजप | ७३५६० |
| जालना | अर्जुन खोतकर | शिवसेना | ४५०७८ |
| घनसावंगी | राजेश टोपे | राष्ट्रवादी | ९८०३० |
| परतूर | बबनराव लोणीकर | भाजप | ४६९३७ |
| पाथ्री | मोहन फड | अपक्ष | ६९०८१ |
| गंगाखेड | मधुसुदन केंद्रे | राष्ट्रवादी | ५८४१५ |
| परभणी | डॉ. राहुल पाटील | शिवसेना | ७१५८४ |
| जिंतूर | विजय भांबळे | राष्ट्रवादी | १०६९१२ |
| हिंगोली | तानाजी मुटकुळे | भाजप | ९७०४५ |
| कळमनुरी | संतोष टारफे | काँग्रेस | ६७१०४ |
| वसमत | जयप्रकाश मुंदडा | शिवसेना | ६३८५१ |
| मुखेड | गोविंद राठोड | भाजप | ११८७८१ |
| देगलूर | सुभाष साबणे | शिवसेना | ६६८५२ |
| नायगाव | वसंत चव्हाण | काँग्रेस | ७१०२० |



## विक्रमी मताधिक्य

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यात सर्वाधिक ८९,७९१ मतांनी विजय मिळवला. अजित पवार यांना १,५०,५८८ मते मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी बाळासाहेब जावडे यांना ६०,७९७ मते मिळाली. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे अवधूत तटकरे अवघ्या ७७ मतांनी विजयी ठरले आहेत.

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| लोहा | प्रतापराव चिखलीकर | शिवसेना | ९२४३५ |
| नांदेड दक्षिण | हेमंत पाटील | शिवसेना | ४५८३६ |
| नांदेड उत्तर | डी.पी. सावंत | काँग्रेस | ४०३५६ |
| भोकर | अमिता चव्हाण | काँग्रेस | १००७८१ |
| हदगाव | नागेश पाटील अष्टीकर | शिवसेना | ७८५२० |
| किनवट | प्रदीप जाधव नाईक | राष्ट्रवादी | ६०१२७ |

## विदर्भ

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| उमरखेड | राजेंद्र नजरधनी | भाजप | ९०१९० |
| पुसद | मनोहर नाईक | राष्ट्रवादी | ९४१५२ |
| आरणी | राजू तोडसाम | भाजप | ८६९९१ |
| दिग्रस | संजय राठोड | शिवसेना | १२१२१६ |
| यवतमाळ | मदन येरावार | भाजप | ५३६७१ |
| राळेगाव | प्रा. डॉ अशोक उईके | भाजप | १००६१८ |
| वणी | संजीव रेड्डी बोदकुरवार | भाजप | ४५१७८ |
| वरोरा | सुरेश धानुरकर | शिवसेना | ५३८७७ |
| चिमूर | बंटी भांगडीया | भाजप | ८७३७७ |
| ब्रह्मपुरी | विजय वडेट्टीवार | काँग्रेस | ७०३७३ |
| बल्लारपूर | सुधीर मुनगंटीवार | भाजप | १०३७१८ |
| चंद्रपूर | नानाजी शामकुळे | भाजप | ८१४८३ |
| राजुरा | संजय धोटे | भाजप | ६६२२३ |
| अहेरी | अंबरीश अत्राम | भाजप | ५६४१८ |

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| गडचिरोली | डॉ. देवराव होली | भाजप | ७०१८५ |
| आरमोरी | कृष्णा गजबे | भाजप | ६०४१३ |
| आमगाव | संजय पूराम | भाजप | ६२५९० |
| गोंदिया | गोपाळदास अग्रवाल | काँग्रेस | ६२७०१ |
| तिरोडा | विजय रहांगडाले | भाजप | ५४१६० |
| अर्जुनी मोरगाव | राजकुमार बडोले | भाजप | ६४४०१ |
| साकोळी | राजेश काशिवार | भाजप | ८०९०२ |
| भंडारा | रामचंद्र अवसरे | भाजप | ८३४०८ |
| तुमसर | चरण वाघमारे | भाजप | ७३९५० |
| रामटेक | द्वारम मल्लिकार्जून रेड्डी | भाजप | ५९३४३ |
| कामठी | चंद्रशेखर बावनकुळे | भाजप | १२६७५५ |
| नागपूर उत्तर | डॉ. मिलिंद माने | भाजप | ६८९०५ |
| नागपूर पश्चिम | सुधाकर देशमुख | भाजप | ८६५०० |
| नागपूर मध्य | विकास कुंभारे | भाजप | ८७५२३ |
| नागपूर पूर्व | कृष्णा खोपडे | भाजप | ९९१३६ |
| नागपूर दक्षिण | सुधाकर कोहळे | भाजप | ८१२२४ |
| नागपूर दक्षिण-पश्चिम | देवेंद्र फडणवीस | भाजप | ११३९१८ |
| उमरेड | सुधीर पारवे | भाजप | ९२३९९ |
| हिंगणा | समीर मेघे | भाजप | ८४१३९ |
| सावनेर | केदार सुनील छत्रपाल | काँग्रेस | ८४६३० |
| काटोल | डॉ. आशिष देशमुख | भाजप | ७०३४४ |
| वर्धा | डॉ.पंकज भोयर | भाजप | ४५८९७ |
| हिंगणघाट | समीर कुणावर | भाजप | ९०२७५ |
| देवळी | रणजीत कांबळे | काँग्रेस | ६२५३३ |
| आर्वी | अमर काळे | काँग्रेस | ७५८८६ |
| मोर्शी | डॉ. अनिल बोंडे | भाजप | ७१६१८ |
| अचलपूर | बच्चू कडू | अपक्ष | ५९२३४ |
| मेळघाट | प्रभुदास भिलावेकर | भाजप | ५७००२ |
| दर्यापूर | रमेश बुंदिले | भाजप | ६४२२४ |
| तिवसा | ॲड. यशोमती ठाकूर | काँग्रेस | ५८८०८ |
| अमरावती | डॉ. सुनील देशमुख | भाजप | ८४०३३ |
| बडनेरा | रवी राणा | अपक्ष | ४६८२७ |
| धामणगाव रेल्वे | वीरेंद्र जगताप | काँग्रेस | ७०८७९ |
| कारंजा | राजेंद्र पाटणी | भाजप | ४४७५१ |
| वाशिम | लखन मलिक | भाजप | ४८१९६ |
| रिसोड | अमित झनक | काँग्रेस | ७०९३९ |
| मुर्तिजापूर | हरीश पिंपळे | भाजप | ५४२२६ |
| अकोला पूर्व | रणधीर सावरकर | भाजप | ५३६७८ |
| अकोला पश्चिम | गोवर्धन शर्मा | भाजप | ६६९३४ |
| बाळापूर | बळीराम सिरस्कर | भा.ब.महासंघ | ४१४२६ |
| आकोट | प्रकाश भारसाकळे | भाजप | ७००८६ |
| जळगाव जामोद | डॉ. संजय कुटे | भाजप | ६३८८८ |
| खामगाव | आकाश फुंडकर | भाजप | ७१८१९ |
| मेहकर | संजय रायमुलकर | शिवसेना | ८०३५६ |
| सिंदखेड राजा | डॉ.शशिकांत खेडेकर | शिवसेना | ६४२०३ |
| चिखली | राहुल बोंद्रे | काँग्रेस | ६१५८१ |
| बुलढाणा | हर्षवर्धन सपकाळ | काँग्रेस | ४६९८५ |

| मतदारसंघ | विजेता उमेदवार | पक्ष | मतसंख्या |
|---|---|---|---|
| **उत्तर महाराष्ट्र** | | | |
| इगतपुरी | निर्मला गावित | काँग्रेस | ४९१२८ |
| देवळाली | योगेश घोलप | शिवसेना | ४९७५१ |
| नाशिक पश्चिम | सीमा हिरे | भाजप | ६७४८९ |
| नाशिक मध्य | देवयानी फरांदे | भाजप | ६१५४८ |
| नाशिक पूर्व | बाळासाहेब सानप | भाजप | ७८९४१ |
| दिंडोरी | नरहरी झिरवाल | राष्ट्रवादी | ६८२८४ |
| निफाड | अनिल कदम | शिवसेना | ७८१८६ |
| सिन्नर | राजाभाऊ वाजे | शिवसेना | १०४०३१ |
| येवला | छगन भुजबळ | राष्ट्रवादी | ११२७८७ |
| चांदवड | डॉ.राहूल अहेर | भाजप | ५४९४६ |
| कळवण | जीवा गावित | माकप | ६७७९५ |
| बागलाण | दीपिका चव्हाण | राष्ट्रवादी | ६८४३४ |
| मालेगाव बाह्य | दादाजी भुसे | शिवसेना | ८२०९३ |
| मालेगाव मध्य | आसीफ शेख | काँग्रेस | ७५३२६ |
| नांदगाव | पंकज भुजबळ | राष्ट्रवादी | ६९२६३ |
| मलकापूर | चैनसुख संचेती | भाजप | ७५९६५ |
| मुक्ताईनगर | एकनाथराव खडसे | भाजप | ८५६५७ |
| जामनेर | गिरीश महाजन | भाजप | १०३४९८ |
| पाचोरा | किशोर पाटील | शिवसेना | ८७५२० |
| चाळिसगाव | उन्मेष पाटील | भाजप | ९४७५४ |
| एरंडोल | डॉ. सतीश पाटील | राष्ट्रवादी | ५५६५६ |
| अमळनेर | शिरीषदादा चौधरी | अपक्ष | ६८१४९ |

## आमदारांचे शिक्षण




तेराव्या विधानसभेत उच्चशिक्षित आमदारांची टक्केवारी वाढली आहे. जवळपास ७० आमदार पदवीधर आहेत. तर ४९ आमदारांनी पदव्युत्तर पदवी घेतली आहे. ७ आमदारांनी पीएच.डी. केली आहे. तर ७ जणांनी इतर व्यावसायिक शिक्षण घेतले.

| | | | |
|---|---|---|---|
| जळगाव ग्रामीण | गुलाबराव पाटील | शिवसेना | ८४०२० |
| जळगाव शहर | सुरेश भोळे | भाजप | ८८३६३ |
| भुसावळ | संजय सावकारे | भाजप | ८७८१८ |
| रावेर | हरिभाऊ जावळे | भाजप | ६५९६२ |
| चोपडा | चंद्रकांत सोनावणे | शिवसेना | ५४१७६ |
| शिरपूर | काशिराम पावरा | काँग्रेस | ९८११४ |
| सिंदखेडा | जयकुमार रावल | भाजप | ९२७९४ |
| धुळे शहर | अनिल गोटे | भाजप | ५७७८० |
| धुळे ग्रामीण | कुणाल पाटील | काँग्रेस | ११९०९४ |
| साक्री | धनाजी सीताराम अहिरे | काँग्रेस | ७४७६० |
| नवापूर | सुरूपसिंग नाईक | काँग्रेस | ९३७९६ |
| नंदूरबार | विजयकुमार गावित | भाजप | १०१३२८ |
| शहादा | उदेसिंग पाडवी | भाजप | ५८५५६ |
| अक्कलकुवा | ॲड. के. सी. पाडवी | काँग्रेस | ६४४१० |

# लोहपुरुष

१९३५ ते १९४७ या एका तपात भारतात आणि जगात असंख्य घटना विलक्षण झपाट्याने घडल्या. ज्या घटना घडायला खरं म्हणजे पन्नास साठ वर्षे जायला हवी होती, अशा वादळी घटना केवळ बारा वर्षांत घडल्या. दुसरे महायुद्ध झाले, जगाचे नकाशे धडाधड बदलले, फ्रेंचांचे साम्राज्य धुळीस मिळाले, ब्रिटिश संपले, ज्या इंग्लंडच्या साम्राज्यावरील सूर्य कधीच मावळत नव्हता, तो सूर्य आता रोज मावळू लागला. १८५७ साली मजबूत झालेले ब्रिटिशांचे भारतावरील राज्य आणि त्यांची पोलादी पकड केवळ नव्वद वर्षांत संपली. भारताला स्वातंत्र्य मिळाले. पण भारताची फाळणीदेखील झाली. अत्याचारांचा कहर झाला. नव्वद लाख निर्वासित भारतात आले. त्यांच्या पुनर्वसनाचे अवघड काम पुढे १९६५ सालापर्यंत होत होते.त्या पुनर्वसनाला पन्नास वर्षांपूर्वी ३५०० हजार कोटी एवढा प्रचंड खर्च आला. भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी अत्यंत गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झाली, ती म्हणजे, भारताचे ५६५ तुकडे पडतील की काय असे दारुण आव्हान भारतासमोर उभे राहिले. या विचित्र परिस्थितीवर पोलादीपुरुष वल्लभभाई पटेल यांनी मात करून अखंड भारत निर्माण केला.



गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील करमसद या गावी ३१ ऑक्टोबर १८७५ या दिवशी वल्लभभाईंचा जन्म झाला. ही एकंदर पाच भावंडे. वल्लभभाई मधले. पटेलांचे वडील जव्हेरभाई यांनी १८५७च्या उठावात भाग घेतला होता. राणी लक्ष्मीबाईला साहाय्य करण्यासाठी ते झाशीला गेले होते. वल्लभभाईंना देशभक्तीचा प्रत्यक्ष संघर्षाचा पैतृक वारसाच लाभला होता.

१९१० साली वल्लभभाई इंग्लंडला गेले, आणि बॅरिस्टर होऊन १९१३ साली भारतात परत आले. विलायतला जाण्यापूर्वीच त्यांचा विवाह झाला होता. मणीबेन आणि डाह्याभाई

**डॉ. गिरीश दाबके**

या दोन मुलांच्या जन्मानंतर १९०९ सालीच पटेलांची पत्नी निवर्तली. त्यानंतर पटेलांनी पुन्हा संसाराचा विचार केला नाही. दोन मुलांचा प्रतिपाळ हाच त्यांचा प्रपंच होता.

### निष्णात फौजदार वकील

वल्लभभाई अत्यंत निष्णात असे फौजदार वकील होते. अहमदाबाद बोरसद आणि गोध्र्याला दणक्यात वकिली सुरू झाली. अहमदाबादला 'गुजरात सभेत' एक लक्षणीय घटना घडली. 'गुजरात सभा' ही अहमदाबाद मधील उच्चभ्रू वर्गाची एक संस्था होती. एकत्र भेटावे, आमोदप्रमोद करावा, एखादी बैठक आयोजित करावी, आणि सरकारकडे ठराव पाठवून द्यावा, एवढाच मर्यादित हेतू गुजरात सभेचा असायचा. १९१९ साली ही संस्था काँग्रेसमधे विलीन झाली. ह्या सभेत एका संध्याकाळी एक उंच किडकिडीत, किंचित थबकत चाचरत बोलणारी, अगदी सामान्य व्यक्तिमत्त्व असणारी व्यक्ती आली. ती व्यक्ती काही सामाजिक कार्याविषयी बोलत होती. त्या व्यक्तीचा किंचितही प्रभाव पटेलांवर पडला नाही. एवढेच नव्हे तर, 'यात काहीच विशेष नाही' अशीच पटेलांची प्रतिक्रिया होती. पण काय योग असतात, याच व्यक्तीला पुढे पटेलांनी 'गुरू' म्हणून स्वीकारले. ती दुसरी व्यक्ती गांधीजी होते.

### नेतृत्वाची मुहूर्तमेढ

१९१७साली अहमदाबादला अतिवृष्टी

झाली, त्यातच प्लेगची साथ, १८,००० माणसं ह्या साथीत मेली, हाहाकार माजला, शेतीवर परिणाम झाला, चार आणेदेखील उत्पन्न आलं नाही. सरकारने सा-यात सूट द्यावी एवढीच प्रजेची माफक अपेक्षा होती. पण ती सफल झाली नाही, त्यासाठी गांधीजींच्या सूचनेप्रमाणे पटेलांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू झाले, ही पटेलांच्या राजकीय नेतृत्वाची मुहूर्तमेढ होती. १९२१ साली लोकमान्यांच्या पहिल्या पुण्यतिथीला परदेशी कापडाच्या होळी करण्याचा निर्णय घेण्यात आला. पटेलांनी सर्वात जास्त आणि सर्वात मोठ्या अशा होळ्या पेटविल्या. त्यानंतर बार्डोली आंदोलन, असहकाराचे आंदोलन, प्रांतिक सरकारे स्थापन करण्याचा मिळालेला अनुभव, १९४२चे 'भारत छोडो' आंदोलन, तुरुंगवास, अशा अनेक संघर्षांच्या मुशीत पटेलांचे नेतृत्व आणि कर्तृत्व तावून सुलाखून दिवसेंदिवस प्रगल्भ होत गेले.

**फाळणीचे आव्हान**

दुस-या महायुद्धामुळे विकलांग झालेल्या ब्रिटिशांनी अत्यंत नाइलाजाने भारताला स्वातंत्र्य देण्याचा निर्णय घेतला. पण... हे स्वातंत्र्य देताना भारतात जास्तीत जास्त गदारोळ कसा माजेल याची ब्रिटिशांनी रणनीती आखली. १९३५ पासून जिनांनी पाकिस्तानची मागणी केली होती. १९४० साली पाकिस्तानचा ठराव मुस्लीम लीगने संमत केला. 'आमच्या मागण्या संमत करा, नाही तर, आम्ही 'डायरेक्ट ॲक्शन' घेऊ, अशा धमक्या देऊन आणि त्या अक्षरशः अमलात आणून जिनांनी भारतीय राजकारण फाळणीच्या उंबरठ्यावर आणून ठेवले. जिनांना पूर्ण पंजाब आणि पूर्ण बंगाल पाकिस्तान म्हणून हवा होता. या मागणीला लोहपुरुष पटेलांनी ठाम विरोध केला. परिणामी पूर्ण पंजाब अथवा पूर्ण बंगाल ही मागणी मागे पडली. यातच ब्रिटिशांनी आणखी एक कुटिल डाव टाकला. त्याकाळी भारतात ५६५ संस्थाने होती. या संस्थानांनी स्वतंत्र राहावे, पाकिस्तानात विलीन व्हावे अथवा भारतीय संघराज्यात विलीन व्हावे असे तीन पर्याय देण्यात आले. एकच गदारोळ माजला. संस्थानिकांचा भारत म्हणजे ४०% भारत. एवढा मोठा भूप्रदेश अस्वस्थ झाला. १५ ऑगस्टला स्वातंत्र्य मिळणार हा निर्णय निश्चित होता. सीमेवरचे संस्थानिक अधिकच अस्वस्थ झाले. हैदराबादच्या निजामाने तर जाहीरच केले की, 'मी पाकिस्तानात विलीन होणार.' हैदराबाद संस्थान म्हणजे सुमारे पाऊण महाराष्ट्र एवढा विशाल भूप्रदेश. मराठवाड्यापासून ते थेट तेलंगणापर्यंत पसरलेला. १९४७ साली सत्ताधीश असलेला निजाम त्याच्या लोभीपणाबद्दल, कंजूसपणाबद्दल, आणि विकृत कामाचाराबद्दल कुख्यात होता. याच्या कारकिर्दीत रझाकारांची संघटना फोफावली, ह्या क्रूर आक्रमक संघटनेने सरकारी आकडेवारीनुसार किमान एक लाख लोकांची कत्तल केली.

वल्लभभाईबद्दल माजी पंतप्रधान नरसिंहराव यांनी मोजक्या शब्दांत वर्णन केले आहे. ते म्हणतात,

(वल्लभभाई आमचे मुक्तिदाते आहेत. त्यांच्याबद्दल मी माझ्या भावना कशा व्यक्त करू?' या शब्दांत माजी पंतप्रधान नरसिंह राव यांनी वल्लभभाईंबद्दलची त्यांची भावना व्यक्त केली आहे. ह्या शब्दांत हैदराबाद मधील समस्त हिंदू जनतेच्या भावना प्रगट झाल्या आहेत. असो.) या निजामाने पाकिस्तानला २० कोटींचे कर्ज दिले, आणि त्याची परतफेड म्हणून विमाने आणि बंदुका संस्थानात आणण्यात आल्या. हैदराबादच्या पावलावर पाऊल टाकून जुनागढ संस्थानानेदेखील पाकिस्तानात विलीन होण्याचा निर्णय जाहीर केला. जोधपूर संस्थानाचा देखील हाच विचार होता. कराची, जोधपूर, आणि भोपाळ यांचा एक संघ स्थापन करावा अशी जिनांची योजना होती. ही योजना म्हणजे भारताच्या काळजात खुपसलेला खंजीर होता. अक्षरशः. काठियावाड्यातील जामसाहेब हे तर जोधपूरच्या नबाबापेक्षा मातब्बर होते. जामनगर, भावनगर, पोरबंदर, मोरवी धंगधरा, आणि जुनागढ अशा सात राज्यांचा आणखी एक वेगळा संघ उभारावा अशी एक कुटिल योजना जामसाहेबाने आखली होती. काठियावाड्यात २२२ संस्थाने होती, आणि २२,००० वर्ग मैल एवढा प्रदेश होता. जुलै ४७च्या सुरुवातीला संस्थान विलीनीकरणाचे खाते पटेलांच्या अखत्यारीत आले. १५ ऑगस्ट हा दिवस निश्चित ठरलेला आहे. दुसरी अडचण अशी आहे, की, खात्याची जबाबदारी पटेलांवर आहे, पण प्रत्यक्ष सत्तांतर झाले नसल्यामुळे हातात अधिकार मात्र नाहीत. अशी कोंडी झालेली असतानाही ह्या ५६५ संस्थानांच्या विलीनीकरणाचे शिवधनुष्य पटेलांनी राजकारण करून, भावनात्मक आव्हान करून तडीस नेले. १९४८ पर्यंत हैदराबादचा प्रश्न सुटला नाही. शेवटी ऑक्टोबर १९४८ मधे वल्लभभाईंनी हैदराबादवर सैनिकी कारवाई केली. आणि केवळ चार दिवसात निजाम शरण आला. ५६५ संस्थानांचे विलिनीकरण आणि हैदराबादचे देखील विलीनीकरण ही पटेलांनी बजावलेली अद्वितीय अशी ऐतिहासिक भूमिका आहे. हे जर झाले नसते, तर भारताचे ५६५ तुकडे झाले असते. म्हणजे प्रत्येक राज्य सरासरीने पाहता एका जिल्ह्यापेक्षादेखील कितीतरी लहान. त्या दारुण अवस्थेत भारताची दशा उडाली असती. जगातील महासत्ता होण्याची स्वप्नं तर सोडा, भारत अस्तित्वातच उरला नसता. हा विशाल संपन्न समृद्ध आणि 'एकविसाव्या शतकातील महासत्ता' हे स्वप्न पाहणारा आणि तशी क्षमता असणाऱ्या भारताचा पाया पोलादीपुरूष पटेलांनी घातला आहे.

**संपर्क :** ०९७६८०२१८४५,
०९९२०५५७८५९

## ... आणि वल्लभभाई सरदार झाले



१९२७ साली ब्रिटिश सरकारने २२% सारावाढ केली. असंतोषाचा भडका उडाला. वल्लभभाई पटेल यांनी या वेळी आंदोलन केले. हेच ते गाजलेले बार्डोली आंदोलन. (१९२७) हा संघर्ष बारा पंधरा वर्षे चालू होता. सुमारे दीड दोन लाख नागरिकांचे नेतृत्व पटेलांनी केले. सरकारने जप्त केलेल्या जमिनी परत मिळायला १९३८ साल उजाडावे लागले. पण बार्डोलीकर वाकलेही नाहीत, मोडलेही नाहीत, ते चिवटपणे झुंजत राहिले. ह्याच संघर्षानंतर वल्लभभाईंना 'सरदार' ही लोकपदवी प्राप्त झाली. 'भारताचे लेनिन' किंवा 'भारताचे बिस्मार्क' या शब्दांत इंग्रजी पत्रकारितेने पटेलांची प्रशंसा केली.

# स्वच्छ भारत... स्वच्छ महाराष्ट्र!

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्टच्या आपल्या भाषणात भारत २०१९ पर्यंत स्वच्छ करण्याचे आवाहन केले होते. त्या मोहिमेची सुरूवात २ ऑक्टोबरला गांधी जयंतीपासून सुरू झाली. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनीही स्वच्छ भारत... स्वच्छ महाराष्ट्राचे आवाहन केले आहे.पंतप्रधान मोदी यांच्या पावलावर पाऊल टाकत स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छतेचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रतिसाद देऊन आपला सक्रिय सहभाग नोंदविला...**

कोणत्याही कार्याची सुरुवात जरी छोटी असली तरी ध्येय उच्च असेल तर त्यात यश मिळतेच. त्या कार्याची सुरुवात आपण आपल्यापासून केली तर त्यात सहभागी होणाऱ्यांचा उत्साह वाढतो. त्याचमुळे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी केवळ स्वच्छतेसाठी आवाहन केले नाही तर हातात झाडू घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. त्यांच्यासोबत त्यांनी निवड केलेल्या स्वच्छतादूतांनीही सक्रिय सहभाग नोंदविला.

'चला, सहभागी होऊ या, आपण सर्व जण मिळून आपला महाराष्ट्र स्वच्छ आणि सुंदर बनवू या' असा निर्धार करत जे. जे. रुग्णालय परिसरात राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

राज्यपालांनी स्वच्छतादूत म्हणून निवड केलेल्या उद्योजिका आणि सामाजिक कार्यकर्त्या नीता अंबानी, राज्यपालांच्या पत्नी विनोदा राव, राज्याचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त सीताराम कुंटे, राज्यपालांचे सचिव विकासचंद्र रस्तोगी, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, जे. जे. रुग्णालय समूहाचे अधिष्ठाता डॉ. तात्याराव लहाने यांच्यासह विविध वरिष्ठ अधिकारी, जे. जे. रुग्णालयातील कर्मचारी आदींनी या मोहिमेत सहभाग घेतला.

पंतप्रधानांनी नुकत्याच झालेल्या स्वातंत्र्यदिनी देशात स्वच्छ भारत अभियान सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार महाराष्ट्रात नुकताच राज्यपालांच्या हस्ते मंत्रालय आणि राजभवन येथे या अभियानाचा प्रारंभ करण्यात आला होता. त्यावेळी, महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी प्राधान्याने स्वच्छता अभियान राबवण्यात



मंत्रालय परिसरात राज्यपालांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम राबवण्यात आली

यावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन मुंबईतील महत्त्वाच्या अशा जे. जे. रुग्णालय परिसरात स्वच्छता अभियान राबवले. राज्यपालांनी रुग्णालयासमोरील परिसराची स्वच्छता केली. उपस्थित सर्व मान्यवर या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले. त्यानंतर राज्यपाल आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रुग्णालय परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले.

राज्यपाल राव यांनी यावेळी स्वच्छता मोहिमेला शुभेच्छा दिल्या. सर्वांच्या सहभागातून आपले राज्य स्वच्छ आणि सुंदर बनवावे आणि स्वच्छ भारत अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## राज्यपालांचे आवाहन

२०१९ पर्यंत संपूर्ण भारत हागणदारीमुक्त करण्याचे केंद्र शासनाचे उद्दीष्ट आहे. त्या दृष्टीने आपल्या राज्यातही शौचालयांच्या बांधकामास गती देणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व विभागांनी या मोहिमेकडे प्राधान्याने लक्ष देऊन आपापला विभाग लवकरात लवकर हागणदारीमुक्त करावा. यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक असून सर्व विभागांनी जनजागृतीचा व्यापक कार्यक्रम हाती घ्यावा. शहरांमध्ये ठिकठिकाणी आकर्षक कचराकुंड्या लावण्यात याव्यात. भिंतींवर स्वच्छताविषयक घोषवाक्ये, काव्यपंक्ती लिहून लोकांपर्यंत हा संदेश प्रभावीपणे पोहोचवावा. पंतप्रधानांनी स्वच्छ भारत अभियानाच्या निमित्ताने केलेल्या आवाहनानुसार प्रत्येक महसुली विभागाने त्या त्या परिसरातील ९ मान्यवर व्यक्तींची स्वच्छतादूत म्हणून निवड करावी. त्यांच्यामार्फत स्वच्छता मोहिमेला गती द्यावी. याशिवाय स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालये, सामाजिक कार्यकर्ते आदी सर्वांच्या सहभागातून आपला परिसर स्वच्छ, निर्मल बनवावा.

शासनाने सुरू केलेली ही मोहीम निश्चितच कौतुकास्पद असून स्वच्छता ही फक्त औपचारिकता न राहता ती सवय आणि संस्कृती बनली पाहिजे, अशी प्रतिक्रिया स्वच्छतादूत नीता अंबानी यांनी या वेळी दिली.



**राज्यपालांनी स्वच्छतादूत म्हणून निवड केलेल्या उद्योजिका आणि सामाजिक कार्यकर्त्या नीता अंबानी, राज्यपालांच्या पत्नी विनोदा राव, मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त सीताराम कुंटे, राज्यपालांचे सचिव विकासचंद्र रस्तोगी, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, जे. जे. रुग्णालय समूहाचे अधिष्ठाता डॉ. तात्याराव लहाने आदींनी रुग्णालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवली**



**ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांनीही स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग**







**प्रसिद्ध अभिनेते सलमान खान, हृतिक रोशन आणि अभिनेत्री प्रियांका चोप्रा यांनीही स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला**

# मुख्यमंत्र्यांची प्रेरणास्थळांना भेट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर शनिवारी (ता. १ नोव्हेंबर) महाराष्ट्राच्या प्रेरणास्थळांना भेटी देऊन महापुरुषांना अभिवादन केले.

दादर येथील चैत्यभूमीत मुख्यमंत्र्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. डॉ. आंबेडकर जनसामान्यांचे प्रेरणास्थान आहे. त्यामुळे दादर येथील चैत्यभूमी परिसर लवकरच सुशोभीत केला जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीत स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपले मोलाचे योगदान दिले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांनी युवकांमध्ये देशभक्तीचे, त्यागाचे स्फुरण चढवले. अशा या वीराला वंदन करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी दादर येथील त्यांच्या स्मारकाला भेट देऊन अभिवादन केले. शिवाजी पार्क येथील बाळासाहेब ठाकरे स्मृतिस्थळाला भेट देऊन बाळासाहेबांना मुख्यमंत्र्यांनी अभिवादन केले. यावेळी मंत्रिमंडळातील सदस्य विनोद तावडे, प्रकाश महेता, पंकजा मुंडे, विद्या ठाकूर, दिलीप कांबळे तसेच आमदार ॲड. आशिष शेलार, भाई गिरकर, उपमहापौर अलका केरकर, मुंबई महापालिका आयुक्त सीताराम कुंटे आदी उपस्थित होते.





## जाणता राजा @ १०००

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे निर्मित 'जाणता राजा' या नाटकाचा एक हजारावा प्रयोग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स संकुल येथे झाला. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या समवेत शालेय शिक्षण व उच्च शिक्षण मंत्री विनोद तावडे उपस्थित होते.

'जाणता राजा' या नाटकात बाबासाहेब पुरंदरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जीवनपट व इतिहास उलगडून दाखविला आहे. अल्लाउद्दिन खिलजीच्या स्वारीपासून ते पेशवाईपर्यंतचा इतिहास कलात्मक पद्धतीने रसिकांसमोर मांडला आहे. संतांची शिकवण, अंगाई गीत, भारुड, जोगवा, गोंधळ, जागरण महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलेच्या माध्यमातून सर्व धर्मांची शिकवण या नाट्य प्रयोगामधून सादर करण्यात आली आहे. या नाटकाच्या प्रत्येक प्रयोगाप्रमाणे या प्रयोगालाही प्रचंड गर्दी उसळली होती.

## सुखी महाराष्ट्रासाठी विठ्ठलाला साकडे

विठ्ठला, महाराष्ट्रातील जनतेला भरपूर सूख दे, समाधान दे, महाराष्ट्राचा नावलौकिक आणखी वाढू दे, असे साकडे मंत्री एकनाथ खडसे यांनी विठ्ठलचरणी घातले. नुकत्याच झालेल्या कार्तिकी एकादशीनिमित्त विठ्ठल रखुमाईची शासकीय महापूजा करण्यासाठी एकनाथराव खडसे यांनी सपत्नीक पंढरपूरला भेट दिली. विठ्ठलाची महापूजा खडसे यांनी तर रखुमाईची पूजा त्यांच्या सुविद्य पत्नी मंदाकिनी खडसे यांनी केली. लाखो भाविकांच्या साक्षीने अतिशय हर्षोल्हासात ही महापूजा झाली.

दर आषाढी कार्तिकी एकादशीला विठुरायाच्या दर्शनासाठी राज्यातून भाविकांचा महापूर उसळतो. यावेळी महाराष्ट्र शासनाकडूनही विठ्ठलाची महापूजा केली जाते. या महापूजेचा मान जसा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना असतो तसाच एका वारकरी



कुटुंबालाही दिला जातो आणि मंदिर समितीतर्फे या जोडप्याचा सत्कार केला जातो. यावर्षी दीपक नगर, तरोडा बु.(जि. नांदेड) येथील वारकरी सुरेश कुलकर्णी (वय ४७) व वंदना कुलकर्णी (वय ४२) या वारकरी जोडप्याचा सत्कार श्री. खडसे यांच्या हस्ते करण्यात आला.

# ‘जय महाराष्ट्र’ने इतिहास घडविला

दि. ३१ ऑक्टोंबर २०१४ ... मुंबईतील वानखेडे स्टेडियमचे अतिभव्य मैदान... देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, वरिष्ठ नेते, मान्यवर आणि अफाट जनसागराची उपस्थिती... संध्या. ४ वा. २६ मि ... देवेंद्र गंगाधरराव फडणवीस या नागपूरच्या ४४ वर्षीय युवा, तडफदार नेत्याने मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. सारा आसमंत टाळ्यांनी, जयजयकाराने निनादला... वेळ सायंकाळी ७.१० वा.. विधानभवनातील मुख्यमंत्र्याचा बैठक कक्ष ... नुकताच मुख्यमंत्रिपदाचा पदभार स्वीकारलेले मुख्यमंत्री देवेंद्र गंगाधरराव फडणवीस, मोजकेच वरिष्ठ अधिकारी, टी. व्ही. कॅमेरे व तंत्रज्ञ, लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांची उपस्थिती... ७ वा. ५९ मि... सायलेन्स ऑन द फ्लोअर शेल कॅमेरा, ॲक्शन अशा आज्ञा होताच तिथल्या दूरचित्रवाणीसंचावर अक्षरे दिसली ‘जय महाराष्ट्र’... कार्यक्रमाचे लोकप्रिय टायटल साँग संपले... महाराष्ट्राच्या नव्या मुख्यमंत्र्यांची मुलाखत सुरू झाली. आणि ‘जय महाराष्ट्र’ कार्यक्रमाने इतिहास घडविला.

**‘जय महाराष्ट्र’ची किमया**

राज्याच्या नव्या मुख्यमंत्र्यांचा, त्यांनी पदभार स्वीकारल्यापासून ४ तासांच्या आत राज्यभरातील तसेच देश-विदेशातील **दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून घराघरात बघितली गेलेली ही मुलाखत कोट्यवधी नागरिकांना त्यांच्या अपेक्षापूर्तीच्या दिशेने नेणारी वाटली. एवढेच नव्हे, तर राज्यातील सर्व खाजगी वृत्तवाहिन्यांनी मुलाखतीचे संपादित अंश आपापल्या वाहिनीवरून पुढील २४ तास दाखवून मुलाखत आणखी अधिक काळ, अधिक लोकांपर्यंत पोहचविली. अगदी दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्रांनीही मा.मुख्यमंत्र्यांच्या या पहिल्या थेट मुलाखतीचे स्वागत आणि मूल्यमापन त्यांच्या वर्तमानपत्रांमधून केले.**

कोट्यवधी नागरिकांशी थेट संवाद दूरदर्शनवरून घडवून आणण्याची किमया, जय महाराष्ट्र कार्यक्रमाने साधली होती.



**लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर मुख्यमंत्र्यांची मुलाखत घेताना**

राज्यांच्या इतिहासात आजपर्यंत कधीही अनुभवायला न मिळालेला क्षण जय महाराष्ट्र कार्यक्रमाने लोकांना अनुभवायला दिला. अतिशय अपेक्षेने निवडून दिलेल्या आपल्या नेत्याची राज्याचे मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यावर राज्याच्या विकासाबाबतची नेमकी दिशा, भूमिका कशी असेल याचे नेमके यथार्थ दर्शन कोट्यवधी नागरिकांना या मुलाखतीतून झाले. राज्यापुढची सध्याची आव्हाने, ही आव्हाने नवीन सरकार कशाप्रकारे पेलणार, सरकारचे प्राधान्यक्रम कोणते असतील, राज्य घडविण्यासाठी वाढविण्यासाठी सरकार कोणती पावले उचलणार याविषयी मुख्यमंत्र्यांनी अतिशय संयत, ठाम, निश्चित, प्रांजळ पण तितकीच सडेतोड भूमिका मांडली. अतिशय हजरजबाबी, अभ्यासू, प्रामाणिक, संवेदनशील, प्रभावी वक्ते म्हणून ख्यात असलेल्या या तरुण, तडफदार नेत्याने राजकारणापासून ते अगदी व्यक्तिगत आयुष्यापर्यंत विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला अगदी मनमोकळी, समर्पक उत्तरे दिली. एरवी विधानसभेतील फ्लोअर गाजविणाऱ्या या फर्ड्या वक्त्याने आपल्या आशादायी, विश्वासक, आत्मविश्वासपूर्ण देहबोली आणि उत्तरांनी मुलाखतीच्या चित्रीकरणाचा फ्लोअरही खुलवला. लोकसत्ताचे संपादक आणि आपल्या अभ्यासू, परखड पत्रकारितेमुळे लोकप्रिय असलेल्या गिरीश कुबेर यांनी आपल्या नेहमीच्या थेट, खुमासदार शैलीत, मृदू स्वरात नेमके प्रश्न विचारून जणू आदर्श मुलाखतीचा वस्तुपाठच घालून दिला. रात्री ८ वाजता सुरू झालेली ही मुलाखत अखंडपणे उत्तरोत्तर रंगत रात्री ९ वाजता संपली. निर्विघ्नपणे एक तासाची ही मुलाखत प्रसारित झाली आणि तिथे उपस्थित सर्वांच्याच चेहऱ्यावर कर्तव्यपूर्तीचे समाधान आणि आनंद उमटला.

**७०० भागांची यशस्वी वाटचाल**

गेल्या ७ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'जय महाराष्ट्र' या लोकप्रिय कार्यक्रमाच्या ७०० भागांच्या यशस्वी वाटचालीतला हा अत्युच्च क्षण! अर्थात, मुख्यमंत्र्यांची पहिली थेट मुलाखत

प्रसारित करण्याच्या महासंचालनालयाच्या विनंतीला मुख्यमंत्र्यांनी दिलेला होकार, ही मुलाखत विधानभवनातून थेट प्रसारित करण्यासाठी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी मुंबई दूरदर्शनमधील त्यांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना दिलेल्या सूचना यासाठी 'टीम जय महाराष्ट्र' त्यांची सदैव ऋणी राहील.

**थेट प्रसारण**

विधानभवनातून ही मुलाखत थेट प्रसारित करण्यासाठी आवश्यक ती परवानगी दिल्याबद्दल विधानपरिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख, विधानमंडळाचे प्रधान सचिव अनंत कळसे, जनसंपर्क अधिकारी निलेश मदाने विधानभवनातील व सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे आभार यानिमित्त व्यक्त करायलाच हवे. दूरदर्शन, मुंबई केंद्राचे अतिरिक्त महासंचालक मुकेश शर्मा व त्यांच्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचेही आभार मानणे, हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो.

माहिती सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्या मार्गदर्शनाखाली ७ वर्षांपूर्वी लावलेला 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाचा इवलासा वेलू, त्यांच्याच मार्गदर्शनाखाली ७०० भागांच्या उत्तुंग वाटचालीला गवसणी घालत असतानाच मुख्यमंत्र्याच्या पहिल्या थेट मुखालतीचा मान कार्यक्रमाला मिळाला, हा दुग्धशर्करा योग टीम जय महाराष्ट्रसह माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे आधारस्तंभ, प्रभारी महासंचालक प्रल्हाद जाधव यांची शासकीय सेवेतून सेवानिवृतीही या अत्युच्च क्षणी व्हावी, ही त्यांच्या शासकीय सेवेची एकप्रकारे पावतीच म्हणावी लागेल. कोट्यवधी जनतेच्या अलोट प्रेम आणि विश्वासामुळे 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमाचा 'महावृक्ष' यापुढेही माहितीरूपी सावली अशीच देत राहील, एवढे मात्र नक्की.

**- मीनल जोगळेकर**
वरिष्ठ सहायक संचालक(वृत्तचित्र)

# माध्यम प्रतिनिधी म्हणतात...
# 'जय महाराष्ट्र' शासकीय कामकाजाचा आरसा




'राज्य शासनाच्या कामकाजाला तळागाळातील जनतेपुढे प्रभावीपणे मांडण्याचे काम सह्याद्री वाहिनीवरील जय महाराष्ट्र या कार्यक्रमाने केले आहे, या कार्यक्रमाने माहिती व जनसंपर्क महासंचलानलयाची तत्पर कार्यप्रणाली अवघ्या राज्यापुढे ठेवली असून या विभागाची नवी ओळख निर्माण केली आहे,'असे गौरवोद्‌गार माध्यम प्रतिनिधींनी काढले आहे. प्रसंग होता जय महाराष्ट्र या कार्यक्रमाच्या ७०० व्या भागाच्या परिपूर्तीचा. ७ नोव्हेंबर २०१४ रोजी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात आयोजित या छोटेखानी पारिवारिक कार्यक्रमात आलेल्या माध्यम प्रतिनिधींनी विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांच्यापुढेच ही पावती दिली. योगायोग म्हणजे ७ वर्षांपूर्वी ऑगस्ट २००७ मध्ये त्यांनीच या कार्यक्रमाची सुरुवात केली होती. त्यांनी त्या काळात टाकलेल्या एका धाडसी पावलाने अवघ्या महाराष्ट्राला थेट मंत्रालयाशी जोडण्याची किमया साधली. गावागावात पोहचलेल्या सहयाद्री वाहिनीवरून राज्याचे मुख्यमंत्री, मंत्री आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचा थेट संवाद सुरू होण्याच्या या प्रवासाने ७००

भागांचा टप्पा गाठला आहे. वृत्तचित्र विभागाने या ७०० व्या भागाच्या प्रक्षेपणाचे औचित्य साधून या कार्यक्रमात मुलाखत घेणारे विविध माध्यमातील ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक व विचारवंतांचे 'गेट टुगेदर' आयोजित केले होते. विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर, महासंचालक अजय अंबेकर यांनी केक कापून यावेळी टीम जय महाराष्ट्रच्या अथक परिश्रमाचे कौतुक केले. यावेळी सकाळच्या ज्येष्ठ पत्रकार मृणालिनी नानिवडेकर, लोकमतचे ब्युरोचिफ अतुल कुळकर्णी, दूरदर्शनच्या वृत्तविभागाच्या सहायक वृत्तसंपादक ज्योती अंबेकर, दैनिक लोकसत्ताचे ज्येष्ठ पत्रकार प्रसाद मोकाशी, विजय गायकवाड, वृत्तनिवेदक शैलेश पेठे, वृत्तनिवेदक हेमंत बर्वे, एशिएन ऐजच्या श्रुती गणपत्ये, ज्येष्ठ साहित्यिक, अभ्यासक डॉ. गिरीश दाबके आदी उपस्थितांनी या कार्यक्रमाच्या व्याप्ती आणि प्रभावाची माहिती दिली. शासनाच्या विविध योजनांची व्यापक व प्रभावीपणे माहिती देण्याचे काम जय महाराष्ट्र कार्यक्रमाने केले आहे.

शासकीय प्रसिद्धी विभागाबद्दलचे पारंपरिक मत बदलून टाकणाऱ्या जय महाराष्ट्र या कार्यक्रमाच्या निर्मितीमागील एक एक पट यावेळी सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी उलगडून दाखविला. त्या म्हणाल्या, 'इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांनी कात टाकल्याच्या त्या काळात शासनाच्या प्रसिद्धी विभागाकडे या माध्यमात प्रभाव टाकण्याची नेमकी जागा 'जय महाराष्ट्र' या कार्यक्रमाने भरून काढली. या एका नव्या आयुधाने मोठी पोकळी भरून निघाली. खरे म्हणजे शासन हे लोकोपयोगी कार्य करणारी लोकशाहीतील एकमेव प्रभावी यंत्रणा. मात्र इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांमध्ये विकासात्मक, प्रबोधनात्मक, माहितीपर वृत्ताला हक्काची जागा नसताना तळागाळातील जनतेपुढे हवे तसे आणि व्यापकतेने पोहचता येत नव्हते, मात्र हा प्रयोग यशस्वी झाला आणि गडचिरोलीपासून सिंधुदुर्गपर्यंत सर्वसामान्यांना व्यक्त होण्याचा एक राजमार्ग मोकळा झाला. '

ज्येष्ठ पत्रकारांनीही राज्याच्या हिताच्या अनेक योजनांच्या व्यापक प्रसिद्धीचे श्रेय जय महाराष्ट्रला जात असल्याचे सांगितले. याशिवाय विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आरोग्य, शिक्षण, कृषी, क्रीडा, साहित्य आदी क्षेत्रांबाबत या व्यासपीठावर केलेली चर्चा लोकप्रबोधनाचे नवे व्यासपीठ ठरल्याचे सांगितले. जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी 'फोन इन'ची सुरूवात झाल्यावर तर या कार्यक्रमाने माध्यमाच्या जगात प्रतिसादाचे नवेनवे उच्चांक मांडले. 'फोन इन'च्या माध्यमातून आलेले अनेक मनोरंजक अनुभव यावेळी पत्रकारांनी मांडले. शासन काय करते? याचे उत्तर जय महाराष्ट्र या कार्यक्रमातून महाराष्ट्राला मिळते. विविधांगी योजना आणि जय महाराष्ट्र कार्यक्रम जणू सरकारी कामकाजाचा आरसाच असल्याचेही पत्रकारांनी सांगितले. महासंचालनालयाचा हा उपक्रम १००० भागाचे उद्दिष्ट लवकरच पार करेल, अशा शुभेच्छाही यावेळी त्यांनी दिल्या. महासंचालकांनी जय महाराष्ट्र या कार्यक्रमाचा उच्च दर्जा ही या उपक्रमाची खरी उपलब्धी असून यापुढे अनेक तांत्रिक बदल करून कार्यक्रमाची लोकप्रियता उत्तरोत्तर वाढविण्याचे सूतोवाच केले.

# सुखावून गेलेला संस्मरणीय क्षण

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक आणि प्रभारी महासंचालक प्रल्हाद जाधव यांचा शासकीय सेवेतील ३१ ऑक्टोबर हा शेवटचा दिवस. या शेवटच्या दिवशीही श्री. जाधवसाहेब नेहमीप्रमाणेच अत्यंत उत्साहाने कार्यरत होते. दिवसभर विविध शासकीय कार्यक्रमांना उपस्थित राहिल्यानंतर ते रात्री ८ वाजताच्या जय महाराष्ट्र या कार्यक्रमालाही उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जय महाराष्ट्राच्या विशेष मुलाखतीचे संपूर्ण संनियत्रंण केले जात होते. या मुलाखतीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विशेषत्वाने विधानभवनात आले होते. मुलाखत संपल्यानंतर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या सचिव मनीषा पाटणकर-म्हैसकर यांनी जाधवसाहेब यांचा परिचय मुख्यमंत्र्यांना करून दिला व ते आज निवृत्त होत असल्याबद्दल त्यांना माहिती दिली व जाधव साहेबांनी केलेल्या कार्याचा गौरवही केला. मुख्यमंत्र्यांनी जाधवसाहेबांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले व त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. जाधवसाहेब यांच्या यशस्वी शासकीय कारकिर्दीचा शेवट असा संस्मरणीय झाला, तो त्यांच्यासह उपस्थित सर्वांनाच सुखावून गेला.



# ‘दिलखुलास’– महाराष्ट्राची ‘मन की बात’

सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्याचे महत्त्वाचे व प्रभावी माध्यम आकाशवाणी हेच राहिले आहे. परंतु गेल्या काही वर्षांपासून आकाशवाणीचे हे महत्त्व थोडे कमी झाले होते. मात्र या माध्यमाची अंगभूत शक्ती लक्षात ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांशी आकाशवाणीवरून संवाद साधण्याचा निर्णय जाहीर केला आणि या माध्यमाच्या प्रभावावर नव्याने शिक्कामोर्तब झाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ३ ऑक्टोबरला प्रथम‘मन की बात’ या कार्यक्रमाद्वारे आकाशवाणीवरून जनतेशी संवाद साधला. विविध विषयांवर ते जनतेशी बोलले. त्याला सर्व स्तरावरून अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. नंतर दि.२ नोव्हेंबरला देखील तमाम भारतीय नागरिकांशी पुन्हा ‘मन की बात’ या कार्यक्रमातून महत्त्वपूर्ण विषयावर संवाद साधला. जागतिक पातळीवर पुन्हा एकदा या श्राव्य माध्यमाचे महत्त्व आणि लोकोपयोगिता अधोरेखित झाली.


आकाशवाणी या माध्यमाचे हे महत्त्व मात्र महाराष्ट्र शासनाने खूप आधीपासून ओळखले होते. गेल्या ८ वर्षांपासून माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाची निर्मिती असलेला दिलखुलास हा आठवड्याचे सर्व दिवस आकाशवाणीवरून प्रसारित होत आहे. आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या लोकप्रिय कार्यक्रमात दिलखुलासची गणना होते. ग्रामीण भागाबरोबरच शहरातील दिलखुलास ऐकणाऱ्या श्रोत्यांनी या कार्यक्रमाची गुणवत्ता अधोरेखित केली आहे. ही माहिती जनसंपर्क महासंचालनालयासाठी नक्कीच अभिमानाची बाब आहे.

**श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य**

रसिक श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा दिलखुलास हा कार्यक्रम शासन आणि जनता यांच्यातील माहितीचा, संवादाचा अतिशय महत्त्वाचा सेतू बनला आहे. या कार्यक्रमातून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक प्रशासकीय एवढेच नव्हे तर विविध क्षेत्रात बहुमोल योगदान देणाऱ्या मान्यवरांच्या अनुभवांना दिलखुलासने आपले व्यासपीठ सहजतेने उपलब्ध करून दिले. या कार्यक्रमामुळे जनतेला विविध विषयांवर अतिशय उपयुक्त अशी माहिती मिळाली आहे. या माहितीमुळे त्यांचे जीवन अधिक समृद्ध आणि गुणवत्तापूर्ण होण्यास उपयोग झाला आहे. त्यामुळेच दिलखुलास कार्यक्रमाची लोकप्रियता सातत्याने वाढत आहे.

प्रत्येक मुलाखत ही लहानांपासून थोरांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून ते संशोधकांपर्यंत हा कार्यक्रम आवडल्याची पोहोच मिळते ती पत्राद्वारे. ग्रामीण भागातून आलेल्या श्रोत्यांच्या पत्रांची दखल दिलखुलास पत्रसंवाद या बहारदार कार्यक्रमातून घेतली जाते.

युवकांना करिअर करण्याच्या संधी आणि याचे योग्य मार्गदर्शन, यशस्वी मान्यवरांच्या तसेच यू.पी.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मान्यवरांच्या मुलाखती ‘दिलखुलास प्रेरणा’ या सदरामधून प्रसारित करण्यात येत आहेत.




## ३००० भागांकडे वाटचाल

**शासनाचा कोणताही नवीन उपक्रम किंवा योजना सुरू करण्यात आली की प्रथम माहिती मुलाखतीच्या स्वरूपात दिलखुलासने दिली आहे. ३ हजार भागांकडे या कार्यक्रमाची अविरत आणि यशस्वी वाटचाल सुरू आहे.. शासन जनतेकरिता वेगवेगळ्या योजना आणि धोरणे राबवत असते. या सर्व ध्येयधोरणांची माहिती, योजनांची माहिती, तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचण्याचे प्रभावी माध्यम दिलखुलास कार्यक्रम ठरला.**

दिलखुलास कार्यक्रमातील प्रत्येक मुलाखतीची निर्मिती, आयोजन, संपादन आणि प्रसिद्धी हे प्रत्येक क्षणाला नवीन विषय हाताळण्यासारखे असते. ते दिलखुलास टीमने आजपर्यंत यशस्वीपणे पेललेही आहे. दिलखुलास कार्यक्रमातील सहभाग म्हणजे शासनाने आपल्या कामाची घेतलेली दखलच आणि कौतुकाची थाप पाठीवर दिल्यासारखे वाटते.

विविध लोकोपयोगी योजनांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचल्याने समाजातील गरीब आणि गरजू तसेच खऱ्या अर्थाने लाभार्थ्यांपर्यंत पोहचल्याचे अनेक अभिप्रायही या कार्यक्रमास मिळतात.

– **मीरा ढास,** उपसंपादक

## ‘दिलखुलास’ संवाद ऑनलाइनही उपलब्ध

**जनतेला या सर्व मुलाखती मोफत ऑडिओ स्वरूपात ऐकण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या** www.dgipr.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर वृत्तचित्र या सदरात** MP3 **स्वरूपात उपलब्ध आहेत. हा अनमोल खजिना दिलखुलास कार्यक्रम सुरू झाला म्हणजेच १६ नोव्हेंबर २००६ पासून दिलखुलासच्या पहिल्या भागापासून ते आजपर्यंत श्रोत्यांसाठी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे महान्यूज या वेबपोर्टलवर दिलखुलास या सदरात या मुलाखतींचे शब्दांकनही उपलब्ध करून दिले आहे ते खास करून नेट वापरणाऱ्यांसाठी.**

मंत्रिमंडळाचा पहिला निर्णय

# सेवा हमी विधेयक

कार्यक्षमता आणि पारदर्शकता ही दोन्हीही उत्तम प्रशासनाची महत्त्वाची लक्षणे असली तरी बहुतेक वेळा कार्यक्षम प्रशासन पारदर्शी असत नाही आणि पारदर्शी सरकार कार्यक्षम असेलच असे नाही. महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री आपल्या पहिल्यावहिल्या पत्रकार परिषदेत बोलत होते आणि जणू त्यांचे प्रत्येक वाक्य हे सर्वसामान्य जनतेच्या तोंडचेच होते. मुख्यमंत्री म्हणून जनतेची कामे वेळेत व्हावी यासाठी राज्यात सेवा हमी विधेयक आणू अशी पहिली घोषणा करून त्यांनी कार्यक्षमता आणि पारदर्शकता या दोन्हीचा उत्तम मेळ घातला जाईल हे स्पष्ट केले.

**कामे वेळेत आणि निश्चित कालावधीत**

'सरकारी काम आणि सहा महिने थांब' असे उपरोधाने बोलले जाते. तहसील कार्यालय असो नाहीतर जिल्हाधिकारी कार्यालय, ग्राम पंचायत असो नाहीतर महानगरपालिका. या शासकीय कार्यालयांमध्ये जावे लागले नसेल अशी व्यक्ती सापडणार नाही. कार्यालयातील कामे वेळेत आणि निश्चित कालावधीत झाली तर गर्दीही कमी होते आणि लोकांना योग्य सेवा गतीने मिळू शकते. प्रकरणांचा निपटारा वेळेवर होत नाही आणि मग सगळ्या व्यवस्थेवर ताण येतो. सरकारी कार्यालयात सादर केलेल्या एका कागदाचे रूपांतर एका जाडजूड फाइलमध्ये होते. तरीही त्या प्रकरणाचा निकाल लागत नाही. हे चित्र बदलण्यासाठी प्रशासनाच्या पातळीवरून अधिक गंभीरपणे प्रयत्न होणे गरजेचे आहे. हे ओळखून मुख्यमंत्र्यांनी पहिल्याच दिवशी याबाबत निर्णय घेतला.

**वेळेत कामे पूर्ण करून घेण्याचा अधिकार**

जनतेला कामांसाठी सरकारी कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नये यासाठी सेवा हमी विधेयक आवश्यक असून या विधेयकामुळे जनतेला ठराविक वेळेत त्यांची कामे पूर्ण करून घेण्याचा अधिकार मिळणार आहे ही यामागची मध्यवर्ती भूमिका आहे.

आज जर एखाद्या नागरिकाला एखादी सेवा मिळाली नाही आणि तो संबंधित विभागाकडे नुसत्याच फेऱ्या मारत राहिला, तर अशावेळी प्रक्रिया जाणून घेण्याबाबत त्याच्याजवळ असे कोणतेही साधन नाही. योग्य सेवा मिळण्याचा अधिकार प्रत्येकाला असावा आणि निर्धारित वेळेत प्रत्येकाला हव्या असलेल्या सेवेचा लाभ घेता यावा यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ सचिवांची समिती स्थापन करून हे सेवा हमी विधेयक आणले जाईल. त्यानुसार प्रत्येक विभागाला कोणत्या सेवा दिल्या जातात, किती दिवसात देतात, सेवा वेळेवर मिळाली की नाही या मुद्द्यांना अनुसरून यादी तयार करण्यात येणार आहे. कसूर करणाऱ्या अधिकाऱ्याला दंडही करण्यात येणार आहे. एका महिन्याच्या आत ही समिती मसुदा तयार करेल व त्याचे लवकरच कायद्यात रूपांतर केले जाईल.

आपले राज्य प्रशासकीय सुधारणा करण्यात अग्रेसर राहिलेले आहे. देशात माहितीचा अधिकार प्रथमत: अंमलात आणला तो महाराष्ट्राने. स्वच्छ व गतिमान आणि लोकाभिमुख प्रशासन देणे आणि नागरिकांना शासकीय सेवा, सुविधा पारदर्शकरीत्या कमीतकमी कालावधीत उपलब्ध करून देणे, ही शासनाची प्राथमिकता राहील यावर भर देण्याचे सुतोवाच नव्या मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

## पाच तास सादरीकरण

नवीन सरकारच्या मंत्रिमंडळाच्या दुसऱ्या बैठकीत प्रामुख्याने विविध विभागांचे सादरीकरण करण्यात आले. सुमारे पाच तास चाललेल्या या बैठकीत अर्थ, कृषी, गृह आणि ऊर्जा या खात्यांचे सादरीकरण सचिवांनी केले. ही खाती अधिक सक्षम बनविण्यासाठी काय करता येईल हा या बैठकीमागील उद्देश होता. आर्थिक काटकसरीच्या उपाययोजना राबवणे, पायाभूत सोयीसुविधांचे जाळे सक्षम करणे, शेती क्षेत्रातील विकास दर वाढविणे, लोडशेडिंगमुक्त महाराष्ट्र आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला.

देशात महाराष्ट्राचा अव्वल क्रमांक राहावा. तसेच राज्यातील सर्व विभागांचा समतोल व सर्वसमावेशक विकास व्हावा, यासाठी सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून पारदर्शी, लोकाभिमुख प्रशासन देण्याचा आपला इरादा मुख्यमंत्र्यांनी यावेळी परत व्यक्त केला. काही विभागांचे एकत्रीकरणही करण्याचे नियोजनदेखील आहे.



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सात शतके लोकप्रियतेची...

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित

जय महाराष्ट्र

@७००

## जनतेशी थेट संवाद साधत
## अखंड ७०० भागांचा इतिहास घडविणारी
## जय महाराष्ट्र मालिका
## पाहायला विसरू नका

जय महाराष्ट्र


प्रसारण : दर मंगळवार आणि शुक्रवार
रात्री : ८ ते ९, सह्याद्री उपग्रह वाहिनीवर

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From18th to 25th November 2014
Date of Publication : 10th of every Month


# घरोघरी लोकराज्य

## संपूर्ण रंगीत छपाई आणि आकर्षक मांडणी




शेतकरी, शेतमजूर, कामगार, उद्योजक,
अध्यापक, विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक,
महिला, डॉक्टर्स, शासकीय कर्मचारी,
इंजिनिअर्स, पत्रकार, वकील,
लोकप्रतिनिधी अशा सर्वांच्या जिव्हाळ्याच्या
विषयांचा वेध साध्या आणि सोप्या शब्दांत

**केवळ अधिकृतच नव्हे तर,
उपयुक्त आणि वाचनीय माहिती**

## लोकराज्य
आज आणि उद्यासाठीही!

**वार्षिक वर्गणी १००/-**


प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक/From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक **अजय अंबेकर**, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : अजय अंबेकर